...वाचनालय, राज...
विषय : नाटक
दा.क्र. : १८१२९

१८१२९

IRBK-0118129

IRBK-0118129

१८१२९ 30/
नाटक

# चांदणे शिंपीत जा

मधुसूदन कालेलकर

IRBK-0118129
IRBK-0118129

मॅजेस्टिक प्रकाशन

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
२१६ प्रसाद चेंम्बर्स

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०

पहिली आवृत्ती
मार्च १९७३
द्वितीय आवृत्ती
फेब्रुवारी १९७७

मूल्य सात रुपये

या नाटकाचे व्यावसायिक—
रंगभूमीवरील प्रयोगांचे हक्क
४ फेब्रुवारी १९७३ पासून तीन वर्षे
पर्यंत 'नाट्यमंदार' कडे आहेत.
या व्यतिरिक्त प्रयोगांचे हक्क, इतर
भाषेतील भाषांतराचे व प्रयोगांचे
हक्क, तसेच पटकथा, नभोवाणी व
दूरचित्रवाणी यांचे हक्क—
सौ. मीना मधुसूदन कालेलकर
'ज्ञानदेवी' साहित्य सहवास,
वांद्रा (पूर्व) मुंबई ५१
यांचेकडे आहेत.

छाया : राजदत्त
मुखपृष्ठ : अरुण घाटे

(या पुस्तकाच्या प्रस्तुत आवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्य कागद-वाटप समितीच्या सहकार्याने सवलतीच्या दरातील कागद मिळाला आहे. त्याबद्दल आभारी आहोत.)

आयुष्यभर दुसऱ्यांच्या
जीवनावर चांदणे शिंपणाऱ्या

कै. ती. श्यामकाकास
मधू

# योगायोग

योगायोगावर तुमचा विश्वास आहे की नाही मला ठाऊक नाही. पण माझा आहे. उत्तम क्रिकेटीयर होण्याचं स्वप्न बाळगणारा मी, नाटककार योगायोगाने झालो. आणि हे नाटक तर फारच मोठा योगायोग आहे. माझ्या शेजारच्या ब्लॉकमध्ये प्रोफेसर म. वा. धोंड राहातात. प्रोफेसर म्हटला की मी त्याच्यापासून चार पावलं दूर राहातो. आता तर प्रोफेसरांचाच शेजार! पण काही भेटीतच या प्रोफेसरातला रसिक नि रंगेल (बोलण्यात) माणूस मला भेटला.

गेल्या वर्षी माझ्या 'दिवा जळू दे सारी रात' या नाटकाचा सहाशेवा प्रयोग होता. प्रोफेसर धोंड त्या प्रयोगाला आले होते नाटक पाहून ते भारावून गेले. दुसऱ्या दिवशी त्याच धुंदीत ते माझ्याकडे आले नि म्हणाले, "कालचं नाटक पाहिल्यानंतर मला एक कल्पना सुचली आहे नाटकासाठी! पण नाटक हा माझा प्रांत नाही. म्हणून चुकीच्या पत्त्यावर आलेली ही कल्पना मी बरोबरीच्या पत्त्यावर पोहोचवायला आलो आहे." असे म्हणून त्यांनी ती कल्पना मला सांगितली : एका अहंकारी माणसाला अखेरच्या क्षणी प्रेम, आपुलकी मिळत नाही आणि त्या प्रेमासाठी तो आमूलाग्र बदलतो— ही ती कल्पना! मला आवडली! वर्षभर ती डोक्यात घोळत होती. त्यानंतर एके दिवशी डॉ. श्रीराम लागूंची नि माझी गाठ पडली. त्यांना मी या कल्पनेवर उभारलेल्या नाटकाची मांडणी ऐकवली. त्यांना ती आवडली व नाटकातील मध्यवर्ती भूमिका करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली. इतकेच नव्हे तर कधी-मधी भेट झाली तर नाटक

कुठपर्यंत लिहून झालंय याची चौकशीही त्यांनी केली. पण तो योग नव्हता! प्रत्यक्षात हे नाटक मी— 'नाट्यवैभव' साठी लिहिलं. पण तोही योग नव्हता. या नाटकाआधी 'अमृतवेल' हे नाटक मी 'नाट्यवैभव' साठी लिहिलं होतं, पण फिरत्या रंगमंचकावरील एवढं खर्चिक नाटक काढायला 'नाट्य वैभव' चे सूत्रधार तयार होईनात. माझे मित्र श्री. कापडी यांना हे कळताच त्यांनी 'अमृतवेल' आपल्या 'रंगधारा' या संस्थेसाठी घेतलं. आणि दुसऱ्या दिवशी 'नाट्य-मंदार' चे सूत्रधार श्री. राजाराम शिंदे 'अमृतवेल' घेण्यासाठी माझ्या घरी हजर झाले. पण त्याआधीच माझा नि 'रंगधारा' चा व्यवहार ठरला असल्यामुळे माझा नाइलाज झाला! पण शिंदे कसले खमके! ते खनपटीलाच बसले. "हे नाटक नसले तर दुसरे द्या, पण तुमचा शब्द घेतल्याशिवाय मी तुमच्या घरातून हालणार नाही." असा निर्वाणीचा इशारा त्यांनी मला दिला- आता आली का पंचाईत! शेवटी या नवीन नाटकाची—चांदणे शिंपीत जा— कल्पना त्यांना ऐकवली. त्यांना ती एकदम पसंत पडली! नि त्यांच्याच 'नाट्यमंदार' या संस्थेतर्फे हे नाटक रंगभूमीवर आलं! ज्या स्वरूपात मी हे नाटक लिहिलं, त्याच स्वरूपात मोठ्या जिद्दीने शिंदेंनी हे नाटक रंगभूमीवर आणलं— कसलीही कम-तरता न ठेवता! बाबुराव सडवेलकरां-सारखा नेपथ्यकार म्हणजे दुधात साखर! फार दिवसांनी एक देखणं नेपथ्य पाहायला मिळालं!

या नाटकाचे दिग्दर्शक प्राध्यापक (पुन्हा प्रोफेसर) मधुकर तोरडमल हेही माझे शेजारी— एकाच बिल्डिंग-मध्ये राहाणारे! नाटकाची रंगावृत्ती तयार करताना त्यांच्या खूप सूचना मला उपयुक्त ठरल्या. त्यांनी हे नाटक

मोठ्या कसोशीनं बसवलं आणि त्यातली दीनानाथची मध्यवर्ती भूमिका मोठ्या ताकदीनं उभी केली. त्यांना साथ दिली सौ. सुमन धर्माधिकारी यांनी. या दोघांच्या अभिनयाची जुगलबंदी म्हणजे एक आगळा अनुभव.दीनानाथ टाकळकर,अविनाश मसुरेकर, शीला वालावलकर, उज्ज्वला केणी, सीमा सावंत, विश्वास पटवर्धन, नमशीकर आणि मोहन मुंगी यांनी नाटकाच्या रंगतीस मोठा हातभार लावला. एक उत्कृष्ट टीमवर्कचा नमुना ! या नाटकाची रंगावृत्ती माझे मित्र श्री. बाबू सेंजित यांनी केली. या नाटकाचा मुहूर्त माझे प्रकाशक-मित्र श्री. केशव कोठावळे यांच्या हस्ते झाला. आणि त्यांच्यातर्फेच हे नाटक प्रकाशित होत आहे हा योगायोगच समजावा लागेल.

'अमृतवेल' पासून मी माझ्या लिखाणाच्या पद्धतीत बदल केला आहे. या नाटकात प्रेक्षकांना त्याचा प्रत्यय येईलच ! 'सखाराम बाईंडर' — नंतर त्याच्या निर्मात्यांनी 'अमृतवेल' सादर केलं आणि 'तरुण तुर्क आणि म्हातारे अर्क' नंतर त्याच्या निर्मात्यांनी 'चांदणे शिंपीत जा' हे नाटक रंगभूमीवर आणलं. हा विरोधाभास म्हणजे एक योगायोगच नाही का ?

मधुसूदन कालेलकर
'ज्ञानदेवी'
साहित्य सहवास
वांद्रा (पूर्व) मुंबई ५१

अहंकारी बनला आहे. बराचसा कठोर— शिस्तप्रिय आणि सदैव ' मी '-पणाच्या कोषात गुरफटलेला, घरात भरपूर पैसे दिले, कपडेलत्ते दिले की कर्तव्य संपतं— ही याची भावना. त्यामुळे घरातील तीन मुलांच्या नि पत्नीच्या प्रेमाला पारखा झालेला. आपण म्हणू तसं घरातील प्रत्येकानं वागलं पाहिजे— बोललं पाहिजे— चाललं पाहिजे हा त्यांचा हट्ट. आपल्या पैशानं आपण कुटुंबातील सर्वांना विकत घेतले आहे ही यांची समजूत. त्यामुळे वैभव असूनही— सुख असूनही घराला एखाद्या तुरुंगाची अवकळा आली आहे.

मनोरमा ही दीनानाथांची पत्नी. चाळीशीची प्रौढा. एके काळच्या सौंदर्याच्या खुणा अजूनही चेहऱ्यावर रेंगाळत आहेत. नवऱ्यावर व मुलांवर जिवापाड प्रेम करणारी सुविद्य पण सदैव नवऱ्याच्या भीतीनं धास्तावलेली. संसार करत असूनही संसारात न रमू शकणारी नवऱ्याच्या कोरड्या वागण्यामुळे नि कठोर शिस्तीमुळे अकाली पोक्त झालेली. या रूक्ष संसारात तिला दिलासा आहे तो तीन मुलांचा— रेखा, नितीन नि प्रमीलचा.

रेखा ही दीनानाथांची मोठी मुलगी. तिच्या जन्मापासून त्यांच्या उत्कर्षाला खरी सुरुवात झाली. बावीस वर्षांची— स्मार्ट— देखणी, पण जरा अबोल. ही मेडिकल कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षाला आहे. हिला आवड होती चित्रकर्त्री होण्याची. पण वडिलांच्या इच्छेपुढे काही चालू न शकल्यामुळे डॉक्टरकीचा कोर्स तिला घ्यावा लागला. त्याबद्दलची तिची चीड तिच्या बोलण्यातून नसली तरी वागण्यातून व्यक्त होत असते.

नितीन हा रेखाच्या पाठीला पाठ लावून आलेला भाऊ. रेखाच्या मानाने बोलका— मनात येईल ते बोलून दाखवणारा. लॉ कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला आहे. खरं म्हणजे त्याला इंजिनिअर व्हायचं होतं. पण वडिलांसाठी त्याला, हा नको असलेला कोर्स घ्यावा लागला. याची चीड वेळोवेळी त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत असते. दीनानाथांना सर्वांत कमी घाबरणारा फक्त हाच मुलगा.

प्रमील ही सर्वांत धाकटी बहीण— शेंडेफळ! या वर्षी एस्. एस्. सी. ला आहे. अतिशय लाघवी नि गोड मुलगी. नुकतेच सोळाव्या वर्षात तिने पदार्पण केलं आहे. संगीताचा अतिशय नाद. वेळ मिळाला की पिआनोच्या पट्ट्यांशी तिचा खेळ चाललेला. वडिलांची फक्त शिस्तच तिच्या वाट्याला आल्यामुळे नेहमी बावरलेली — भेदरलेली. आईची व रेखा-नितीनची अतिशय लाडकी. पण सर्वांत ल[illegible]डकी तिच्या सदाकाकांची —प्रेमाने तिला ते ' बछडी ' म्हणतात.

या घरात राहात नसूनही या घरातल्यापैकी एक म्हणजे सदानंद. दीनानाथांच्याच वयाचा. ' कमिशनर ऑफ पोलिस ' या हुद्द्यावर आहे. दीनानाथांचा बालमित्र– सल्लागार— नि हितचिंतक. पण अजूनही लग्न न केलेला. त्यामुळेच की काय दीनानाथ मनोरमेच्या संसारात रमलेला. आयुष्यातली कुठलीही गोष्ट फारशी गंभीरपणे घेण्याची त्याला सवय नाही. त्याला एकच व्यसन नि ते म्हणजे दुसऱ्याला हसवण्याचं प्रमीलवर याचं जिवापाड प्रेम. पण त्या हसवण्यामागे कारुण्याची— कुठल्या तरी व्यथेची एक अदृश्य झालर आहे, हे फक्त त्याचं त्यालाच ठाऊक आहे.

या घरातील आणखी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे भिकोबा. दीनानाथांच्या तरुणपणापासूनचा नोकर. दीनानाथ एकटे असल्यापासून याची त्यांना साथ लाभलेली. प्रेमळ पण मुलखाचा फटकळ. दीनानाथांना फारसा न घाबरणारा पण त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारा. त्याच्या डोळ्यां समोर दीनानाथ– मनोरमेचं प्रेमप्रकरण घडलं– लग्न झालं– मुलं खेळू लागली. तिन्ही मुलं त्याच्या अंगाखांद्यावरच वाढली– खेळली. या घराशी — त्यातील सुखदुःखांशी पूर्णपणे एकरूप झालेला. वयाने साठीकडे झुकलेला. गावाकडे आपली बायको–पोरं आहेत हे जवळ जवळ विसरून, या घरातलाच एक होऊन— गेली कित्येक वर्षे या घरात हा वावरत आहे.

अशा या निरनिराळ्या व्यक्तींना एकत्र गोवलेली ही कथा ( नाटक ) सुरू होते ( प्रेक्षकांसमोर ). जून महिन्यातील पाच तारखेच्या संध्याकाळी, दीनानाथ लाडांच्या आलिशान बंगल्यातील सुसज्ज दिवाणखान्यात.

वेळ संध्याकाळची असली तरी अजून दिवेलागणी झालेली नाही. रंगभूमीवर अंधूकसा प्रकाश आहे. त्या प्रकाशात दिसतं की प्रमील— दीनानाथांची धाकटी मुलगी डाव्या बाजूला कोपऱ्यात असलेल्या पिआनो-समोरील रिव्हॉल्व्हिंग स्टुलावर बसली असून पिआनो वाजवीत आहे. आणि त्या तालावर भिकोबा— दीनानाथांचा नोकर— साफसफाईचं काम करीत आहे. प्रमील आपल्याच नादात पिआनो वाजवते आहे. तिला याची जाणीव नाही. तोच जिन्यावरून मनोरमा— प्रमिलची आई— खाली उतरते. ती क्षणभर हे दृश्य पाहाते— हसते व दिवा लावते. भिकोबा चमकतो– पाहातो व थांबतो. ]

**मनोरमा :** भिकोबा— ( प्रमीलची तंद्री या हाकेने भंगते. ती पाहाते. ) हात-वारे काय करत होतास वेड्यासारखे ?

भिकोबा : अडाणी माणसानं काही केलं की तो वेडेपणा. नि त्या दिवशी गेलो होतो पमाताईबरोबर त्या समारंभाला, तर किती तरी लोक काय काय वाजवत होते— नि एक माणूस असेच हातवारे (स्वतः हातवारे करून दाखवतो.) करीत होता नि लोक टाळ्या वाजवीत होते.

प्रमील : भिकोबा, तो म्युझिक–डायरेक्टर होता. तो ऑर्केस्ट्रा कंडक्ट करीत होता.

भिकोबा : पण आपल्याला ते नाही आवडलं. कसला गोंगाट ! छ्या ! त्यापेक्षा तुम्ही ही बाजाची पेटी वाजवता ती गोड लागते कानाला.

मनोरमा : हिला बाजाची पेटी नाही म्हणत, पिआनो म्हणतात.

भिकोबा : हॅं ! बाईसाहेब, तुम्ही किती वर्सं हे सांगताय. पण आपल्याला नाही जमलं म्हणायला इतक्या वर्षांत.

मनोरमा : खूप वर्षे झाली नाही रे हा पिआनो आणून.

भिकोबा : अहो, या बंगल्याच्या घरप्रवेशाच्या दिवशी साहेबांनी आणला तुमच्यासाठी ! नाव विसरलो, पण हे नाही विसरलो.

प्रमील : अय्या ! आई, तुझ्यासाठी आणला हा पिआनो बाबांनी ? (मनोरमा हसते.)

भिकोबा : त्यावेळी बाईसाहेब काय सुन्दर वाजवायच्या ही पेटी...

प्रमील : खरं आई ?

भिकोबा : हो, पण त्यावेळी तुमचा जन्म नव्हता झाला.

मनोरमा : (गंभीर होत) तुझ्या जन्मानंतर सोडलं मी पिआनो वाजवणं ! मुलांच्या रगाड्यात वेळ कुठे मिळत होता ?

भिकोबा : हे काही तरीच बोलणं बघा तुमचं ! प्रमीलबाई नव्हत्या, पण नितीन-साहेब होते– रेखाताई होत्या. पण रोज रात्री साहेब घरी आले की, तुम्हांला सांगायचे ही पेटी वाजवायला. नि तुम्ही वाजवू लागलात की वेड्यागत ऐकत बसायचे.

मनोरमा ! ते सूर हरवले भिकोबा. जाऊ दे. तू आता जा नि चहाचं बघ. रेखा नि नितीन येतील आता कॉलेजातून. (भिकोबा काही न बोलता आत जातो.)

प्रमील : आई, तुला इतका छान येतो पिआनो— मग मला नाही शिकवलास कधी ? मी आपली अशीच शिकले. (तिला पिआनोजवळ घेऊन येते.) ऐकवना ते गाणं मला, तू बाबांना ऐकवायचीस ते.

मनोरमा : ते सूर आता कसे येतील वेडे ! आता सूर उमटलेच तर ते अंगाईचे उमटतील. (पिआनोच्या पट्ट्यांवर बोट ठेवते.) पट्ट्या त्याच आहेत, सूरही तेच आहेत. पण मनातलं गीत रुसलं की बोटातली जादू सरते. (अभावित-

पणे पट्ट्यांवरून बोट फिरवते. तिच्या कानावर शब्द येतात– दीनानाथांचे. )

**आवाज** : वाजव ना मनू, ते गाणं, माझ्या आवडीचं ! ते सूर ऐकले की मी विसरून जातो सारा शीण. विसरून जातो मी बाप आहे दोन मुलांचा. रॅकॉर्डींगमधे पिआनोवर वाजवलेलं, ते गाणं मी ऐकू लागलो की सारे क्षण सजीव करतात हे सूर—

**मनोरमा** : ( भारावून ) दीनानाथ.

( प्रमीलला काहीच कळत नाही. )

**प्रमील** : आई.

**मनोरमा** : ( भानावर येते. चरापते. पिआनोपासून दूर होते. ) अग, विसरलेच मी. उद्या रिझल्ट तुझा एस्. एस्. सी. चा. भिकोबाला सांगायला हवं पहाटेच पेढे आणून ठेवायला.

( जाऊ लागते. )

**प्रमील** : आई, ( मनोरमा वळून पाहाते. प्रमील तिच्याजवळ जाते. ) तू सांगशील बाबांना ?

**मनोरमा** : कशाबद्दल ?

**प्रमील** : एस्. एस्. सी. नंतर माझं संगीत ॲकेडमीमधे नाव घालायला !

**मनोरमा** : सांगून पाहाते. त्यांनी तुझ्या बाबतीत पुढे काय ठरवलंय हे त्यांनाच ठाऊक. ( या वाक्याच्या सुरुवातीला– नितीन– मनोरमेचा मोठा मुलगा आलेला आहे. त्याने हे ऐकलेलं आहे. )

**नितीन** : बरोबर आहे, बाबाच ठरवणार कुणी काय करायचं, काय व्हायचं ! प्रती परमेश्वरच ते.

**मनोरमा** : नितीन !

**नितीन** : हे घर आहे की तुरुंग ? आम्हांला काही मतं नाहीत ? आवडी-निवडी नाहीत ? – भावना नाहीत ! आम्ही जणू विकत घेतलेले गुलाम – आम्हांला जन्म दिला याच्या मोबदल्यात.

**मनोरमा** : आज बाहेर कुणाबरोबर तरी भांडण झालेलं दिसतंय !

**नितीन** : भांडण घरातलंच आहे– जन्माचं ! जन्माला घातल्याबद्दलचं ! बाप म्हणे बाप. ( दारात रेखा येते. )

**रेखा** : जी गोष्ट कुणाच्या तोंडावर बोलू शकत नाही, ती पाठीमागे बोलू नये, नितीन !

**नितीन** : वेळ आली की तोंडावरही बोलेन. तुला ठाऊक आहे रेखा, मला इंजिनीयर व्हायचं होतं. पण बाबांनी ठरवलं मी वकील व्हावं नि घातलं नाव लॉ कॉलेजमधे ! हा कुठला लॉ ?

**रेखा** : ( हसत ) मार्शल लॉ !

**नितीन** : तू हसून साजरं करतेयस ताई, पण तुझी व्यथा मी जाणतो. किती सुंदर चित्रं काढायचीस तू शाळेत असताना ! खूप मोठी चित्रकर्ती व्हायचं स्वप्न होतं तुझं. पण बाबांनी तुझ्या हातातला कुंचला काढून त्या जागी दिला स्टेथेस्कोप ! तुझी इच्छा असो की नसो, तुला आता डॉक्टर व्हायला हवं.

**रेखा** : नितीन, मनातली प्रत्येक गोष्ट हातात येतेच असं नाही ! पण हातात जे आलं ते मातीत न घालवता त्याचं सोनं करता आलं तर करावं !

**नितीन** : तुझ्या-माझ्याकरता नाही बोललो मी. आपलं भवितव्य ठरलं ! मी आयुष्यभर 'प्लीज युअर ऑनर' म्हणायचं नि तू माणसाच्या देहाची चिरफाड करायची. पण मी बोललो ते प्रमीलसाठी– तिच्या भवितव्यासाठी. (प्रमील बावरून नितीनकडे पाहाते. ) तिला संगीत-कलेला वाहून घ्यायचय, पण मला खात्री आहे, हिच्या अंगातील कलागुणांचा खून करतील बाबा, फक्त स्वतःच्या लहरींसाठी– हट्टासाठी. का ? तर ते पैसे कमावतात ! आमचे वडील आहेत. आम्हांला दोन वेळा जेवायला घालतात— आमच्या शिक्षणाचा खर्च करतात. या वैभवशाली घरात जन्माला यायच्या ऐवजी एखाद्या साध्या मजुराच्या घरी जन्माला आलो असतो तर जास्त सुखी झालो असतो आम्ही. स्वतःचं जीवन जगलो असतो. (आत निघून जातो. )

**मनोरमा** : काय म्हणावं बाई या पोराला !

**रेखा** : त्याचं काय चुकलं आई ! काही जणांना मनातलं उघड बोलता येत नाही. काही जणांना येतं ! नितीन आज जे उघड बोलला, ते मनोमनी बोलत असते मी स्वतःशी ! तू सुद्धा अशीच बोलत असशील.

**मनोरमा** : रेखा !

**रेखा** : आई, घोड्याच्या डोळ्यांना झापडं बांधतात– त्याने मालकानं आखून दिलेल्या मार्गानं धावावं म्हणून ! माझी नि नितीनची तीच गत झाली आहे. पण निदान प्रमीलची तरी ती गत होऊ देऊ नकोस. तिला तरी तिचं आयुष्य जगू द्यायला सांग बाबांना. (आत निघून जाते. प्रमील पिआनोच्या मागे भिंतीवर टांगलेल्या दीनानाथांच्या फोटोकडे पाहाते आहे. मनोरमा तिच्या-जवळ येते. )

**मनोरमा** : प्रमील, तू नको काळजी करूस. मी सांगेन तुझ्या बाबांना.

**प्रमील** : नको, तू नको सांगूस. बाबा रागावतील तुझ्यावर. नि मी सांगायला लावलं म्हणून माझ्यावर. मला भीती वाटतेय बाबांच्या रागाची.

**मनोरमा** : वेडी, अग, तुझ्यावर खूप प्रेम आहे त्यांचं. तुझ्यावर नाही रागवायचे.

**प्रमील** : (दीनानाथांच्या फोटोकडे पाहाते.) आई, तुला आठवतं ? मी आजारी पडले होते प्रिलीमच्या आदल्या दिवशी– खूप ताप भरला होता. बाबांना हे कळताच किती रागावले ! माझ्या अंगाला हात लावून माझा तापसुद्धा नाही

पाहिला. उलट म्हणाले, 'परीक्षा चुकवायची म्हणून कार्टीनं तापाचं सोंग आणलंय! मरूदे कार्टीला.'

**मनोरमा** : (तिला थोपटीत) प्रमील!

**प्रमील** : आई, मरण आपल्या हातात असतं का ग?

**मनोरमा** : तिन्ही सांजेच्या वेळी असं अभद्र नाही बोलायचं.

**प्रमील** : (स्वतःशीच) तशीच अंगात ताप असताना मी प्रिलीमला बसले नि फॉर्म मिळवला– बाबांच्या भीतीने.

**मनोरमा** : उद्या पासही होशील! मग बघ, तुझे बाबा तुझं किती कौतुक करतील ते.

**प्रमील** : खरंच तुला असं वाटतं? (मनोरमा काही उत्तर देत नाही. तोच फोन वाजतो. मनोरमा फोन घेते.)

**मनोरमा** : हॅलो. हा–हा. भिकोबा आणून पोचवेल तिला तुमच्या घरी वेळेवर. (फोन ठेवते. प्रमीलकडे येत–) अग, तुझ्या मैत्रिणीचा फोन होता. तुम्हांला संगीत सभेला जायचंय ना?

**प्रमील** : हो. पण बाबा...

**मनोरमा** : त्यांना मी सांगेन. चल लवकर तुझी तयारी करून देते. (मनोरमा प्रमीलला घेऊन जाते. क्षणभर दिवाणखाना रिकामा आहे. तोच दोन्ही कोपऱ्यांतले दोन्ही फोन्स एकाच वेळी वाजू लागतात. दोन वेगवेगळ्या खोल्यांतून रेखा व नितीन बाहेर येतात व रिसीव्हर उचलतात.)

**रेखा** : हॅलो, कोण? प्रिया! कोण प्रिया?

**नितीन** : हॅलो. मिलिंद! कोण मिलिंद?

**रेखा** : अय्या मिलिंद! माझा फोन. (फोनवर) सॉरी मिस प्रिया रॉंग नंबर. (रिसीव्हर ठेवते नि विरुद्ध कोपऱ्यातील फोनकडे जाते.)

**नितीन** : प्रिया! (रिसीव्हर रेखाच्या हाती देतो नि आपला फोन घ्यायला जातो.) हॅलो प्रिया; मी नितीन. हो. आता फोन घेतला होता तो ताईनं. आमच्या धांदरट बहिणीनं. (रेखा रागाने पाहाते.)

**रेखा** : आमचे बंधुराज असेच! कुणाचाही फोन आपला समजून घेतात.

**नितीन** : हो – हो. पण मला नाही येता आलं! खूप वाट पाहिलीस?

**रेखा** : च्‌ च्‌ च्‌ (नितीन रागाने पाहातो. रिसीव्हरवर हात ठेवीत) तुझ्याबद्दल नाही. मघापासून तीन रॉंग नंबर लागले मिलिंदला. (हात काढून घेत) जाऊदे रे. पब्लिक फोनमधून फोन केला की असंच होतं.

**नितीन** : असं नाही होणार. (रेखा पाहाते.) खरंच नाही. उद्या नक्की येतो– संध्याकाळी.

**रेखा** : संध्याकाळी नाही जमायचं रे! दुपारचा 'शो' पाहू. 'समर ऑफ

फॉर्टी टू' आमचे डीनसुद्धा म्हणाले की, प्रत्येक मुलामुलीनं जरूर पाहावं असं चित्र आहे.

नितीन : काही अर्थ नाही. उगीच वेळेचा नि पैशाचा अपव्यय! कॉलेजची ट्रीप म्हटली की महिन्याचं रेशन सुटतं प्रोफेसरांचं. (हसतो. रेखाही हसते.) (याच वेळेस कमिशनर ऑफ पोलीस — सदानंद येतात. जिन्याखालच्या भागात उभे राहतात, नि पाहातात. या वेळेस रेखा आणि नितीन फोनवर हळू आवाजात बोलत आहेत. नुसतं 'हूं, हं – हं, अं – अं' असे आवाज येत आहेत. सदानंद पुढे येतात. त्यांच्या चाहुलीनं दोघंही चपापतात.)

रेखा : सदाकाका. (फोन ठेवते.)

सदानंद : सदाकाका खाजगी ड्रेसात असताना. या ड्रेसात असताना मी आहे–

नितीन : कमिशनर ऑफ पोलीस मिस्टर सदानंद मोहिते. (फोन ठेवतो.)

सदानंद : करेक्ट! पण मी आलो तेव्हा दोन्ही आरोपींचा कसला कट चालला होता?

रेखा : कट कसला! मी आपली मैत्रिणीशी बोलत होते.

नितीन : नि मी मित्राशी.

सदानंद : शब्दांची थोडी अफरातफर होतेय. रेखा बोलत होती मित्राबरोबर नि नितीन मैत्रिणीबरोबर. (दोघंही चूप आहेत.) आरोपींकडून कबुली–जबाब काढून घेण्यात उभा जन्म गेला! बोला, नावं काय तुमच्या मित्रामैत्रिणींची? खरं सांगा. पोलिसासमोर खोटं चालायचं नाही.

नितीन : तिचं नाव प्रिया.

सदानंद : नाव चांगलं आहे! पण नावासारखीच आहे ना? (नितीन मान हालवतो.) (रेखाकडे पाहात.) आरोपी नंबर दोन! तुमचा जबाब?

रेखा : मिलिंद.

सदानंद : नाव अवघड वाटतं! पोरगा कसा आहे?

रेखा : हे काय सदाकाका?

सदानंद : काय करतो तुझा हा मिलिंद– नाही म्हणजे नुसतं प्रेमच करतो की दुसराही काही उद्योग करतो?

रेखा : वा! डॉक्टर आहे तो. आम्हांला प्रॅक्टिकल शिकवायला येतो.

सदानंद : प्रॅक्टिकल का? वाः वाः! (रेखा लाजते.) आणि तुझी प्रिया काय करते?

नितीन : आर्ट स्कूलला दुसऱ्या वर्षाला आहे.

सदानंद : म्हणजे कला आणि कायदा. चांगला विरोधाभास आहे. पण गुन्हा फार वाईट.

रेखा : कसला गुन्हा काका?

**सदानंद** : प्रेम करण्याचा ! आणि हा गुन्हा सिद्ध झाला तर त्याला शिक्षा एकच ! जन्मठेप ! ( हसतात ). ( आतून भिकोबा चहाचा ट्रे घेऊन येतो. रेखा व नितीनला एकेक कप देतो. )

**भिकोबा** : ( सदानंदाच्या हातात कप देतो. ) हा तुमचा चहा बिनसाखरेचा.

**सदानंद** : अरे वा ! न सांगता माझा चहा आणलास ?

**भिकोबा** : आत आवाज ऐकला तुमचा.

**सदानंद** : अरे, कमावलेला आवाज आहे. या आवाजालाच गुंड लोक घाबरतात गवई आणि पोलीस यांना आवाज कमवावाच लागतो. ( चहा पिऊ लागतो. आतून मनोरमा येते. भिकोबा आत जातो. )

**मनोरमा** : भाऊजी, आज बरेच दिवसांनी वाट चुकलात.

**सदानंद** : आमचं कामच तसं ! सूर्यालासुद्धा बारा तासांची ड्यूटी असते. पण आमची ड्यूटी चोवीस तास. रात्री-बेरात्री केव्हाही गुन्ह्यांचा तलाश करायला जावं लागतं.

**मनोरमा** : बरं झालं बाई, तुम्ही लग्न नाही केलंत ते ?

**सदानंद** : लग्न झालं असतं तर ही लाईनच नसती घेतली आपण ! जाऊ दे ते. पण आमची बछडी कुठे आहे ? उद्या रिझल्ट आहे तिचा.

**मनोरमा** : भाऊजी, तुमच्या ओळखीनं रिझल्ट आधी नाही का कळायचा ?

**सदानंद** : गलत बात ! माणसानं नेहमी कायदेशीर असावं. नि खरं सांगू वैनी, उद्या काय होणार ते आज कळून घेण्यात मजाही नाही. ( दारात प्रमील येते. ) त्यातून आमची बछडी पास होणार याची खात्री आहे आम्हांला. काय ग ? ( प्रमील सदानंदाला येऊन बिलगते. )

**मनोरमा** : ही आपली उगीच नर्व्हस झालीय सकाळपासून.

**सदानंद** : होय ग बछडे ? तू पास होणार— सकाळी मी पेढे घेऊन येणार ! पोलीस कमिशनरच्या लाडक्या बछडीला नापास करायची काय हिम्मत आहे एस्. एस्. सी. बोर्डाची !

**रेखा** : काका, प्रमील आता लहान का आहे बछडी म्हणायला ?

**सदानंद** : उद्या ही मोठी झाली— लग्न होऊन सासरी गेली नि मुलाची आई झाली तरी मी हिला बछडीच म्हणणार. माझा अधिकारच आहे तो, काय वैनी ?

**मनोरमा** : या दोघांना काय कल्पना भाऊजी, तुमचं तुमच्या बछडीवर किती प्रेम आहे ते ! रेखा, नितीन, तुम्हाला ठाऊक नाही. प्रमील सहा महिन्यांची असताना मी खूप आजारी पडले. हॉस्पिटलात ठेवली होती मला. यांना आपल्या कामापुढे वेळ कुठे होता ? पण भाऊजींनी प्रमीलला आपल्या घरी नेली. तिचं सारं-सारं केलं प्रत्यक्ष आई होऊन— एक वर्षभर !

**सदानंद** : उभ्या निष्पर्ण आयुष्यातला तेव्हढाच काय तो मोहरलेला काळ! किती वेळा आमचे कपडे खराब केले बछडीनं त्याला हिशेबच नाही. मोठे मोठे गुंड मला घाबरायचे, पण ही पोरटी मला हुकूम सोडायची. पोलीस ऑफिसरचा अगदी सखाराम करून ठेवला होता हिनं. (सगळे हसतात.) पण काय ग, रिझल्टनंतर काय करणार?

**मनोरमा** : तिला जायचंय संगीत ॲकेडमीत शिक्षण घ्यायला. आता तुम्ही तुमच्या मित्रांना सांगितलंत तरच.

**सदानंद** : दीनानाथला ना? नुसतं सांगणार नाही. करायला भाग पाडीन. आणि नाही ऐकलं तर तडीपार करीन तुमच्या नवऱ्याला. (घड्याळाकडे पाहातो.) आमचे मित्र इतक्यात येतील असं वाटत नाही. मी निघतो. रात्रौ मीटिंग आहे पोलीस-प्रमुखांची! (दारापर्यंत जातात – थांबतात) तुमच्या नवऱ्याला सांगा येऊन गेलो. उद्या सकाळी येईन पेढे खायला. त्यावेळी नाही भेटलास तर समन्स काढीन म्हणावं.

(हसत हसत निघून जातात.)

**नितीन** : काका म्हणजे एक अजब व्यक्ती आहे. पोलिसातले वाटतच नाहीत.

**रेखा** : ते फक्त आपल्या घरी! बाहेर त्यांचं नुसतं नाव ऐकलं तरी लोक थरथर कापतात.

**मनोरमा** : या घरावर त्यांचा विलक्षण लोभ! आमच्या लग्नाआधीपासूनची ओळख त्यांची-आमची.

(भिकोबा ट्रे उचलायला येतो.)

**भिकोबा** : पण तेव्हा पोलिसांत नव्हते! विमान का काय चालवायला शिकत होते. तेव्हा हा बंगलाही नव्हता. सिंगल खोली होती गोरेगावकरांच्या चाळीत.

**नितीन** : खरंच आई?

**मनोरमा** : हो!

**भिकोबा** : तिथे राहात असतानाच तर बाईसाहेब यायच्या साहेबांना भेटायला.

**रेखा** : म्हणजे आई, तुझा प्रेमविवाह झालाय बाबांशी?

(मनोरमा हसते.)

**नितीन** : खरं नाही वाटत– हल्लीच्या तुम्हा दोघांच्या वागण्यावरून.

**मनोरमा** : लोणच्यातल्या आंब्याला झाडावरल्या कैरीची आंबट-गोड चव कशी येईल?

**भिकोबा** : पटलं बाईसाहेब! पण बाईसाहेब, त्यावेळी सदानंद साहेबांचं पण लग्न ठरलं होतं. एकाच वेळी दोन्ही लग्नं करायचं ठरलं होतं.

**मनोरमा** : आपण खूप ठरवतो रे! पण भाऊजींच्या नशिबी जन्मभर एकटंच राहण्याचा शाप होता त्याला कोण काय करणार?

दीनानाथ —
प्रीफकेस

भिकोबा : तुम्हाला सांगतो नितीनसाहेब. त्यावेळी आमच्या साहेबांचा स्वभाव काय होता! अगदी गोड! बाईसाहेब भेटायला आल्या की तर विचारूच नका.

मनोरमा : छट्! काहीतरीच.

भिकोबा : आता काहीतरीच! तुम्ही आलात की साहेब मला सुट्टी द्यायचे. नि वर पैसे द्यायचे सिनेमा बघून यायला? आठवतं? (मनोरमा लाजते. नितीन-रेखा-प्रमील हसतात. भिकोबाही त्यात सामील होतो. नंतर नकळत मनोरमा त्या हसण्यात सामील होते. नि अचानक मोटारचा हॉर्न वाजतो. नि सगळे हसायचे थांबतात.) साहेब आले. (दाराकडे जातो. प्रत्येकजण अवघडल्या-सारखा झालेला आहे. तोच दारात दीनानाथ येतात. मध्यम वयीन— प्रौढ पण अजूनही ताठ चालणारा.)

(भिकोबा त्यांच्या हातातली ब्रीफकेस घेतो.)

दीनानाथ : भिकोबा, बंगल्याच्या दारावर पाटी कुणाच्या नावाची आहे?

भिकोबा : आपलीच साहेब!

दीनानाथ : म्हणून फाटकाचं दार मीच उघडायचं? गुरखा कुठे आहे? त्याला घेऊन ये.

भिकोबा : तो हॉस्पिटलात गेलाय. त्याच्या मुलाला अपघात झाला म्हणून.

दीनानाथ : मुंबईत रोज शेकडो अपघात होतात. त्याला जायची परवानगी कुणी दिली?

मनोरमा : मी.

दीनानाथ : ठीक आहे. गुरखा येईपर्यंत तुम्ही फाटकाचं दार उघडीत जा. (नितीन चिडून दीनानाथांकडे पाहातो. रेखा त्याला न चिडण्याबद्दल इशारा करते. दीनानाथ सोफ्यावर बसतो. भिकोबा बूट काढतो.) कुणी आलं होतं?

भिकोबा : सदानंदसाहेब आले होते.

दीनानाथ : हे आल्याबरोबर सांगायला काय झालं होतं?

(भिकोबा न उत्तर देता बूट नेऊन ठेवतो व सपाता आणून समोर ठेवतो.)

मनोरमा : चहा घेणार की एकदम जेवणार?

दीनानाथ : रोज तोच-तोच प्रश्न विचारू नका. तुम्हा लोकांची जेवायची वेळ झाली की जेवून घ्या. भिकोबा वाढील मला जेवावंसं वाटलं म्हणजे. (कोट व टाय काढून भिकोबाच्या अंगावर टाकतो. फोन वाजतो. दीनानाथ फोन उचलतो.) हॅलो! दीनानाथ हिअर! नो— याचा अर्थ मराठीत— नाही! ऑफिसची कामं ऑफिसात करतो मी. अँड यू नो धीस इज नॉट माय ऑफिस. गुड नाईट. (फोन बँग करतो.) बाय-द-वे, मघाशी माझे दोन्ही फोन्स एंगेज्ड का होते बराच वेळ?

**मनोरमा** : मला ठाऊक नाही.

**दीनानाथ** : तुम्हाला काहीच ठाऊक नसतं.

**नितीन** : एका फोनवर मी होतो नि दुसऱ्या फोनवर ताई होती.

**दीनानाथ** : तुमच्या मित्र-मैत्रिणींना वेळ जात नाही म्हणून फोन करण्यासाठी हे फोन्स मी घेतले नाहीत.

**नितीन** : ठीक आहे. उद्यापासून आम्ही पब्लिक फोन्सवरून फोन करू!

**दीनानाथ** : ही अक्कल आधीच सुचायला हवी होती. नाऊ गेट इन युअर रिस्पेक्टीव्ह रूमस् ॲन्ड स्टडी बोथ ऑफ यू! आय मीन इट! (नितीन व रेखा आपआपल्या खोल्यांत निघून जातात. दीनानाथ उठून जाऊ लागतात– जिन्याच्या रोखानं. तोच त्यांची नजर बावरून उभ्या असलेल्या प्रमीलकडे जाते.) उद्या रिझल्ट आहे तुझा?

**प्रमील** : हो.

**दीनानाथ** : नापास झालीस तर मी गय करणार नाही. आमच्या घराण्यात आजवर कुणीच नापास झालेलं नाही. फक्त माझा धाकटा भाऊ नापास झाला होता. पण तो पुन्हा घरी आला नाही. तो जिवंत आहे की मेला हेही मला ठाऊक नाही. कळलं?

**प्रमील** : हो. (खाली मोटारचा हॉर्न वाजतो.)

**मनोरमा** : मला वाटतं, वाट बघून बघून निलीमाच आली असेल गाडी घेऊन प्रमीलला न्यायला. (जिन्यावर चढणारा दीनानाथ थबकतो.)

**दीनानाथ** : कुठे न्यायला?

**मनोरमा** : मैत्रिणीबरोबर म्युझिकल कॉन्सर्टला! जाऊदे ना?

**दीनानाथ** : हे दुपारी मला ऑफिसात फोन करून विचारायला हवं होतं.

**मनोरमा** : पण मला वाटलं—

**दीनानाथ** : तुम्हांला काय वाटतं याचा या घरात संबंध नाही. मला जे वाटतं तेच या घरात घडतं. भिकोबा, बाहेर गाडीत जी कुणी प्रमीलची मैत्रीण आली आहे तिला सांग, प्रमील येणार नाही. कळलं?

(भिकोबा बाहेर जातो. प्रमील हिरमुसली होऊन आत निघून जाते. पाठोपाठ मनोरमा जाते नि शांतपणे एकेक पाऊल टाकीत दीनानाथ जिन्याच्या पायऱ्या चढू लागतो. नि याच वेळेस रंगभूमीवर हळूहळू अंधार होऊ लागतो.)

□

# अंक पहिला
## प्रवेश दुसरा

[ पहिल्या प्रवेशानंतरची पहाट. स्थळ तेच. रंगभूमीवर हळूहळू प्रकाश येऊ लागतो. पहाटे सहाचा सुमार असावा. रंगभूमीवर कुणीही नसतं. तोच बाहेरच्या प्रवेशद्वारातून हातात बॉक्स घेऊन भिकोबा प्रवेश करतो. तो आत यायला नि डाव्या बाजूच्या खोलीतून प्रमील बाहेर यायला एकच गाठ पडते. ]

**भिकोबा :** पमाताई, आज इतक्या सकाळी उठलात? बरोबर! रिझल्ट आज तुमचा!

**प्रमील :** पेपर नाही का रे आणलास?

**भिकोबा :** मी पहाटे पाचाला बाहेर पडलो. पाहातो तो पेढ्याच्या दुकानासमोर रांग नि पेपरवाल्यासमोरही रांगच. विचार केला आधी पेपर की आधी पेढे? शेवटी पेढेच घेऊन आलो.

**प्रमील :** आधी पेपर आणायचा.

**भिकोबा :** पेपरवाला आता टाकीलच पेपर. पण आयत्यावेळी पेढे कुठून आणायचे? तुम्ही पास होणारच! अहो, नितीनसाहेबांच्या नि रेखाताईंच्या वेळी आदल्या दिवशी रात्रीच पेढे आणून ठेवले होते. ( तोच आतून मनोरमा येते. )

**मनोरमा :** आणलेस पेढे?

**भिकोबा :** हे काय!

मनोरमा : जा नेऊन आत ठेव. आता संपली पूजा. (प्रमीलला पाहाते. भिकोबा जातो.) काय ग, आज रिझल्ट म्हणून लवकर उठलीस ? की रात्रभर झोपलीच नाहीस ? वेडी. उगीच काय घाबरायचं. आतापर्यंत प्रत्येक परीक्षेत वरचा नंबर काढलास. तू बैस. मी देवाला पेढे दाखवून येते. (मनोरमा आत जाते. प्रमील हॉलमधे अस्वस्थपणे फिरू लागते. वर असलेल्या दीनानाथांच्या खोलीकडे पाहाते. तोच आतल्या खोलीतून रेखा बाहेर येते.)

रेखा : अं! प्रमील, एव्हढी काय धास्ती घेतलीयस रिझल्टची ? म्हटलं मी आणि निनीन पण बसलो होतो एस्. एस्. सी. ला! अग, रिझल्टच्या दिवशी तर आईनं उठवलं मला पेपरात नंबर पाहिल्यानंतर.

प्रमील : तुम्हा स्कॉलर लोकांचं काय बाई...

रेखा : बघू बघू! तोंड बघू आमच्या पमाताईचं! (जवळ जात) मी सांगू ? तू रिझल्टला घाबरलेली नाहीस, बाबांना घाबरली आहेस. होय ना ? (प्रमील मान हलवते– होकारार्थी) उगीचच काय घाबरायचं बाबांना!

प्रमील : तू काल ऐकलं नाहीस, बाबा काय म्हणाले ते ?

रेखा : काय म्हणाले ?

प्रमील : म्हणाले, "नापास झालीस तर गय करणार नाही. आमच्या घराण्यात कुणी कधी नापास झालं नाही. एक भाऊ नापास झाला, पण तो पुन्हा घरी आला नाही!" ताई, त्यानं जीव दिला असेल का ग ?

रेखा : प्रमील! काही तरीच काय डोक्यात घेऊन बसलीयस. वेडे, परीक्षेच्या निकालापेक्षा आपलं आयुष्य जास्त मोलाचं आहे. जा, तू आपल्या खोलीत जाऊन पड पाहू. मी पेपर घेऊन येते. नंबर पाहाते नि तुला उठवते जा, जा पाहू. (रेखा तिला तिच्या खोलीत ढकलते. घड्याळाकडे पाहाते व बाहेर निघून जाते. घड्याळाची टिक-टिक वाढत्या प्रमाणात ऐकू येऊ लागते. आणि आतल्या खोलीतून प्रमील डोकावते. रेखा गेल्याची खात्री केल्यावर बाहेर येते. घड्याळाची टिक-टिक फारच मोठ्याने ऐकू येऊ लागते. तोच आवाज येतो– "पेपर ऽ". ती धावत दाराकडे जाते. पेपरवाल्याने टाकलेला पेपर घेऊन आत येते. कोचावर बसते नि आपला नंबर पाहू लागते. पेपर तिच्या हातून गळून पडतो. तोच वरून दीनानाथांचा आवाज येतो, "भिकोबा, पेपर आला की नाही ?" प्रमील भेदरलेल्या नजरेने वडिलांच्या खोलीकडे पाहाते. क्षणभर विचार करते नि घाईघाईने दाराबाहेर निघून जाते. आणि आतून मनोरमा बाहेर येते.)

मनोरमा : अग प्रमील, पेपर आला की नाही ? प्रमील ऽ ऽ कुठे गेली ही ? (प्रमीलच्या खोलीत डोकावते व परत येते तोच तिचं लक्ष खाली पडलेल्या पेपराकडे जातं. ती पेपर उचलते व नंबर पाहू लागते. नंबर आढळत नाही.

एखादा धक्का बसावा तसं तिला होतं. मुन्नपणे त्या कोचावर बसतात नि एकदम दचकून उठतात व नितीन- रेखाच्या खोलीकडे येतात.) नितीन ऽ- रेखा ऽ (नितीन बाहेर येतो.)

**नितीन** : काय झालं ग आई ?

**मनोरमा** : काय सांगू! आपली प्रमील नापास झाली.

**नितीन** : काय ? पाहू, पेपर पाहू. (पेपर घेतो. वाचू लागतो. त्याचीही निराशा होते.) तिला अजून कळलं नाही ना ?

**मनोरमा** : कळलं असणार! कारण मघाशी मी बाहेर आले तेव्हा प्रमील हॉलमध्ये होती. पेपरची वाट पाहात होती. मी देवासमोर पेढे ठेवून आले तो प्रमील नाही. पेपर इथे पडलेला.

**नितीन** : मग तिच्या खोलीत असेल.

**मनोरमा** : नाही रे. मी पाहून आले तिच्या खोलीत.

**नितीन** : थांब. मी रेखाच्या खोलीतून पाहून येतो. (धावत रेखाच्या खोलीत जातो. मनोरमा तशीच उभी आहे- अवाक. नितीन रेखाच्या खोलीतून जड पावलांनी परत येतो.) आई, प्रमील नाही नि रेखापण नाही खोलीत.

**मनोरमा** : म्हणजे ?

**नितीन** : आई, तू उगीच काळजी करतेयस! अग, रेखा तिला बाहेर कुठे तरी घेऊन गेली असेल समजावायला.

**मनोरमा** : मग देवच पावला! कारण हे उठले नि त्यांना प्रमील नापास झाल्याचं कळलं, तर पोरीची खैर नव्हती. (जायला वळते तोच हातात पेपर घेऊन आलेली- निराश झालेली रेखा दिसते.) हे काय तू एकटीच आलीस ? प्रमील.कुठे आहे ?

**रेखा** : म्हणजे ? मी एकटीच गेले होते पेपर आणायला.

**नितीन** : तुझ्याबरोबर प्रमील नव्हती ?

**रेखा** : नव्हती.

**मनोरमा** : मग गेली कुठे ही ? मला तर वेड लागायची पाळी आलीय.

**नितीन** : अग, बाबांच्या भीतीने एखाद्या मैत्रिणीकडे जाऊन बसली असेल.

**मनोरमा** : मग- मग मला असं चमत्कारिक का वाटू लागलंय ?

**रेखा** : अग, वैरी न चिंती- ते मन चिंती. तू स्वस्थ बैस पाहू. मी नि नितीन तिच्या प्रत्येक मैत्रिणीकडे जाऊन पाहून येतो. चल रे.

(नितीन नि रेखा निघून जातात. हॉलमध्ये उतरते एकटी मनोरमा. वरच्या खोलीतून दीनानाथ बाहेर येतात.)

**दीनानाथ** : भिकोबा ऽ-भिकोबा ऽ ऽ (भिकोबा आतून घाईघाईने येतो.)

**भिकोबा** : चहा आणू साहेब ?

**दीनानाथ :** चहा मग. आधी पेपर आला का बघ.

( भिकोबा पाहातो. मनोरमा पेपर छातीशी घट्ट धरून बसली आहे. )

ऐकू आलं नाही मी काय सांगितलं ते ?

**भिकोबा :** पेपर बाईसाहेबांकडे आहे.

**दीनानाथ :** घेऊन ये तो वर. ( भिकोबा मनोरमेकडे येतो. पण ती पेपर आणखीनच घट्ट धरून ठेवते. दीनानाथ वरून हे पाहातो व सावकाश खाली येतो. )

**दीनानाथ :** भिकोबा, जा तू आपल्या कामाला. ( भिकोबा जातो. )

( मनोरमेसमोर उभा राहून ) तो पेपर—

**मनोरमा :** ( घाबरून ) या पेपरात रिझल्ट आलेला नाही.

**दीनानाथ :** रिझल्ट की प्रमीलचा नंबर ? ( कठोरपणे ) तो पेपर—

( मनोरमा त्याच्याकडे न पाहाता पेपर त्याच्या हातात देते. दीनानाथ पेपर घेतो नंबर पाहातो. )

**दीनानाथ :** एकूण नापास झाली. माझं नाक कापलं कार्टीनं. कुठे आहे ती ?

**मनोरमा :** खरंच मनापासून अभ्यास केला होता तिनं. रात्र रात्र जागत होती. अंगात ताप असतानासुद्धा प्रिलीमला बसली पोर—

**दीनानाथ :** मी विचारलं, कुठे आहे प्रमील ?

**मनोरमा :** ती सकाळीच बाहेर गेलीय तुमच्या भीतीनं.

**दीनानाथ :** ती गेली की तुम्हीच पाठवलीत तिला ?

**मनोरमा :** मी कशाला पाठवू ? उलट मीच नितीनला आणि रेखाला पाठवलंय तिला शोधून आणायला.

**दीनानाथ :** ती घरी आली की मला सांगा.

**मनोरमा :** पण तुम्ही काही बोलू नका तिला. फार हळवी आहे पोर.

**दीनानाथ :** हळवी माणसं जगात जगायला लायक नसतात.

**मनोरमा :** असं कसं म्हणता ? अशा वेळी खरं म्हणजे तुमच्या सांत्वनाची गरज आहे तिला.

**दीनानाथ :** ते डिपार्टमेंट तुमचं आहे. तुमच्या लाडामुळेच हे झालं. बाहेर तोंड दाखवायला जागा ठेवली नाही पोरटीनं.

**मनोरमा :** जगात कुणाच्या मुली काही नापास होत नाहीत ?

**दीनानाथ :** होत असतील ! मी माझ्या मुलीविषयी बोलतोय. माझी मुलगी आहे ती. शाळेपासून कॉलेजपर्यंत प्रत्येक वर्षी फर्स्ट क्लास फर्स्ट येणाऱ्या दीनानाथ लाडांची ! तिला नापास होता येणार नाही, इतर सामान्य वडिलांच्या मुलीसारखं.

**मनोरमा :** म्हणजे तुम्हाला राग आलाय तो प्रमील नापास झाली म्हणून नाही

तर तुमच्या प्रतिष्ठेला धक्का बसला म्हणून.

**दीनानाथ** : तसं समजा हवं तर! प्रतिष्ठा आधी मिळवावी लागते. ज्याला ती मिळते त्यालाच तिला लागलेला धक्का जाणवतो! (एकदम) या क्षणी कार्टी माझ्यासमोर असती तर हंटरने फोडून काढली असती.

**मनोरमा** : दुसरं केलंत काय आयुष्यभर तुम्ही! स्वतःचा मोठेपणा राबवलात आमच्याकरवी. स्वतःचे हट्ट पुरवलेत आमच्या भावनांचा बळी घेऊन. आणि शिस्तीच्या नावाखाली तुरुंगाची कळा आणलीय या घराला.

**दीनानाथ** : झालं तुमचं बोलून? आता माझं ऐका! हे घर माझं आहे— यातलं वैभव माझं आहे. मी कमावलं आहे स्वतःच्या मेहेनतीवर— कर्तबगारीवर! इथली प्रत्येक गोष्ट माझ्या मर्जीप्रमाणे घडणार— माझा मोठेपणा माझ्या मर्जीप्रमाणे मी राबवणार. कारण त्या मोठेपणाची फार मोठी किंमत दिलीय मी.

**मनोरमा** : त्याची वसुली तुम्ही आमच्याकडून करणार? दीनानाथ, कशाला मिळवलंत हे वैभव— ही प्रतिष्ठा— हे मानमरातब! त्यापेक्षा जास्त सुखी होतो आपण त्या चाळीतल्या सिंगल खोलीमध्ये.

**दीनानाथ** : पण मी गुदमरत होतो त्या मध्यमवर्गाच्या खुराड्यात.

**मनोरमा** : त्या खुराड्यात माया होती— आपुलकी होती— प्रेम होतं! रेखा त्याच खुराड्यात जन्माला आली— तुम्हांला आठवतं, लहान असताना रेखाला गोवर आलं होतं. तिळाएव्हढी जागा शिल्लक नव्हती अंगावर! गादीवरसुद्धा तगमग चालायची तिची. तुम्ही रात्ररात्र तिला अंगावर घेऊन फिरवीत होता. नि प्रिलीमच्या आधी प्रमीलला सपाटून ताप भरला तर तिच्या अंगावरून कधी हातसुद्धा फिरवला नाही. असे कसे बदललात? कुठे गेले ते दीनानाथ! खरंच कुठे गेले! (हुंदका देते.)

**दीनानाथ** : बायकांनी मधून मधून असं रडत जावं. चांगला वॉश असतो डोळ्यांना. (वर जायला वळतो तोच दारात सदानंद आलेला दिसतो.) हॅलो सदा, काल तू येऊन गेलास ते कळलं मला. प्रमीलबद्दलही कळलं असेलच.

**सदानंद** : म्हणूनच मुद्दाम आलो. हे झालं कसं?

**दीनानाथ** : उत्तर सोपं आहे. अभ्यास केला नाही— नापास झाली.

**सदानंद** : नाही— नाही. काही तरी घोटाळा झालेला दिसतोय. आपण बोर्डाकडून पेपर मागवू या फेरतपासणीसाठी.

**मनोरमा** : मीही तेच सुचवणार होते.

**दीनानाथ** : त्याचा काही उपयोग नाही, उगीच पैशाचा नि वेळेचा अपव्यय.

**सदानंद** : पैसे मी खर्च करीन नि वेळही. पण आमची बछडी आहे कुठे?

**मनोरमा** : यांच्या भीतीने मैत्रिणीकडे जाऊन बसलीय सकाळपासून.

**दीनानाथ** : हातून गुन्हा घडल्याशिवाय माणूस तोंड चुकवीत नाही! तुला पटेलच हे.

**सदानंद** : दिना– आम्ही पोलीस लोकसुद्धा कधी कधी संशयाचा फायदा देतो. ( दीनानाथाला काय उत्तर द्यावं ते सुचत नाही. )

**दीनानाथ** : बरं मला सांग. तू काय घेणार? नुसता चहा की ब्रेकफास्ट!

( सदानंद फक्त दीनानाथाकडे पाहातो जळजळीत नजरेनं. तोच बाहेरील प्रवेशद्वारातून रेखा येते. )

**रेखा** : आई!

**मनोरमा** : आणलीस ना प्रमीलला?

**रेखा** : नाही! मी तिच्या चार-पाच मैत्रिणींकडे जाऊन आले, पण ती तिथे नव्हती. नितीन गेलाय तिच्या मास्तरांच्या घरी काही पत्ता लागतो का पाह्यला.

**मनोरमा** : ऐकलंत भाऊजी? तुम्ही तरी काही करा. मला तर काही सुचत नाही.

**सदानंद** : तुम्ही घाबरू नका वैनी मी असताना. ( फोनचे नंबर फिरवतो. ) हॅलो पोलीस हेडक्वार्टस्? मी कमिशनर मोहिते बोलतोय. सकाळपासून एक मुलगी बेपत्ता झालीय. वय सोळा वर्षे– गोऱ्या रंगाची– उंच– स्कर्ट घालणारी. वैनी, कुठल्या रंगाचा स्कर्ट घातला होता बछडीनं?

**मनोरमा** : निळ्या रंगाचा.

**सदानंद** : ब्लू रंगाचा स्कर्ट आहे अंगावर! नाव प्रमील दीनानाथ लाड. मी त्यांच्याच घरून बोलतोय. सर्व पोलीस स्टेशनांना खबर द्या. वायरलेसच्या गाड्या पाठवा. प्रत्येक बस-स्टॉप– रस्ता– स्टेशन– गाडी-बस तपासा. आणि मला कळवा. आय ॲम हिअर ऑन बीस लाईन २ ३ ५ ५ २ ६. थँक्यू! ( मनोरमा निश्चल बसली आहे. ) आमचं खातं फार हुशार आहे वैनी. ताबडतोब बछडीला शोधून काढून घेऊन येतील. ( रेखा येऊन मनोरमेजवळ बसते. दीनानाथ काही न बोलता पेपर उघडून वाचू लागतो. काही क्षण शांततेत जातात आणि दारात नितीन आलेला दिसतो. )

**रेखा** : आई, नितीन आला.

( मनोरमा धावत नितीनजवळ जाते. )

**मनोरमा** : घेऊन आलास ना प्रमीलला? ( तो नकारार्थी मान हलतो. ) नाही. तुम्हांला कुणाला काळजीच नाही. मलाच शोधायला हवं माझ्या पोरीला.

**नितीन** : आई, तिच्या सर्व मैत्रिणींकडे– मास्तरांकडे जाऊन आलो. बोर्डाच्या ऑफिसमध्ये पण जाऊन आलो. पण कुठेच पत्ता नाही तिचा.

**दीनानाथ** : जाऊन जाऊन जाणार कुठे ? भूक लागली की येईल आपोआप घरी.

(फोनची घंटा वाजते.)

**रेखा** : काका, नक्की तुमचा फोन. (सदानंद घाईघाईने फोन घेतो.)

**सदानंद** : हॅलो, कमिशनर सदानंद हिअर ! ओह ! दीनानाथ युअर कॉल.

(दीनानाथ रिसिव्हर उचलतो.)

**दीनानाथ** : हॅलो ! मी दीनानाथ बोलतोय. हे पाहा तुमच्या खोट्या सांत्वनाची मला गरज नाही. माझी मुलगी नापास झाली आहे. तुम्हांला शोकसभा बोलवायची असेल तर बोलवा– अध्यक्षही मिळेल. मंत्रिपद न मिळालेले खूप पुढारी रिकामे आहेत. यू इडियट !

(फोन बँग करतो व जाऊ लागतो. पुन्हा तोच फोन वाजतो. दीनानाथ घेतो.)

**दीनानाथ** : दीनानाथ हिअर. होय, माझी मुलगी नापास झाली आहे. ओह ! सॉरी, सदानंद, इट इज फॉर यू.

(सदानंद फोन घ्यायला येतो. मनोरमा, नितीन, रेखा फोनभोवती जमतात.)

**सदानंद** : यस, कमिशनर मोहिते हिअर ! लागला शोध त्या मुलीचा ?

(मनोरमा एकदम रेखाला मिठी मारते.)

**मनोरमा** : भाऊजी, त्यांना म्हणावं लवकर घेऊन या प्रमीलला. तिला केव्हा एकदा पोटाशी धरीन असं झालंय.

**सदानंद** : काय ? नो– नो इट कांट बी. ती दुसरी कुठली तरी मुलगी असेल. काय ? तिच्या खिशात चिठ्ठी सापडली ? तिच्यावर नाव व पत्ता आहे ? येस, मी येतो. (फोन ठेवतो.)

**मनोरमा** : काय झालं भावजी ? बोला ना. प्रमील सापडली ना ? मग चला ना तिला आणायला.

**सदानंद** : तिला आणायलाच जायचंय वैनी. पण तिच्या निर्जीव देहाला ! बछडे, बछडे काय करून बसलीस तू हे !

**रेखा** : काय केलं प्रमीलनं ?

**नितीन** : सांगा काका, काय केलं प्रमीलनं ?

**सदानंद** : आत्महत्या ! लोकलखाली !

**मनोरमा** : नाही, नाही ! हे खोटं आहे भावजी. सांगा, सांगा हे खोटं आहे म्हणून.

**सदानंद** : हे खोटं आहे हे सांगता आलं असतं मला वैनी तर माझ्यासारखा भाग्यवान मीच ठरलो असतो. पण हे खरं आहे. तिच्या खिशात चिठ्ठी सापडली तुमच्या नावानं लिहिलेली. ती वाचून दाखवली मला इन्स्पेक्टरनं. तिनं लिहिलंय, "बाबांना तोंड दाखवायला भीती वाटते म्हणून मी जिवाचा शेवट करून घेत आहे."

**मनोरमा** : भाऊजी, तुमची बछडी रुसली आमच्या सगळ्यांवर ! गोऱ्या गोऱ्या रंगाची, कुरळ्या कुरळ्या केसांची, हरिणीसारखी भित्री, लाजरी ! कसा हो धीर झाला तिला एवढा ? एवढी धीट कशी झाली ती ?

**रेखा** : आई !

**मनोरमा** : तिचं नाव संगीत ॲकेडमीत घालणार होता तुम्ही ! पण तुम्हांला फसवलं तुमच्या बछडीनं. गेली उडून या पिंजऱ्यातून. सुटली बिचारी सैतानाच्या कचाट्यातून.

**सदानंद** : वैनी, प्लीज. आपल्याला तिची बॉडी ताब्यात घ्यायला जायचंय. उशीर झाला तर या प्रकाराला आणखी फाटे फुटतील— नि बदनामी होईल या घराची.

**नितीन** : आणखी काय बदनामी व्हायची राहिलीय या घराची !

**रेखा** : नितीन.

**नितीन** : ताई, काय झालं ग हे ? ( तोंड झाकून हुंदका देतो. )

**रेखा** : नितीन, आपणच असा बांध सोडला, तर आईचा बांध कुणी अडवायचा !

**मनोरमा** : भाऊजी, चलायचं ना प्रमीलला आणायला ? एकटी असेल ती तिथं.

**सदानंद** : वैनी, तुम्ही इथंच थांबा. दीनानाथ, तू चल.

**मनोरमा** : त्यांना कशाला ? पण घ्या, त्यांनाही बरोबर घ्या— तिथे जाताच अडकवून ठेवा तिथे— पोटच्या पोरीच्या खुनाच्या आरोपावरून. भाऊजी ( विकल होते ) याने— या सैतानाने बळी घेतला हो माझ्या प्रमीलचा. ( कोसळू लागते तोच रेखा व नितीन तिला सावरतात व आत घेऊन जातात. सदानंद जाऊ लागतो. मागोमाग दीनानाथ जातो एखाद्या अपराध्यासारखा नि अचानक पिआनोचे सूर ऐकू येऊ लागतात. प्रमीलने वाजवलेले. नि ते सूर ऐकू येत असतानाच रंगमंचावर काळोख होऊ लागतो. )

☐

दीनानाथाच्या खुर्चीसमोर आणतो.]

अंक पहिला

प्रवेश तिसरा

[ मागील प्रवेशानंतर एक महिन्याचा काळ लोटलेला आहे. स्थळ तेच. वेळ सकाळची नऊची. रंगभूमी प्रकाशमान होते तेव्हा दिसतं की पिआनो बंद करून ठेवलेला आहे व त्याच्या वर प्रमीलचा फोटो ठेवला आहे. फोटोला हार घातलेला आहे. वरून दीनानाथ येतो– मॉर्निंग गाऊनमधे. तो आपल्या खुर्चीवर येऊन बसतो. तोच आतून भिकोबा ब्रेक-फास्टची ट्रॉली घेऊन येतो व दीनानाथाच्या खुर्चीसमोर आणतो. ]

**दीनानाथ** : भिकोबा, आज बाईसाहेब नाही घेणार ब्रेक-फास्ट ?

**भिकोबा** : नाही. आजकाल तर नीट जेवत पण नाहीत.

**दीनानाथ** : हं.

**भिकोबा** : नि आज तर उपास आहे बाईसाहेबांचा.

**दीनानाथ** : व्रत आहे वाटतं एखादं ?

**भिकोबा** : नाही. पमाताईला जाऊन आज एक महिना झाला.

**दीनानाथ** : ओह ! काही हरकत नाही. अधूनमधून लंघन ठीक असतं प्रकृतीला.

**भिकोबा** : हे काय ? काहीच खाल्लं नाही तुम्ही !

**दीनानाथ** : खाण्यासारखं काही चांगलं केलंस तर खाता येईल ना ! रोज तोच तोच ब्रेक-फास्ट ! तेच तेच काम– तेच तेच चेहरे. ( ब्रेक-फास्ट ट्रॉली पायाने ढकलतो. ) जा तो ब्रेक-फास्ट घेऊन.

( भिकोबा जातो. दीनानाथ पत्रं फोडू लागतो तोच प्रवेश-द्वारातून वॉचमन येतो. )

वॉचमन : साब.

दीनानाथ : काय आहे रे !

वॉचमन : ( त्याच्या हातात कार्ड देत ) यह साब मिलनेका मांगता.

दीनानाथ : ( कार्ड वाचत ) श्री. दिगंबर औदुंबर शाळीग्राम– इन्शुरन्स एजंट ! ( विचार करीत ) पाठवून दे त्यांना आत. ( वॉचमन सलाम करून जातो. दीनानाथ अर्धवट फोडलेलं पत्र वाचायला सुरुवात करणार तोच दारात एक व्यक्ती येऊन उभी राहाते. )

व्यक्ती : मी आत येऊ का ?

दीनानाथ : ( न पाहाता ) या. ( ती व्यक्ती त्याच्या समोर येऊन उभी राहाते. )

व्यक्ती : मी दिगंबर औदुंबर शाळीग्राम.

दीनानाथ : कार्डावर लिहिलेलं वाचलंय मी.

व्यक्ती : पण पुनः प्रत्ययाचा आनंद वेगळा असतो. मी बसू का ?

दीनानाथ : बसा. काय काम होतं ? ( ती व्यक्ती बसते. )

दिगंबर : काम तसं महत्त्वाचं— कॉन्फिडेन्शियल होतं— मी बोलू का ?

दीनानाथ : बोलता तर आहात.

दिगंबर : त्या व्यक्तिगत कामाबद्दल बोलू का ?

दीनानाथ : काय बोलायचं ते लवकर बोला. मला इतर बऱ्याच अपॉइंटमेंट्स आहेत.

दिगंबर : आपण कामाची माणसं.

दीनानाथ : कामाचं बोला.

दिगंबर : ( घसा खाकरून ) गेल्या महिन्यात आपल्या एका मुलीनं आत्महत्या केली.

दीनानाथ : मग ?

दिगंबर : त्या मुलीचा आमच्या विमा कंपनीत एक लाखाचा विमा उतरला होतात आपण.

दीनानाथ : हो ! मॅरेज-पॉलिसी होती ती.

दिगंबर : त्याबद्दल आपला क्लेम अजून आलेला नाही.

दीनानाथ : हेच तुमचं कॉन्फिडेन्शियल – महत्त्वाचं काम ?

दिगंबर : नाही— पुढे बोलू का ?

दीनानाथ : ( जांभई देत ) बोला.

दिगंबर : म्हणजे काय आहे की तुमचा क्लेम जरी आमच्याकडे आला तरी तो पास होईल याची खात्री नाही.

दीनानाथ : अस्सं!

दिगंबर : कारण सांगू का?

दीनानाथ : अहो, प्रत्येक गोष्टीत परवानगी कसली विचारता? सांगा.

दिगंबर : कारण असं की, वर्तमानपत्रातून ज्या बातम्या येत आहेत, त्यावरून तुमच्या मुलीनं आत्महत्या केली असाच समज झालेला आहे.

दीनानाथ : खरा आहे तो.

दिगंबर : असू द्या हो, पण विमा कंपनीच्या कायद्यात आत्महत्या बसत नाही. नॅचरल डेथ— म्हणजे नैसर्गिक मरण आलं तरच क्लेम मिळू शकतो.

दीनानाथ : मला नाही मिळाला तरी चालेल.

दिगंबर : अहो, पण एक लाख रुपयांवर पाणी सोडायचं म्हणजे! मी एक मार्ग सुचवू का?

दीनानाथ : (घड्याळाकडे पहात) तुम्ही असं करा. तुम्हांला जे काही सुचवायचं असेल ते ऑफिसमध्ये येऊन माझ्या सेक्रेटरीला सुचवा.

दिगंबर : असा उलटा घास कशाला! मी जास्त वेळ घेणार नाही आपला. तुमचे मित्र आहेत मोहिते पोलीस कमिशनर. त्यांना सांगून केस हुश अप करायची. नि वर्तमानपत्रवाल्यांची मूठ दाबायची.

दीनानाथ : झालं तुमचं बोलून? मिस्टर औदुंबर दिगंबर—

दिगंबर : दुरुस्ती सुचवू का?

दीनानाथ : कसली?

दिगंबर : माझ्या नावातली. औदुंबर हे माझे वडील. मी दिगंबर.

दीनानाथ : दॅट मॅटर्स अ लिटील. तेव्हा मिस्टर दिगंबर औदुंबर शाळीग्राम, आपण जाऊ शकता. मला क्लेमची आवश्यकता नाही. (दीनानाथ उठून फोनकडे जाऊ लागतो. मागोमाग दिगंबर येतो.)

दिगंबर : यात कर्मीपणा कसला? अहो, मागे एका मंत्र्याच्या मुलीची डेड बॉडी अशीच रेल्वे लाईनवर सापडली होती. झालीच की नाही केस हुश अप.

दीनानाथ : आपण वॉचमनबरोबर आत आलात. त्याच्याबरोबर बाहेर जायची आपली इच्छा आहे का?

दिगंबर : नको, मी एकटाच जातो. (दारापर्यंत जातो.) आपल्या कानावर घालू का? (दीनानाथ रागाने पाहातो) माझं कार्ड आपल्या टेबलावर आहे. कधी गरज लागलीच तर बोलवा (जातो. दीनानाथ त्या कार्डाचे फाडून तुकडे करतो व ॲश ट्रेमध्ये टाकतो. दीनानाथ मघाचंच वाचायला घेतलेलं पत्र घेतो व वाचू लागतो. वाचता वाचता त्याचा चेहरा रागाने फुलून येतो.)

दीनानाथ : भिकोबा. (भिकोबा येतो.) –

भिकोबा : काय साहेब?

दीनानाथ : रेखा आणि नितीनला मी बोलावलंय म्हणून सांग— आत्ता !
(भिकोबा जातो. दीनानाथ ते पत्र पुन्हा वाचू लागतो. तोच भिकोबा व मागोमाग रेखा व नितीन येतात.) भिकोबा, वर जाऊन माझे ऑफिसला जाण्याचे कपडे काढून ठेव. (भिकोबा वर निघून जातो.) रेखा, नितीन मी तुम्हा दोघांना का बोलावलं याची कल्पना आहे तुम्हाला ?

रेखा }
नितीन } : नाही.

दीनानाथ : तुम्हा दोघांना मी कॉलेजात घातले ते शिक्षणासाठी– माझ्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी नाही.

रेखा : म्हणजे बाबा !

दीनानाथ : वर तोंड करून विचारतेस ? हा मिलिंद कोण ? आणि नीतीन ही प्रिया कोण ? (रेखा आणि नितीन दोघंही गप्पच आहेत.) तुम्ही नाही दिलं उत्तर तरी या पत्रात त्याचं उत्तर आहे.

नितीन : कुणाकडुन आलं हे पत्र ?

दीनानाथ : त्याच्याशी तुम्हांला कर्तव्य नाही.

रेखा : बाबा, उगीच कुणी तरी खोटंनाटं पत्र पाठवलं नि त्यावर विश्वास ठेवता तुम्ही.

दीनानाथ : म्हणजे तुझी मिलिंद नावाच्या डॉक्टरबरोबर ओळख नाही ?

रखा : ओळख असणारच ! आम्हांला प्रॅक्टिकल शिकवायला येतात ते.

दीनानाथ : मला वाटतं सर्जरीचं प्रॅक्टिकल ऑपरेशन थिएटरमध्ये घेतात— सिनेमाच्या थिएटरमध्ये नाही.

रेखा : म्हणजे, बाबा...

दीनानाथ : हा तुझा नि त्या मिलिंदचा मेट्रो सिनेमात शिरतानाचा फोटो. (पाकिटातून फोटो काढून तिच्या हातात देतात.) ऍनी एक्सप्लनेशन ?

रेखा : नो !

दीनानाथ : देन इट मस्ट बी स्टॉपड इमिजीएटली ! यू कॅन गो. (रेखा आपल्या खोलीकडे जाऊ लागते.) रेखा, यानंतर माझ्या कानावर याबाबतीत काही आलं तर— यू नो धी कॉन्सिक्वेन्सिस. (रेखा दीनानाथकडे एकवार पाहाते व निघून जाते. नितीनकडे पाहात— ) नाऊ युवर ऑनर– आता आपली केस.

नितीन : तुम्ही कशाला तसदी घेता सांगण्याची. पत्रात लिहिलंय ते खरं आहे. माझं प्रियावर प्रेम आहे. आम्ही फिरायला जातो, सिनेमाला जातो.

दीनानाथ : आपला स्पष्टवक्तेपणा मला आवडला ! पण हे सारे षोक कुणाच्या जिवावर चालवले आहात आपण शंभूराजे ?

**नितीन :** तुम्ही दिलेल्या पॉकेट-मनीवर.

**दीनानाथ :** पोरींना घेऊन फिरण्यासाठी– सिनेमा पाहाण्यासाठी पॉकेट-मनी मी तुला देत नाही.

**नितीन :** या महिन्यापासून आपण पॉकेट-मनी बंद करू शकता.

**दीनानाथ :** नुसता पॉकेट-मनी नाही. या घराचा दरवाजासुद्धा.

**नितीन :** पण ही जबरदस्ती का ? मी नि ताई काही लहान नाही आता. आमचं हित-अनहित आम्हांला कळतं.

**दीनानाथ :** नो मोर डिस्कशन्स. या घरात राह्यचं असेल तर मी सांगेन तसंच वागायला हवं.

**नितीन :** उद्या तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे लग्नही ठरवाल आमचं—

**दीनानाथ :** ते मी कधीच ठरवलंय. नाऊ, गो इन युअर रूम. दॅटस ऑल. ( उठून जिन्याकडे जाऊ लागतात तोच दारात उभा असलेला सदानंद दिसतो. हॅलो सदानंद, गुड मॉर्निंग.

**सदानंद :** गुड मॉर्निंग. ( नितीन आत निघून जातो– चरफडत. )

**दीनानाथ :** आज खूप दिवसांनी आठवण झाली या घराची ?

**सदानंद :** खरं सांगू ? त्या दिवसापासून, आमची बछडी नसलेल्या या घरात यायला मनच घेत नव्हतं. पण मुद्दाम आलो आज.

( हातातल्या पुडीतला हार काढतो नि प्रमीलच्या फोटोला घालतो. तसाच क्षणभर उभा राहातो— वळतो नि डोळे टिपतो. )

**दीनानाथ :** तुम्ही पोलीस खात्यातले लोक इतके सेंटीमेंटल असाल असं वाटलं नव्हतं.

**सदानंद :** पोलीस खात्यातसुद्धा माणसंच असतात— वरून येताना काळजाचा छोटा का होईना पण तुकडा घेऊन आलेली ! ते जाऊदे. वैनी कशा आहेत ?

**दीनानाथ :** उपास चालू आहेत तिचे. पुढारी बनण्याची लक्षणं.

**सदानंद :** वैनी का जेवत नाहीत हे जसं काही तुला ठाऊकच नाही.

**दीनानाथ :** जाणारा जातो, पण इथे राहाणाऱ्याने त्यासाठी स्वतःच्या जिवाचे हाल का करून घ्यायचे ?

**सदानंद :** दीनानाथ, अरे, कुठल्या दगडानं घडवलंय तुझं काळीज परमेश्वरानं ! अरे, फुलासारखी निरागस अशी तुझी मुलगी— तिनं आत्महत्या केली तरी तुला त्याचं काही वाटलं नाही. तिच्यासाठी एक टिपूसही आलं नाही तुझ्या डोळ्यांत.

**दीनानाथ :** अश्रू हे भित्र्या लोकांचं लक्षण आहे. मला अश्रूंची कीव येते— स्वतःच्या नव्हे दुसऱ्यांच्याही !

**सदानंद** : पण दीनानाथ, तुला जेव्हा अश्रूंचा खरा अर्थ कळेल तेव्हा तुझ्याकरता एक अश्रू ढाळायला उरणार नाही कुणीही तुझ्याजवळ.

**दीनानाथ** : (उठत) मी त्या दिवसाची वाट पाहीन. (तोच वरून भिकोबा खाली येतो.) भिकोबा, काढून ठेवलेस माझे कपडे व्यवस्थित ?

**भिकोबा** : होय साहेब. (आत जातो.)

**दीनानाथ** : मी आलोच ड्रेस चेंज करून. तू बैस तोवर तुझ्या दुःखी वैनीचं सांत्वन करीत.

(जिन्यावरून वर जातो व आपल्या खोलीचं दार बंद करून घेतो. सदानंद तो गेलेल्या दिशेकडे पाहात राहातो— वळतो–पाहतो. आतल्या खोलीतून मनोरमा बाहेर आलेली आहे.)

**मनोरमा** : भाऊजी, आज आठवण झाली ?

**सदानंद** : आठवण रोज यायची वैनी, पण—

**मनोरमा** : तुमची बछडी नाही या घरात म्हणून आवडेनासं झालं हे घर ?

**सदानंद** : वैनी, कशाला उगीच त्या दुःखद स्मृती उगाळता ?

**मनोरमा** : मी तरी काय करू भाऊजी ! जन्म दिला होता मी त्या पोरीला. नऊ महिने भार वाहिला होता हो तिचा ! अजून महिनासुद्धा संपला नाही हो तिला जाऊन.

**सदानंद** : तुमचं दुःख मी जाणतो वैनी. पण तुम्हांला रेखा आहे— नितीन आहे मला कोण आहे ? माझ्या बछडीशिवाय ?

**मनोरमा** : भाऊजी, काल रात्री मी इथे एकटीच बसले होते. एकटीच ! नि एकदम पिआनो वाजू लागला. मी पाहिलं भाऊजी, प्रमील पिआनो वाजवीत होती. मला जवळ आलेली पाहताच म्हणाली, “ आई, मी खरंच खूप अभ्यास केला होता ग ! कशी झाले मी नापास ? बाबांचा राग गेला ना आता ? त्यांना म्हणावं तुमच्या भावाप्रमाणे नापास झाले म्हणून मी पण नाही घरी परत आले. ” (बोलत बोलत पिआनोकडे जातात व त्यावर मान टाकून हुंदका देतात.)

**सदानंद** : वैनी, आता हे विसरून जायला हवं तुम्हांला.

**मनोरमा** : विसरले असते हो ! त्यांनी एका शब्दाने मला विचारलं असतं ? दुःख वाटून घेतल्याशिवाय कमी होत नाही भाऊजी. तुमचं लग्न झालं असतं तर कळलं असतं तुम्हाला.

**सदानंद** : लग्न न करताही अपत्यविरहाची शिक्षा दिलीय मला देवानं.

**मनोरमा** : देव ! नका नाव घेऊ या देवाचं या घरात ! खूप केलं हो मी देवाचं प्रमीलसाठी— ती परत यावी म्हणून किती नवस बोलले; पण नाही आली दया त्याला. मग मी कशाला पर्वा करू त्याची ! आमच्या घरात तुम्हांला

एकही देव सापडणार नाही.

सदानंद : वैनी !

मनोरमा : सगळ्यांना बुडवून आले मी समुद्रात ! त्यांनाही कळू दे बुडून मरताना काय यातना होतात त्या.

(हुंदका देऊन आत निघून जातात. सदानंद तसाच उभा राहातो. तोच आतल्या खोलीतून कॉलेजला जायच्या तयारीत असलेली रेखा येते.)

रेखा : काका ! (तो वळतो.) आज तुम्ही हे पाह्यलंत ना, ते रोज पाहावं लागतं आम्हांला प्रमील गेल्यापासून.

सदानंद : फार लावून घेतलेलं दिसतंय वैनींनी मनाला.

रेखा : काही खात नाही— जेवत नाही. सारखी या पिआनोजवळ येऊन बसते. रात्री मधेच उठून बाहेर येते व सांगते, ‘प्रमील पिआनो वाजवतेय ! तुम्हांला नाही ऐकू येत ? मला येतोय.’ नि मग एकटीच रडत बसते. काका, तुम्ही का नाही समजावीत तिला !

सदानंद : काही काही दुःखं समजावण्याच्या पलीकडली असतात. रेखा, जमिनीला पडलेल्या भेगा भरून येतात- फुलून येतात पावसाच्या एका सरीनं ! पण काळजावर पडलेले ओरखडे भरून येत नाहीत अश्रूंच्या संतत धारेनंसुद्धा !

रेखा : काका, मला वाटतं बाबांनी समजूत घातली असती आईची तर कदाचित आई हे दुःख विसरूही शकली असती.

सदानंद : वैनी तेच म्हणाल्या मघाशी ! पण दीनानाथ मुलखाचा हट्टी नि एककल्ली. स्वतःच्या मनातल्या मनात रडेल. पण बाहेर एक अश्रू दिसायचा नाही.

रेखा : आणि तुम्ही त्या दिवशी प्रमीलला इथे आणल्यानंतर एखाद्या लहान मुलासारखे रडलात.

सदानंद : बाहेर कुणाला सांगू नकोस हे ! लोक विश्वास नाही ठेवायचे. त्यांना खरं नाही वाटायचं.

रेखा : काका, तुम्ही असे हळवे. नि बाबा तसे कठोर ! तुमची मैत्री तरी कशी जमली म्हणते मी.

सदानंद : रेखा, ही मैत्री मोठी अजब चीज आहे. (खोलीचं दार उघडून दीनानाथ जिन्यावर येतो— थबकतो.) ती होते ! तळ्यातल्या चिखलात कमळ फुलतं. नि त्याच तळ्यातल्या चिखलात बेडूकही असतात. पण बेडकाची नि कमळाची मैत्री झालेली पाहिलीस तू कधी ? उलट कमळाशी मैत्री करायला दूरच्या रानावनातून भ्रमर येतो.

दीनानाथ : (वरून) बहोत खूप सदानंद ! (खाली उरतात) तू कवीही आहेस

याची कल्पना नव्हती मला.

रेखा : कवी व्हायला तसंच संवेदनाक्षम मन असावं लागतं.

दीनानाथ : आणि पेनमधे शाई नसली तरी डोळ्यांत पाणी असावं लागतं.

(तोच दारात तारवाला येतो. व 'तार' म्हणून ओरडतो. भिकोबा येतो. तार घेतो. रेखा त्याच्या हातून तार घेते व सही करते. भिकोबा आत जातो.)

रेखा : (दीनानाथच्या हाती तार देत.) तुमच्या नावाची आहे.

(दीनानाथ फोडतो व वाचतो व एकदम ओरडतो 'काय!')

सदानंद : कुणाची तार?

दीनानाथ : एस्. एस्. सी. बोर्डाची.

रेखा : कशाबद्दल आहे?

दीनानाथ : निकालातील नंबरात एका शून्याचा चुकून फरक पडला होता. प्रमील पास झाली आहे.

रेखा : आई ग ऽ (रडत रडत जाऊ लागते. याच वेळी नितीन आतल्या खोलीतून येतो.)

नितीन : काय झालं ताई?

रेखा : आपली प्रमील पास झाली, नितीन. (नितीन नुसता पाहात राहातो.) बोर्डानं आपली चूक कळवली,

दीनानाथ : मी केस करीन बोर्डावर. सगळ्या प्रमोटर्सना कोर्टात खेचीन.

सदानंद : ते तू करशील स्वत:साठी – स्वत:च्या आत्मप्रौढीसाठी— स्वत:च्या प्रतिष्ठेचं जाहीर प्रदर्शन करण्यासाठी, पण हे करूनही आमची चछडी नाही परत यायची! दीनानाथ माझ्या हाती सत्ता असती तर मुलीच्या खुनाच्या आरोपाखाली मी तुला फाशीवर लटकावला असता.

दीनानाथ : का? प्रमीलने आत्महत्या केली.

सदानंद : तू करायला लावलीस? अरे, बोर्डानं फक्त एका शून्याची चूक केली पण तुझ्यामुळे एक निरागस जीवन शून्यात विलीन झालं.

दीनानाथ : माझ्यामुळे?

सदानंद : होय! तिला थोडी जरी खात्री असती तुझ्या तिच्यावरल्या ममतेची तर तिने नसता दिला जीव. तुझ्या कुशीत शिरून म्हणाली असती, "बाबा, बोर्डाची काही तरी चूक होतेय हो! मी नापास होणं शक्य नाही. तुम्ही पेपर मागवून घ्या."

दीनानाथ : मग, का आली नाही?

नितीन : हे तुम्हीच विचारता? तुम्हीच सांगितलीत ना तिला घरी परत न आलेल्या तुमच्या भावाची गोष्ट? कुणी काही म्हणा पण मी जगाला ओरडून

सांगेन की, या हृदयशून्य माणसानं खून केला आपल्या मुलीचा.

रेखा : नितीन, प्लीज.

**नितीन** : ( एकदम तोंड झाकून घेत ) प्लीज ! ताई ! देवानं असा सूड का ग घेतला प्रमीलवर ? ( आतून मनोरमा येते. )

**मनोरमा** : भिकोबा सांगत होता तार आलीय ! कुणाची तार आलीय भाऊजी ?

**सदानंद** : एस. एस. सी. बोर्डाची.

**मनोरमा** : कशाबद्दल ?

**सदानंद** : निकाल चुकीचा होता. आपली बछडी पास झालीय, वैनी.

**मनोरमा** : प्रमील पास झाली ? कुठे आहे ती तार ? ( दीनानाथ तार देतो मनोरमा वाचते— ) भाऊजी, तुमची बछडी पास झाली ! ऐकलंस रेखा, नितीन, भिकोबा, ( भिकोबा बाहेर येतो. मनोरमा आनंदाने— ) अरे, जा पेढे घेऊन ये, तोंड गोड कर सगळ्यांचं आपली प्रमील पास झालीय रे. ( हुंदका देत ) आपली प्रमील पास झालीय. ( खाली कोसळते. )

□

## अंक दुसरा
## प्रवेश पहिला

[ पहिल्या अंकातील दीनानाथांचा दिवाणखाना. वेळ संध्याकाळची. पडदा उघडतो त्यावेळी दिवाणखान्यात कुणीही नसतं. काही क्षणांतच आतल्या खोलीतून रेखा बाहेर येते. टेलिफोनकडे येते– बसते व नंबर फिरवते. ]

**रेखा** : हॅलो, मेडिकल होस्टेल? डॉक्टर मिलिंद आहेत का? मी रेखा लाड बोलतेय. ( याच वेळी बाहेरून नितीन येतो. तो तिचं बोलणं ऐकत उभा राहातो. ) काय? डॉक्टर मिलिंद डीनच्या ऑफिसात गेलेयत? ते आले की त्यांना सांगा मला फोन करायला. नंबर माहीत आहे त्यांना. ( फोन ठेवते. )

**नितीन** : ( उद्वेगाने ) फोन करा– प्रेम करा. काही माणसं नशीब घेऊन जन्माला येतात! नाही तर आम्ही.

**रेखा** : तुमचं काय झालं?

**नितीन** : दुसरं काय होणार, हिरो-हिरॉईनच्या मार्गात व्हिलन आल्यानंतर?

**रेखा** : व्हिलन?

**नितीन** : आमचे पिताजी.

**रेखा** : त्यांनी काय केलं?

**नितीन** : प्रियाच्या वडिलांना तंबी दिली. आणि बस्स! कालपासून प्रिया जाईल तिथे तिच्याबरोबर एक नोकर येऊ लागला! अगदी आर्ट स्कूलमध्येसुद्धा. ( दीनानाथांच्या फोटोकडे जातो. ) स्वतः प्रेम–विवाह केला नि आता आम्हांला

विरोध! त्यांच्या लग्नाच्या वेळी आपण पाहिजे होतो ग म्हणजे... (रेखा हसू लागते. नितीनच्या लक्षात येते. तो वरमतो.)

नितीन : नाही– तू हसणारच! तुझं व्यवस्थित चाललंय. मिलिंदला ना कुणी घरचं. होस्टेलमध्ये राहातो! छे! आमचे वडील म्हणजे एक वैताग आहे वैताग.

रेखा : नितीन, प्रियाचा नोकर तुला ओळखतो का रे?

नितीन : हो ना! तोच तर घोळ आहे.

रेखा : मग तू वेषांतर करून का जात नाही तिला भेटायला?

नितीन : तोही प्रयत्न केला; कालच दास्तानमधल्या दिलीपकुमारसारखी दाढी लावून उभा राहिलो आर्ट स्कूलच्या दरवाजात.

रेखा : मग?

नितीन : मी प्रियाशी काही बोलणार तोच नोकराने मला पकडलं. जाऊ दे— पुढचं नाही सांगत.

रेखा : म्हणजे नोकरानं तुला ओळखलं?

नितीन : पाहिल्याक्षणी.

रेखा : मला वाटतं त्यानं दास्तान पिक्चर पाहिलं असावं.

नितीन : अग, सिनेमातल्या लोकांपेक्षा घरचे नोकर जास्त हुशार असतात. असं वाटतं की या जगात बापाची जात नसती तर किती बरं झालं असतं! (पुन्हा वडिलांच्या तसबिरीकडे येतो.) कोण म्हणतो हिटलरनं आत्महत्या केली म्हणून? अजून जिवंत आहे तो आमच्या बाबांच्या रूपानं! पण हिटलरची सत्ताही टिकली नाही. त्याच्या डोळ्यादेखत कोसळलेली पाहावी लागली त्याला. (रेखाकडे येतो.) ताई, माझं एक काम करशील?

रेखा : प्रियाला भेटायचं हेच ना.

नितीन : ताई, तू कित्ती चांगली आहेस ग.

रेखा : कुठल्याही! नाटकातली ताई नेहमीच चांगली असते. दूर्वांची जुडीमधली बघ, दिवा जळू दे मधली बघ.

नितीन : तू सिरीअसली ऐकणार असशील तर सांगतो.

रेखा : बरं सांग.

नितीन : प्रिया तुला ओळखते. पण तिच्या घरचे कुणी तुला ओळखत नाहीत तेव्हा—

रेखा : मी तिला आर्ट स्कूलमध्ये गाठायचं.

नितीन : करेक्ट.

रेखा : तुझा निरोप तिला सांगायचा, आणि तिचा तुला.

नितीन : ताई हो तो ऐसी हो! (हसत हसत जायला वळतो तोच त्याचं लक्ष

पिआनोच्या मागे लावलेल्या प्रमीलच्या फोटोकडे जातं. तो थबकतो– वळतो.) ताई, आपल्या प्रमीलच्या फोटोकडे पाहिलं की वाटतं, एकदा रिव्हॉल्व्हर आणावा नि खून करावा स्वतःच्या मुलीचा बळी घेणाऱ्या या नराधमाचा. ( याच वेळी दारात दिगंबर औदुंबर शाळीग्राम येतात. )

**दिगंबर** : माफ करा. पण खुनाचा क्लेम देत नाही विमा कंपनी.

**नितीन** : आपण ?

**दिगंबर** : मी दिगंबर औदुंबर शाळीग्राम– विमा-एजंट.

**नितीन** : पुढे पत्ता सांगितला नाहीत हे नशीब. कुणाला भेटायचंय ?

**दिगंबर** : तुमचे वडील असलेच...

**नितीन** : दुर्दैवाने ते अजून आहेत.

**दिगंबर** : तसं नाही ! म्हणजे— दीनानाथ तुमचे वडील असलेच तर त्यांना भेटायचं होतं.

**नितीन** : ते माझेच वडील असून, अजून ते आले नाहीत.

**दिगंबर** : मी बसू का ते येईपर्यंत ?

**नितीन** : बसा. ( दिगंबर बसतो. रेखा जायला म्हणून उठते. )

**दिगंबर** : एक विचारू का ?

**नितीन** : विचारा.

**दिगंबर** : या आपल्या भगिनी का ?

**रेखा** : नाही ! मी याची बहीण ! भगिनी म्हणण्याइतकी प्रौढ झालेली नाही मी.

**दिगंबर** : मी खुलासा करू का ? (रेखा नुसती त्याच्याकडे पाहाते, ) भगिनी हा शब्द मी आदरार्थी– बहुवचनी वापरला होता. हवा तर परत घेतो.

**नितीन** : तुम्ही पुढारी आहात बोललेले शब्द परत घ्यायला ?

**दिगंबर** : नाही. मी सांगू का ? मी विमा एजंट आहे. क्लेम सेक्शनमध्ये असतो. मागल्यावेळी मी आलो होतो तुमच्या बहिणीच्या क्लेमबद्दल सांगायला.

**रेखा** : म्हणजे प्रमीलच्या क्लेमबद्दल ?

**दिगंबर** : हो, कारण त्यावेळी ती आत्महत्या वाटली होती. आता तो अपघात ठरला आहे.

**नितीन** : हे तुम्हाला कुणी सांगितलं ?

**दिगंबर** : आम्हांला ही माहिती जमवावी लागते. खरं सांगू का ? ही जादूची कांडी फिरली मोहिते साहेबामुळे ! अहो, आत्महत्त्येला क्लेम नाही. आता क्लेम घ्यायला काही हरकत नाही. लाखाची पॉलिसी होती.

**रेखा** : लाख मोलाची आमची प्रमील गेली. आता क्लेम काय जाळायचाय ?

**दिगंबर** : मी सुचवू का ? अहो, अचानक जाणाऱ्या माणसासाठीच विमा-योजना आहे.

**नितीन :** अहो, पण आम्ही क्लेम घेतला किंवा न घेतला त्यात तुमचा काय संबंध ?

**दिगंबर :** आपल्या निदर्शनास आणू का ? क्लेम आम्ही सेटल केला की ज्याला क्लेम मिळतो तो आम्हांला खुषीने कमिशन देतो. लाखावर दोन परसेंट धरलं तरी दोन हजार होतात.

**रेखा :** अगदी स्मशानात लाकडं विकणाऱ्या माणसाच्या इतकंच सहजपणे बोलताय.

**दिगंबर :** हे पोट मगळं करायला लावतं. दोनशे रुपये पगारात बारा माणसांचा संसार नाही चालवता येत. म्हणून मग कुणाच्या तरी मरणाची वाट पाहावी लागते– क्लेमच्या कमिशनसाठी.

**रेखा :** म्हणजे बारा माणसांचा संसार तुम्ही संभाळता !

**दिगंबर :** हो, त्याला इलाज नाही.

**रेखा :** इतर काही नातेवाईक राहतात तुमच्या घरी ?

**दिगंबर :** नाही ! हे आमचंच कर्तृत्व आहे. आम्ही दोघं नि दहा मुलं.

**नितीन :** मग ऑफिसात तुम्ही काम केव्हा करता ?

**दिगंबर :** तुमचा विनोद कळला– नि बोचला पण ! एक सांगू का ? तुम्हा श्रीमंत माणसांचं ठीक असतं. ऐषाराम– गाड्या– थंड हवेच्या ठिकाणी पिकनीक– मित्र-मैत्रिणींबरोबर ! ना काळजी ना चिंता. पण आम्हा मध्यम वर्गीय लोकांना यातली काहीच होय नसते. दहा बाय बाराच्या खुराड्यात उभा जन्म काढावा लागतो. करमणूक काय तर एखादा सिनेमा पहायचा कुणीतरी दिलेल्या पासावर ! घरी आल्याबरोबर कामाच्या ओझ्याखाली थकलेली– अकाली प्रौढ झालेली बायको येते समोर ! मग तिलाच समजायचं मुमताज नाहीतर हेमामालिनी. नि विसरून जायची दिवसभराची दुःखं तिच्या सहवासात. ( केविलवाणं हसतो. रेखा व नितीन एकमेकांकडे पाहतात. तोच "भिकोबा" असा दीनानाथांचा आवाज येतो नि भिकोबा बाहेर यायच्या आत दीनानाथ बाहेरून आत येतात. पाहतात– नितीन, रेखा व दिगंबर. ) मी दिगंबर औदुंबर शाळीग्राम !

**दीनानाथ :** हे नाव पुन्हा सांगायला आलात इथे !

**दिगंबर :** नाही. पण आता क्लेम मागायला हरकत नाही, हे सुचवायला आलो होतो.

**दीनानाथ :** मी एक सुचवू का ? पुन्हा इथे येण्यापूर्वी तुमचा विमा उतरवून या ! घरच्या लोकांना क्लेम मिळेल.

**दिगंबर :** पण साहेब, ती आत्महत्या नव्हती. अपघात होता असंच बोललं जातं.

दीनानाथ : पण ती आत्महत्याच होती. आणि ज्या बोर्डाच्या चुकीमुळे ती घडली त्या बोर्डावर फिर्याद केलीय मी वरच्या कोर्टात! कळलं?

दिगंबर : एक शंका विचारू का? बोर्ड फार तर जाहीर दिलगिरी व्यक्त करील; पण त्यासाठी एक लाखावर पाणी सोडायचं?

दीनानाथ : ज्याला लाख कमावता येतात त्याला त्यावर पाणीही सोडता येतं! भिकोबाऽ भिकोबाऽ (भिकोबा येतो.) किती हाका मारायच्या?

भिकोबा : ऐकू नाही आलं मला.

दीनानाथ : मला मुकी माणसं चालतील, पण बहिरी नाही चालणार.

नितीन : हो. नाही तर यांचं ऐकून कोण घेणार?

(दीनानाथ रागाने पाहतो. तोच त्याचं लक्ष अजून थांबलेल्या दिगंबरकडे जातं.)

दीनानाथ : तुम्ही अजून इथेच?

दिगंबर : मी जाऊ का?

दीनानाथ : भिकोबा, त्यांना बाहेरचा रस्ता दाखव.

दिगंबर : नको. मला ठाऊक आहे. येतो. (नितीनला व रेखाला नमस्कार करून जातो.)

दीनानाथ : भिकोबा, आजही वॉचमन आला नाही कामावर?

भिकोबा : हॉस्पिटलमध्ये असलेला त्याचा मुलगा आजच वारला, साहेब!

दीनानाथ : त्याला मी काय करणार? मला फक्त कामाशी कर्तव्य आहे. उद्यापासून दुसरा वॉचमन बोलावून घ्या.

भिकोबा : पण साहेब, त्यानं बिचाऱ्यानं काय करायचं!

दीनानाथ : मेलेल्या मुलाच्या नावानं जन्मभर रडत बसायचं.

भिकोबा : पण गेली दहा वर्षे तो नोकरी करतोय इथे.

दीनानाथ : त्याबद्दल त्याला पगार मिळत होता.

भिकोबा : पण साहेब.

दीनानाथ : उद्यापासून दुसरा वॉचमन बोलाव! कळलं?

भिकोबा : होय साहेब.

दीनानाथ : मग थांबलायस काय? काम नसताना माझ्या समोर कुणी थांबलेलं आवडत नाही मला. (भिकोबा जातो. दीनानाथ, नितीन व रेखाकडे पाहतो.)

नितीन : मी मुद्दामच थांबलोय. तुमच्याकडे काम होतं महत्त्वाचं म्हणून.

दीनानाथ : कसलं काम? पैशाचं?

नितीन : नाही! पैशापेक्षा महत्त्वाची कामं असू शकतात.

दीनानाथ : मला वाटत नाही! बोला. काय काम होतं?

नितीन : तुम्ही मला जन्म दिलात.

दीनानाथ : त्याला वीस वर्षे होऊन गेली.

नितीन : म्हणजे मी कायदेशीर सज्ञान आहे हे तुम्हांला ठाऊक असेलच.

दीनानाथ : फक्त हेच कळून घेण्यासाठी मी आपणास लॉ कॉलेजमध्ये घातलेले नाही.

नितीन : ते मला ठाऊक आहे! तुमच्या हट्टाकरता तुम्ही घातलंय मला लॉ कॉलेजात. प्रत्येक बाबतीत तुमचाच हट्ट.

दीनानाथ : मानावा लागेल– या घरात राह्यचं असेल तर.

(रेखा बावरून या दोघांचं संभाषण ऐकत आहे. दीनानाथ जिन्याकडे जाऊ लागतात.)

नितीन : माझं काम संपलेलं नाही अजून. (दीनानाथ वळतात.) तुम्ही प्रियाच्या वडिलांना ओळखता?

दीनानाथ : उलट तपासणी घ्यायला हे कोर्ट नाही.

नितीन : उत्तर द्यायचं टाळलंत तरी मला ठाऊक आहे. तुम्हीच तिच्या वडिलांना सांगून आमच्या गाठीभेटी बंद करवल्यात! का?

दीनानाथ : याचं उत्तरही तुला ठाऊक आहे. या घरची सून होऊन येण्याइतक्या प्रतिष्ठेचं तिचं घर नाही.

नितीन : म्हणजे तुम्हांला माझं लग्न करून द्यायचं आहे ते तुमच्या प्रतिष्ठेसाठी! मला आवडणारी बायको हवी म्हणून नाही– तर तुम्हांला तुमच्या मनाजोगती सून हवी म्हणून! का तर तुम्हांला वाटतंय की आपण मालक आहोत. आम्ही सारे गुलाम आहोत, आपण विकत घेतलेले. आई, मी, रेखा, भिकोबा नि वॉचमनसुद्धा.

दीनानाथ : सभेत करायची भाषणं घरात करून वेळेचा अपव्यय कशाला करता? त्यापेक्षा आपल्या खोलीत जाऊन वाचत बसा कायद्याचं एखादं पुस्तक.

(तोच टेलिफोनची घंटा वाजते. रेखा उठते नि दीनानाथकडे पाहून खाली बसते. नितीन जाऊन फोन घेतो.)

नितीन : हॅलो, मिलिंद! ताई, तुझा फोन घे ना.

दीनानाथ : (जिन्याची पायरी चढत) घे रेखा. यानंतर कदाचित असा योग येणारही नाही. (रेखा संथपणे फोनकडे येते. फोन घेते.)

रेखा : हॅलो, मी रेखा बोलतेय! काय? (एकदम गंभीर होते.) उद्यापासून? (दीनानाथ तसेच जिन्यावर उभे आहेत.) आता? पण हे अचानक कसं घडलं? थट्टा तर नाही करत? हां– हां. बरं हो– हो. (निराशेने फोन ठेवते.) बाबा, तुम्हांला आधीच कळलं होतं हे? का तुम्हीच घडवून आणलंत हे?

दीनानाथ : तुला काय वाटतं ?

रेखा : तुम्हीच याच्या पाठीशी आहात!

दीनानाथ : मिलिंदलाही तसंच वाटलं असणार.

रेखा : हो.

नितीन : काय झालं, ताई ?

रेखा : मिलिंदची बदली झालीय उद्यापासून, सरहद्दीवरील मिलिटरी हॉस्पिटलात.

नितीन : अशी अचानक ?, (एकदम) म्हणजे मिलिंदला तुझ्यापासून दूर करण्यासाठी बाबांनी ही बदली करवून घेतली. ताई, कुठल्या जन्मीचा सूड घेताहेत बाबा आपल्यावर ?

दीनानाथ : हा सूड नाही. ही ॲडजस्टमेंट आहे. मी ठरवलेल्या योजनेच्या आड जो येतो, त्याला असं बाजूला करावं लागतं.

रेखा : बाबा, आजवर मी कधी बोलले नाही. जे जे तुम्ही सांगत गेलात, तशी मी वागत गेले. मला आवडत नसतानाही मेडिकल कोर्स घेतला. प्रमील गेली– साऱ्यांनी तुमच्यावर तोंडसुख घेतलं. पण मी ओठ शिवून गप्प बसले! कधी तुम्हांला दुखावलं नाही. स्वतःचं दुःख दिसू दिलं नाही! पण आज तुम्ही माझ्या पुढल्या साऱ्या जीवनाशी खेळायला उठलात! काय वाईट होतं मिलिंदमध्ये ?

दीनानाथ : त्याची परिस्थिती! आईवडील नसलेला– असाच कुणाच्या तरी मदतीवर वाढलेला अनाथ जावई मला परवडणारा नव्हता. तुझं लग्न मी कधीच ठरवलं आहे.

रेखा : मला न विचारता ?

दीनानाथ : तुला जन्माला घालण्यापूर्वीही मी तुला विचारलं नव्हतं!

रेखा : पण आमचं प्रेम.

दीनानाथ : तुला विसरायला हवं! ॲण्ड व्हॉट इज लव्ह, आफ्टरऑल! एक वेळ जाण्याचं साधन! संसार नुसत्या प्रेमावर चालत नाही.

रेखा : मग कशावर चालतो ? पैशावर ? प्रतिष्ठेवर ? नाही बाबा. पैशावर चालतो तो आश्रम, संसार नव्हे! संसार चालतो एकमेकांबद्दलच्या आपुलकी-वर– प्रेमावर. जे तुम्ही आम्हांला कधी दिलं नाही. म्हणूनच सारी सुखं असूनही खरं सुख रुसलं या संसारावर. या घरात जो चाललाय तो संसार असं तुम्हांला वाटतंय! पण नाही, या घरात चाललाय तो कठपुतळ्यांचा नुसता खेळ! तुम्ही खेळवताहात या बाहुल्या तुमच्या हातातल्या दोरीनं– तुम्हांला हव्या तशा! पण प्रत्येक खेळाला शेवट असतो. बाबा, या दोऱ्या जेव्हा तुमच्या हातातून सुटतील तेव्हा तुमच्या हातात काही उरणार नाही, स्वतःच्या डोळ्यातले पश्चात्तापाचे अश्रू पुसण्याशिवाय. (आत निघून जाते.

दीनानाथ ती गेलेल्या दिशेकडे पाहतात नि एकेक पाऊल टाकत वर आपल्या खोलीकडे निघून जातात. नितीन चिडून ते गेलेल्या दिशेकडे पाहतो. )

**नितीन** : ( स्वत:शीच कोर्टात जज्जासमोर उभं असल्याच्या आविर्भावात— ) युअर ऑनर– या घरात घडत असलेली ही केस आपण प्रत्यक्ष पाहिलीत ! स्वतःच्या बायकोमुलांशी इतक्या कठोरपणाने वागणाऱ्या– त्यांच्या आशा-आकांक्षा स्वत:च्या हट्टासाठी पायदळी तुडवणाऱ्या या माणसासाठी पिनल कोडात जास्तीत जास्त काय शिक्षा लिहिली आहे ? आय वॉन्ट युअर जजमेन्ट, युअर ऑनर !

( दारात सदानंद येतो. )

**सदानंद** : कोर्टातल्या केसची रंगीत तालीम चाललीय वाटतं ?

**नितीन** : ( वळून पाहात ) केस कोर्टातली नाही काका. घरातलीच आहे ! यातला आरोपी आहे तुमचा मित्र. आणि फिर्यादी आम्ही सर्व. आई, ताई आणि मी.

**सदानंद** : नि भिकोबा माफीचा साक्षीदार वाटतं ! ( हसतात. )

**नितीन** : काका, हसून घालवण्यासारखी ही गोष्ट नाही. बाबांनी अक्षरशः जुलूम चालवलाय ताईवर नि माझ्यावर.

**सदानंद** : तुमच्या कोर्सेसबद्दल ना ?

**नितीन** : ती जुनी गोष्ट !

**सदानंद** : मग नवीन गोष्ट कुठली ?

**नितीन** : मागल्या खेपेला मी नि ताईनं तुमच्यासमोर कबुलीजबाब दिलेला आठवतो तुम्हांला ?

**सदानंद** : यस् ! पोलिस पंचनामा करायला विसरतील. पण घेतलेला कबुलीजबाब नाही विसरणार ! प्रिया आणि मिलिंद. करेक्ट ?

**नितीन** : यस् ! या बाबतीत बाबांनी काय स्टेप्स घेतल्या असाव्यात अशी कल्पना आहे तुमची ?

**सदानंद** : लग्नाला परवानगी दिली ? बरं झालं ! केव्हाचा मुहूर्त आहे ? मधुचंद्रासाठी कुठलं हिल स्टेशन ठरवलंय ?

**नितीन** : गौरीशंकर.

**सदानंद** : इतकं उंच ?

**नितीन** : उडी मारायला बरं.

**सदानंद** : दोघंही !

**नितीन** : हो. मी नि ताई.

**सदानंद** : म्हणजे ?

नितीन : बाबांचा आम्हा दोघांच्याही प्रेमाला विरोध आहे.

सदानंद : करेक्ट ! ज्याला विरोध नाही ते प्रेम कसलं ? व्हेजिटेरियन मामला ! प्रेमात काय किंवा विधानसभेत काय विरोधी पक्ष हवाच.

नितीन : बी सीरिअस, काका !

सदानंद : बरं सांग. दीनानाथने विरोध केला, म्हणजे एक्झ्याक्टली काय केलं ?

नितीन : प्रियाच्या घरच्या लोकांना तंबी देऊन तिच्या माझ्या भेटीगाठी बंद करवल्या.

सदानंद : याला पुरावा ?

नितीन : हे पोलिस स्टेशन नाही.

सदानंद : आय ॲम सॉरी ! पुढे ?

नितीन : डॉक्टर मिलिंदची बदली सरहद्दीवरील हॉस्पिटलमधे करायला लावली.

सदानंद : देशातील जवानांसाठी प्रत्येकाने काहीतरी करायलाच हवं.

नितीन : पण या घरातील दोन जवानांचं काय ?

सदानंद : जवानांसमोर दोनच मार्ग असतात. एक चढाई, दुसरी शरणागती.

नितीन : बरोबर आहे. तुम्ही थट्टा करणारच ! स्वतः कधी प्रेम केलं नाहीत. कळणार कशा तुम्हांला आम्हा प्रेमिकांच्या व्यथा ?

सदानंद : तेही खरंच म्हणा ! नितीन, माशाची चव कळायला स्वतः गळ घेऊन मासे पकडावे लागत नाहीत.

नितीन : मला वाटलं होतं, तुमचा मॉरल सपोर्ट आम्हाला मिळेल म्हणून ! शेवटी मित्राचच पारडं जड ठरलं. आता आमचा मार्ग आम्हीच बघू. ( आत निघून जातो. सदानंद " अरे नितीन " असं म्हणत त्याच्या खोलीच्या रोखाने जाऊ लागतात. तोच बाजूच्या खोलीतून मनोरमा येते. तिच्या हातात विणलेला स्वेटर आहे. )

मनोरमा : झाला बाई एकदाचा स्वेटर विणून. ( सदानंदाला पाहते. ) भाऊजी, तुम्ही केव्हा आलात ?

सदानंद : आताच ! दीनानाथ आला का ?

मनोरमा : भिकोबा सांगत होता आलेत म्हणून. पण मला सांगा, हा स्वेटर कसा आहे ?

सदानंद : छान आहे ! कुणासाठी विणलाय ?

मनोरमा : प्रमीलसाठी. ( तो दचकतो. ) छान दिसेल की नाही तिला ? ( सदानंद चूप झाला आहे. ) इंदूर-देवासला सकाळी किती गारठा असतो नि तिचा संगीताचा क्लास असतो सकाळी. अहो, देवासला ठेवलीय तिला गाणं शिकायला - कुमार गंधर्वांकडे ! विसरलात भाऊजी ? आमच्या प्रमीलनं

फजिती केली बोर्डाची! पास झालीय ती.

**सदानंद** : वैनी! किती काळ हे खोटे आभास उराशी बाळगीत जगणार?

**मनोरमा** : तुम्हांला खोटं वाटतं हे? ती तार पाहिलीत ना बोर्डाकडून आलेली त्या दिवशी? (हसते.)

**सदानंद** : वैनी, तुम्ही एकदा रडून का घेत नाही पोटभर.

**मनोरमा** : स्वतः रडायचं नि स्वतःच अश्रू पुसायचे? आईचा पदर असतो ना, तो दुसऱ्याचे आसू पुसायला— स्वतःचे नव्हे.

**सदानंद** : वैनी. (तोच 'पोष्टमन' असा पुकारा होतो. सदानंद जाऊन एक्सप्रेस पत्र सही करून घेतो.)

**मनोरमा** : कुणाचं पत्र, भाऊजी?

**सदानंद** : तुमच्या नावाचं आहे. मागे पत्ता देवासचा आहे.

**मनोरमा** : (पत्र घेत) नक्की प्रमीलचं पत्र. (सदानंद दचकतो. पत्र उघडते.) पहा, तुम्हांला खोटं वाटत होतं ना? तुमच्या बछडीचंच पत्र आहे! वाचू? (सदानंद नुसती मान हालवतो.) प्रिय आई, (पत्राचा मुका घेते.) आज तुझी खूप आठवण झाली. मी गाण्याच्या क्लासला गेले ना तर आज मला कुठलं गाणं शिकवलं आहे माहीत? 'आई तुझी आठवण येते–' गाणं गाताना मी तर रडतच होते. कुमारजींनी मला विचारलंसुद्धा का रडतेस म्हणून! तुला सुद्धा आठवण येते काय माझी? आणि तू स्वेटर पाठवणार होतीस तो केव्हा ग? इथे आयते स्वेटर्स खूप मिळतात. पण मला तुझ्या हातचा विणलेला हवा. त्याने थंडी नाही बाधायची. लवकर पाठव! बाबांचा राग गेला ना ग! रेखाताई नि नितीनदादाला आठवण येते का ग माझी? नि माझे सदाकाका विसरले आपल्या बछडीला? मग ते का नाही लिहीत पत्र मला? खूप दूर गेलं की माणूस विसरलं जातं का ग आई? मी या सुट्टीत येणार आहे. तुला नि काकांना नवीन नवीन गाणी म्हणून दाखवणार आहे आणि पिआनोसुद्धा! पण तुम्हांला नाही फक्त बाबांना! भिकोबा सांगत होता पूर्वी तू बाबांना रोज रात्री पिआनोवर गाणं गाऊन दाखवायचीस! मला शिकवशील ते गाणं? बाबा दमून-भागून आले की मी ते म्हणत जाईन गाणं. तू नि बाबांनी नुसतं ऐकत बसायचं गाणं समोरासमोर बसून! ए लाजू नको गडे! पत्राचं उत्तर मोठ्ठं मोठ्ठं पाठव! वाट पाहते. तुझी प्रमील.

(मनोरमा ते पत्र आवेगाने छातीशी कवटाळते. सदानंद मान वळवून डोळ्यांतलं पाणी टिपतो.)

**सदानंद** : वैनी, प्लीज माझ्यासाठी— या मानलेल्या भावासाठी – तरी या आभासाच्या कोषातून बाहेर या.

**मनोरमा** : का ? माझं हेही सुख तुम्हांला पाहवत नाही ? भाऊजी, तुम्हांला काय वाटतं तुमची बछडी या जगात आता नाही हे मला ठाऊक नाही ? ते विसरायचं म्हटलं तर वेडी व्हावं लागेल. पण प्रयत्न करूनही नाही लागत वेड. म्हणून गुरफटून घेतलंय स्वतःला या आभासाच्या खोट्या स्वप्नाच्या आवरणात !

**सदानंद** : मग हे पत्र ?

**मनोरमा** : मीच लिहून मीच पोष्टात टाकायला लावले भिकोबाला ! मीच ! आई आहे ना मी ! आई !

( हुंदका आवरते. तोच वर जिन्यावर दीनानाथ येतो. )

**दीनानाथ** : हॅलो सदा !

**मनोरमा** : ते आले. भाऊजी, त्यांना सांगू नका हे ! नाही तर हेही सुख हिरावून घेतील ते माझं ! ( घाबरत घाबरत आत निघून जाते. वरून दीनानाथ एकेक पाऊल टाकीत खाली उतरतो. )

**सदानंद** : मी ऐकलंय की तू बोर्डाविर फिर्याद केलीयस सुप्रीम कोर्टात.

**दीनानाथ** : यस ! खालच्या कोर्टाने माझा दावा फेटाळून लावला ! पण त्यांना कल्पना नाही गाठ कुणाशी आहे ! सारी संपत्ती – वैभव पणाला लावीन. पण ही केस अशी अर्धवट सोडणार नाही.

**सदानंद** : पण सर्व झाल्यानंतर ही केस कशासाठी ?

**दीनानाथ** : माझ्या समाधानासाठी ! बोर्डाला चांगला धडा शिकवण्यासाठी ! बोर्ड कान्ट प्ले विथ समबडीज लाईफ ! मला ठाऊक आहे. तुम्हा सर्वांच्या दृष्टीने मी एक कठोर – हृदयशून्य – स्वतःवर प्रेम करणारा माणूस आहे ! यस, आहे ! मी अन्याय सहन करू शकत नाही.

**सदानंद** : दुसऱ्यांनी केलेले ! पण तू ? तू इतरावर केलेले अन्याय इतरांनी सहन करायचे !

**दीनानाथ** : इतर म्हणजे रेखा नि नितीन हेच ना ?

**सदानंद** : हो !

**दीनानाथ** : सदा, आयुष्याची काही सूत्रं मी ठरवून टाकली आहेत. त्यानुसार मी माझी पावलं टाकतो. प्रेम सर्वच करतात ! मीही केलं होतं – तूही केलं होतंस—

**सदानंद** : प्लीज, दीनानाथ !

**दीनानाथ** : सो सॉरी ! खरं सांगू ? सॉरी हा शब्द उभ्या आयुष्यात मी फक्त मित्रासाठीच वापरू शकतो. अदरवाईज आय नेव्हर फिल लाइक सेईंग सॉरी.

**सदानंद** : थँक्यू. दिना !

**दीनानाथ** : दिना ! सदा, मला दिना म्हणणारी दोन माणसं उभ्या आयुष्यात आली. एक तू नि दुसरी मनोरमा. लग्नाआधी दिनाच म्हणायची ती मला.

**सदानंद** : यू स्टिल रिमेंबर ?

**दीनानाथ** : यस ! पण कुठल्याही गोष्टीचे जाहीर प्रदर्शन करायला नाही आवडत मला.

**सदानंद** : मनातल्या भावना व्यक्त करण्याला प्रदर्शन म्हणतोस तू ?

**दीनानाथ** : अर्थात ! जाऊ दे. हा प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो ! पण खरं सांगू ? तू माझ्या मुलांशी ज्या सलगीने – जवळकीने वागतोस ना तेव्हा हेवा वाटतो मला तुझा ! मला कधी जमलंच नाही ते. ( हसतो )

**सदानंद** : दिना—

**दीनानाथ** : प्लीज सदानंद ! भावनेच्या भरतीची ही लाट इथपर्यंतच राहू देत ! नाही तर आयुष्यभर जपलेला सांभाळलेला स्वत्वाचा किनारा उद्ध्वस्त होऊन जाईल. ( टेलिफोनची घंटा वाजते. दीनानाथ फोन घेतो. ) यस, दीनानाथ हिअर ! ट्रंक कॉल फ्रॉम दिल्ली ? यस आय ॲम होल्डिंग ! बोला बॅरिस्टर पटेल ! काय ? वुइ वन द केस ? आम्ही जिंकलो ! अभिनंदन ! हो हो. आय वुईल सी टु इट. गुड नाईट. ( फोन ठेवतो. ) सदा, मी जिंकलो, बोर्ड हरलं ! सुप्रीम कोर्टाने माझ्या बाजूने निकाल दिला. ( हसतो. ) दहा हजार रुपयांची नुकसानभरपाई द्यायचा हुकूम दिला कोर्टानं. ( हसतो. )

( आतल्या खोलीतून नितीन बाहेर येतो. तो हे ऐकतो. )

**सदानंद** : प्रमील गेली. आता हे दहा हजार रुपये काय करायचेत ?

**दीनानाथ** : अनाथाश्रमाला देणार आहे मी हे पैसे ! हा आनंद पैशाचा नाही– हा आनंद आहे प्रतिष्ठेचा – माझ्या स्वतःच्या प्रतिष्ठेचा. ( मोठमोठ्याने हसू लागतो व हसता हसता एकदम कोसळतो. सदानंद त्याला सावरतो. उठून बसत – ) काही नाही रे जुनं दुखणं आहे हे पोटाचं. भिकोबा ऽ ऽ

( भिकोबा येतो. )

**भिकोबा** : काय साहेब !

**सदानंद** : गरम पाण्याची पिशवी घेऊन ये.

**भिकोबा** : मागल्यासारखी पुन्हा कळ आली ?

**दीनानाथ** : तुला सांगितलं ते काम कर. अच्छा सदा, मी वर जाऊन रेस्ट घेतो. गुड नाईट. ( जिन्यावरून जाऊ लागतो. )

**भिकोबा** : ( सदानंदाला ) साहेब, तुम्ही एकदा डॉक्टरकडे घेऊन जा साहेबांना. गेल्या वर्षात खूप वेळा असं झालंय.

**नितीन** : कशाला डॉक्टरांना त्रास काका ? होऊन होऊन काय होईल ? जगातलं

एक पाप कमी होईल— इतकंच !

सदानंद : नितीन !

(याच वेळेला वर शेवटच्या पायरीवर चढणारा दीनानाथ थांबतो. थबकतो. एकवार पाहतो — नि शांतपणे आपल्या खोलीचं दार उघडून आत जातो. नि हळूहळू अंधार होऊ लागतो.)

□

ग्र. क्र. १८२२९
वि. नाटक

## अंक दुसरा
## प्रवेश दुसरा

भिकोबा वरच्या खोलीतून बाहेर येतो चहाचा ट्रे व औषधांच्या रिकाम्या बाटल्या

[ रंगभूमी हळूहळू प्रकाशमान होऊ लागते. पहिल्या प्रवेशातील दिवाणखान्याचं दृश्य दिसू लागतं. वेळ सकाळची. भिकोबा वरच्या खोलीतून बाहेर येतो. हातात चहाचा ट्रे व औषधांच्या रिकाम्या बाटल्या आहेत. भिकोबा आत जाणार तोच त्याचं लक्ष दारात उभ्या असलेल्या वॉचमनकडे जातं. ]

**भिकोबा** : दयाराम तू ? होतास कुठे इतके दिवस ?

**दयाराम** : पोरगा गेल्याची हाय घेतली बायकोनं. वेड्यासारखी करायला लागली !

**भिकोबा** : हातातोंडाशी आलेला एकुलता एक मुलगा गेला. लावून घेतलं मनाला आमच्या बाईसाहेबांसारखं.

**दयाराम** : तिला सोडून कुठे जाता येईना ! एकदा बाजारात म्हणून गेलो, थोड्या वेळानं येऊन पाहतो तर बायकोनं पेटवून घेतलेलं स्वतःला.

**भिकोबा** : म्हणतोस काय ?

**दयाराम** : काय सांगू दुर्दैवाचे दशावतार ? कशीबशी आग विझवली. तिला इस्पितळात दाखल केली.

**भिकोबा** : आता कशी आहे ?

**दयाराम** : काल रात्री आली शुद्धीवर म्हणून आज ड्यूटीवर दाखल झालो. पाहतो तो दारावर दुसरा वॉचमन !

**भिकोबा** : दोन दिवसांपूर्वी ठेवला त्याला साहेबांनी.

**दयाराम** : साहेबांना सांगितलं होतंस ना तू ?

**भिकोबा** : मी सांगून पाहिलं ! पण साहेबांचा स्वभाव जाणतोस तू ! आता तूच सांगितलंस तर—

**दयाराम** : त्यासाठीच तर आलो आत ! साहेब घरातच आहेत ना ?

**भिकोबा** : हो ! गेला आठवडाभर फारसे बाहेर कुठे जात नाहीत.

**दयाराम** : म्हणजे ?

**भिकोबा** : तब्बेत बरी नाही त्यांची. कधी तरी लहर लागली की ऑफिसात जातात. कधीमधी डॉक्टराकडे जातात. आताही डॉक्टरकडे जायला निघताहेत. तू थांब इथेच ! मी टेवून आलो हे.

( भिकोबा आत जातो. दयाराम बावरून इकडे तिकडे पाहात उभा राहतो. तोच जिन्यावरून दीनानाथ खाली येतात. दयाराम अंग चोरून कोपऱ्यात उभा राहतो. दीनानाथांचं त्याच्याकडे लक्ष जात नाही. ते सरळ टेलिफोनकडे येतात. नंबर फिरवतात. )

**दीनानाथ** : हॅलो, डॉक्टर पाळंदे ? दीनानाथ हिअर. आज ठीक आहे तसं. नो पेन. ( याच वेळी आतल्या खोलीतून मनोरमा येते. ) रिपोर्ट आला का ? हां हां ! ठीक आहे. मी येतोच ! ( फोन ठेवतो. )

**मनोरमा** : ( पुढे येत ) काय म्हणाले डॉक्टर ?

**दीनानाथ** : काय म्हणणार रिपोर्ट आल्याशिवाय ?

**मनोरमा** : आता त्रास नाही ना होत ?

**दीनानाथ** : आणि होत असला तर तो माझा मलाच सोसला पाहिजे.

**मनोरमा** : पण रिपोर्ट येणार केव्हा ?

**दीनानाथ** : येईल आज उद्याकडे ( जायला म्हणून दाराकडे येऊ लागतो. त्याला दयाराम दिसतो. ) झाल्या दिवसांच्या पगाराकरता आला असशील ? उद्या ऑफिसात येऊन घेऊन जा !

**दयाराम** : पगाराकरता नाही आलो मी साहेब.

**दीनानाथ** : मग कशाला ?

**दयाराम** : आपण दुसरा वॉचमन ठेवला—

**दीनानाथ** : ठेवायला नको होता ?

**दयाराम** : नाही, पण माझं कसं होईल ?

**दीनानाथ** : ते तुझं तू ठरव !

**दयाराम** : इतकी वर्षं नोकरी केल्यानंतर—

**दीनानाथ** : इतकी वर्षं नोकरी केलीस म्हणून इतके दिवस थांबलो.

**दयाराम** : साहेब !

**दीनानाथ** : आणि तुझा मुलगा मेला म्हणून माझं काम का अडून राहावं ? तरी चार दिवस वाट पाहिली.

**दयाराम** : मी दुसऱ्याच दिवशी हजर होणार होतो साहेब. पण मुलाच्या धक्क्यानं बायको वेड्यागत झाली नि तिनं पेटवून घेतलं स्वतःला.

**दीनानाथ** : कुणी कुणासाठी मरत नाही या जगात. तुम्हा लोकांची ही नाटकं मी ओळखून आहे.

**दयाराम** : तुमच्या पायाशपथ साहेब ! बायको इस्पितळात आहे ! हातातोंडाशी आलेला मुलगा गेला. आता मी जगायचं कुठल्या आधारावर, ही नोकरी गेली तर ?

**दीनानाथ** : या भागात हा काही एकच बंगला नाही.

**दयाराम** : पण साहेब !

**दीनानाथ** : दॅटस् ऑल. उद्या ऑफिसमधे येऊन पगार घेऊन जा ( आणि असं बोलून त्याच्याकडे न पाहता दीनानाथ बाहेर निघून जातो. दयाराम तसाच उभा आहे. त्याच्या डोळ्यांत पाणी आहे. तोच मनोरमा पुढे येते. )

**मनोरमा** : दयाराम, रडायचं नसतं असं भरल्या घरात.

**दयाराम** : चुकलो बाईसाहेब. ( अश्रू पुसतो. ) साहेबांचं काही चुकलं नाही ! माझा मुलगा गेला— उद्या बायको गेली म्हणून त्यांनी आपलं काम कशाला अडू द्यायचं ? माझंच प्रारब्ध तसं ! येतो मी बाईसाहेब. ( नमस्कार करतो. )

**मनोरमा** : थांब दयाराम, आलेच हं मी. ( आत जाते. दयाराम काही क्षण तसाच उभा आहे. नंतर पुढे येतो. प्रमीलच्या फोटोसमोर उभा राहतो. तोच आतून मनोरमा येते. तिच्या हाती एनव्हलप आहे. ) दयाराम, ( दयाराम वळतो. ) हे घे ( पाकीट देते. ) पाचशे रुपये आहेत.

**दयाराम** : बाईसाहेब !

**मनोरमा** : मी ऐकलंय सारं ! बायकोची नीट काळजी घे. बरी झाली की एकदा घेऊन ये इथं. आणशील ना ?

**दयाराम** : होय बाईसाहेब.

**मनोरमा** : नि हे बघ दर महिन्याच्या दहा तारखेला इथं येऊन तुझा पगार घेऊन जायचं.

**दयाराम** : बाईसाहेब ! मी दुसरी नोकरी बघीन कुठे तरी.

**मनोरमा** : तरी सुद्धा इथे येऊन पगार घेऊन जायचा.

**दयाराम** : ( गहिवरून ) बाईसाहेब !

**मनोरमा** : ही मदत नाही ! यांची तब्बेत बरी नाही. उद्या रिपोर्ट यायचाय ! त्यांना आराम पडावा— कुणाचेही तळतळाट लागू नयेत म्हणून करतेय मी हे.

**दयाराम** : तुमची पुण्याई फार मोठी आहे बाईसाहेब. साहेब लवकर बरे होतील.

येतो मी. ( तिच्या पायाला हात लावतो व निघून जातो. )

**मनोरमा** : ( दीनानाथाच्या फोटोकडे येते ) तुम्हाला अजून कसं कळत नाही ! जगात पैसा जोडायचा नसतो. आशीर्वाद जोडायचे असतात— फक्त आशीर्वाद. ( वळते व सोफ्याकडे बसायला म्हणून येते. तोच आतल्या खोलीतून हातात बॅग घेतलेली रेखा येते. ) रेखा, तू कुठे निघालीस ?

**रेखा** : मिलिंदबरोबर चाललेय मी कायमची ? हे घर सोडून.

**मनोरमा** : वेड का लागलंय तुला !

**रेखा** : आणखी काही दिवस या तुरुंगात राहिले तर खरंच वेड लागेल मला !

**मनोरमा** : मी नाही राहिले इतकी वर्षं या घरात ?

**रेखा** : तू राहिलीस तुझ्या नवऱ्यासाठी.

**मनोरमा** : नाही. मी राहिले तुमच्यासाठी— नितीनसाठी— तुझ्यासाठी— प्रमीलसाठी ! प्रमील तर गेली रुसून ! आज तूही चाललीस !

**रेखा** : मी काय करू ? मन मारून या घरात राहू ? आणि मिलिंदला एकट्याला जाऊ देऊ इतक्या दूर ?

**मनोरमा** : आम्ही तुझे कुणीच नव्हत का ? तुझ्यावर अन्याय झाला असेल, नाही म्हणत नाही मी. पण त्यासाठी घरातून पळून जायचं ?

**रेखा** : पळून जाऊन लग्न करणार आहोत आम्ही.

**मनोरमा** : पण दीनानाथांची मुलगी पळून गेली हा डाग लागायचा तो लागणारच या घराला ! एका मुलीनं आत्महत्या केली. दुसरी मुलगी पळून गेली.

**रेखा** : आई, तू बोलतेस हे ?

**मनोरमा** : तुझी आई म्हणून नाही बोलत ! बोलतेय यांची पत्नी म्हणून— या घरची लक्ष्मी म्हणून— या घराच्या इभ्रतीसाठी, प्रतिष्ठेसाठी. मीही प्रेम केलं होतं तुझ्या वडलांवर ! म्हणून घर सोडून पळून नाही आले मी ! प्रेम इतकं अधिर असू नये रेखा ! आज ना उद्या यांचं मन पालटेल ! संमती देतील हे तुझ्या लग्नाला.

**रेखा** : आणि नाही दिली नि दुसऱ्याच कुणाशी माझं लग्न ठरवलं तर— .

**मनोरमा** : तर त्या वेळी मी तुझ्यापाठीशी उभी राहीन. माझं ऐक. सध्या तुझ्या वडिलांची तब्येत बरी नाही. ते डॉक्टरकडे गेलेयत रिपोर्ट आणायला ! त्यांना हा धक्का नाही सहन व्हायचा.

**रेखा** : प्रमील गेली. कसला धक्का बसला त्यांना ?

**मनोरमा** : रेखा, आगबोट पाण्यावर जितकी दिसते त्याच्या तिप्पट ती पाण्याखाली असते.

**रेखा** : मलाही तुझ्यासारखंच वाटायचं आई पूर्वी ! पण आता माझी खात्री झालीय. बाबांचं प्रेम असेलच तर ते स्वतःवर. ओढ असलीच तर ती

स्वतःचीच. जीव जडला असलाच तर तो प्रतिष्ठेवर— अहंपणावर ! खरं सांगू आई, तूही हे घर सोडून चल. नितीन, भिकोबा आपण सारे जाऊ या ! राहू देत एकटे त्यांना या वैभवशाली तुरुंगात.

**मनोरमा** : रेखा, मी हे घर सोडून जाऊ ! वेडे पोरी या घरात वरात आली माझी. आता गेलीच तर पालखी जाईल ! पिलं उडून गेली तरी पक्षिणीला नाही घरटं सोडून जाता येत !

( तोच आतल्या खोलीतून नितीन येतो. )

**नितीन** : ए ताई, तू कुठे निघालीस, हातात बॅग घेऊन सिनेमातल्या नायिके-सारखी ?

**रेखा** : घर सोडून चालले होते मी मिलिंदबरोबर.

**नितीन** : चालले होते ? म्हणजे आता बेत बदलला वाटतं ?

**मनोरमा** : हो !

**नितीन** : एकूण आईच्या डोळ्यांतील अश्रूंचा बांध ओलांडून जायला जमलं नाही ताईला ! आई थोर तुझे उपकार !

**रेखा** : ( चिडून ) नितीन.

**नितीन** : उगीच माझ्यावर कशाला रागावतेस ! मी तर म्हणतो की खरंच तू जायला हवं होतंस बाबांच्या नाकावर टिच्चून ! हँ कशी होणार तू डॉक्टरीण ? डॉक्टर म्हटलं की मन कसं घट्ट असायला हवं. नो आई, नो बाबा ! दिसला रोग की कर ऑपरेशन.

**रेखा** : दुसऱ्याला एवढा उपदेश करतोयस मग तू का राहिलास अजून या घरात ?

**नितीन** : तू मोठी बहीण. तुझ्या पावलावर पाऊल टाकून येणार होतो मी. पण माझा चान्स तू घालवलास.

**मनोरमा** : नितीन, आता गप्प राहवला काय बसेल ?

**नितीन** : एक पॅला गरम चाय. ( हसत हसत सैंपाक खोलीकडे निघून जातो. )

**मनोरमा** : रेखा, जा बाई तेव्हढी बॅग आत नेऊन ठेव, पुन्हा कुणी यायच्या आत. ( रेखा वळते तोच एकेक पाऊल टाकत आत येणारा सदानंद तिला दिसतो. )

**रेखा** : आई, काका आले.

**मनोरमा** : भाऊजी ! हे आताच गेले डॉक्टरकडे.

**सदानंद** : मी तिथूनच आलो.

**मनोरमा** : तुम्हाला नाही भेटले हे डॉक्टरकडे ?

**सदानंद** : नाही.

**मनोरमा** : नक्की चुकामूक झाली असणार.

सदानंद : रस्ता बदलला की चुकामूक अटळ असते वैनी.

मनोरमा : डॉक्टर तुम्हांला काही म्हणाले का यांच्या रिपोर्टाबद्दल ?

सदानंद : होय.

मनोरमा : तसं काही काळजी करण्यासारखं नाही ना ?

सदानंद : जास्त दिवस काळजी करण्यासारखं नाही.

मनोरमा : म्हणजे भाऊजी ? असं मुग्धात का बोलता ? सरळ सरळ काय ते सांगा ना.

सदानंद : इतकं सहज नि सरळ सांगण्यासारखं असतं तर किती बरं झालं असतं. वैनी, हे जगच असं आहे की इथे आपली मुदत असेपर्यंतच राहता येतं.

मनोरमा : (बावरून) भाऊजी !

रेखा : काका, काय झालंय बाबांना ? सांगा ना ?

सदानंद : ते ऐकण्यापूर्वी तुमच्याकडून वचन हवंय मला वैनी.

मनोरमा : कसलं वचन ?

सदानंद : तुम्ही नेहमीप्रमाणे खंबीर राहाल. मन घट्ट करून आल्या प्रसंगाला तोंड द्याल.

मनोरमा : दिलं वचन ! सांगा.

सदानंद : (तिच्याकडे बघायचं टाळून) दीनानाथाचं आयुष्य फार तर सहा महिन्यांचं आहे.

(मनोरमा एखाद्या दगडी पुतळ्यासारखी स्तब्ध उभी राहते.)

रेखा : काऽका, असं झालय काय बाबांना ?

सदानंद : लुकेमिया – ब्लड कॅन्सर ! तू मेडिकलला आहेस. तुला कल्पना आहे. यावर काही उपाय नाही.

मनोरमा : (संथपणे) यांना कल्पना आहे याची ?

सदानंद : नाही, डॉक्टर ती देणार पण नाहीत ! फक्त तुम्हांला सांगितलं. तुम्ही त्याचे राहिलेले सहा महिने सुखात घालवायला हातभार लावावा म्हणून.

मनोरमा : (दीनानाथाच्या फोटोकडे जाते.) दीनानाथ ! फक्त सहा महिने ! बस्स ! संपणार तुमची माझी सोबत ! तुम्हांला आठवतं ? लग्नाच्या पहिल्या रात्री तुम्ही मला म्हणाला होतात, "मनू, जन्मजन्मांतरी मी तुला अंतर देणार नाही !" ती रात्र संपली. ते वचन संपलं. पक्षीच उडून चालला दूरच्या प्रवासाला, पक्षिणीला एकटी घरट्यात ठेवून !

रेखा : आई ! (तिच्या जवळ जाते.)

मनोरमा : (आपल्याच नादात) पिल्लं जातील घरट्यातून उडून एकामागून एक आपल्या जोडीदाराबरोबर. मी एकटी राहीन – एकटी ! सांगा दीनानाथ,

सांगा. असा का सूड घेतलात तुम्ही माझ्यावर ?

रेखा : ( तिला जवळ घेत ) आई, काकांनी काय सांगितलंय. बाबांना कळता कामा नये !

मनोरमा : मला तरी कुठे काय कळलंय ? वेडी, स्वप्न पडलं होतं मला एक ! स्वप्नच समजायचं त्याला. ( तोंड झाकून हुंदका देते. एकदम- ) रेखा, फोन कर मिलिंदला. त्याला सांग तुमच्या मार्गातली आडकाठी दूर होणार आहे. फक्त सहा महिने थांब म्हणावं – सहा महिने – बस्स ! सगळ्यांचा तुरुंगवास संपणार.

( हसते. हसू लागते. रेखाला काहीच सुचत नाही. )

सदानंद : वैनी, दीनानाथ कुठल्याही क्षणी येईल. तुम्ही वचन दिलंय मला.

मनोरमा : वचन यांनीही दिलं होतं मला ! नाही पाळलं ! पण मी पाळीन ! नाही दिसू देणार त्यांना माझं दुःख. ( विकल होऊन कोचावर बसते. आपल्या खोलीतून नितीन येतो. )

नितीन : काय झालं ताई ! आई ! ( रेखा त्याला चूप करते – इशाऱ्याने ) कुणी बोलत का नाही ? काका ?

सदानंद : नितीन ! दीनानाथ तुझे वडील ! पण त्यांचं – तुझं कधी पटलं नाही.

नितीन : आईशिवाय कुणाचंच पटलं नाही त्यांच्याशी.

सदानंद : नितीन, पण यापुढे सहा महिने तरी तुला त्यांच्याशी पटवून घ्यायला हवं.

नितीन : का ? सहा महिन्यांनंतर विशेष काय होणार आहे ?

सदानंद : तुझा बाप या जगात असणार नाही, आणखी सहा महिन्यांनी !

नितीन : काय ?

सदानंद : हि इज अ पेशन्ट ऑफ ल्युकोमिया. हे सहा महिने तू त्यांना देता येईल तेव्हढं सुख देण्याचा यत्न कर.

नितीन : मी ? इंपॉसिबल ! त्या दिवशीच मी म्हणालो होतो हिटलरचासुद्धा अंत झाला ! हुकुमशाही फार काळ नाही टिकत. काका, या घराला तुमच्या मित्राने खूप छळलं. देवाच्या काठीला आवाज नाही काका.

सदानंद : नितीन ! आरन्ट यू सॉरी फॉर धिस न्यूज ?

नितीन : सॉरी ! मला आनंद झालाय काका ! सहा महिन्यांनी आम्ही सुटणार-मुक्त होणार. ( हसतो. )

( चवताळलेल्या वाघिणीसारखी मनोरमा येते व नितीनच्या खाडकन मुस्कटात मारते. )

नितीन : ( गाल चोळीत ) आई ऽ.

मनोरमा : खबरदार मला आई म्हणून पुन्हा हाक मारलीस तर ! मला मुलगा

झालाच नाही असं समजेन मी. नालायक! बापाशी तुझं वैर असेल पण ते तुझ्या आईचं कुंकू आहे हे विसरलास! एव्हढा अधीर झालायस ना त्यांच्या मरणासाठी — मग ये नि पुसून टाक हे कुंकू तुझ्या हातांनी. म्हणजे फार वेळ थांबायला नको तुला या तुरुंगवासात.

नितीन : आई!

मनोरमा : नीघ माझ्या डोळ्यांसमोरून. आज लाज वाटली मला तुला जन्म दिल्याबद्दल. अरे, रात्री आकाशातला तारा ढळला तर पृथ्वीवरली फुलं, कळ्या रडतात पानोपानी दंवाच्या रूपानं. आणि तू! जा — जा म्हणते ना. (नितीन मान खाली घालून आपल्या खोलीच्या रोखानं जातो. पाठोपाठ रेखा जाते. आता उरली आहेत दिवाणखान्यात दोघं — मनोरमा नि सदानंद. दोघंही काही बोलत नाहीत. इतक्यात बाहेर मोटारीचा हॉर्न वाजतो. एखाद्या स्वप्नातून जाग यावी तशी मनोरमा दचकून उठते. सदानंदाकडे पाहते. तोच नेहमीच्या स्टाईलने दीनानाथ येतो.)

दीनानाथ : हॅलो सदा! तू डॉक्टरकडून खाली उतरलास नि मी पोहोचलो.

सदानंद : डॉक्टर काय म्हणाले?

दीनानाथ : काय म्हणणार! हिरवा सिग्नल दिला. नो मोअर मेडिसिन्स— नो डाएट.

सदानंद : दॅट्स गुड.

दीनानाथ : उद्यापासून मी रेग्युलर कामही करू शकतो. मी तुला सांगतो सदानंद, श्रीमंत लोकांचा खिसा हलका करण्यासाठी निरनिराळ्या टेस्ट्स शोधून काढल्यात डॉक्टर लोकांनी.

सदानंद : त्यामुळे आज बरंचसं हलकं हलकं वाटत असेल.

(दीनानाथ खिशाला हात लावून हसतो. मनोरमा जास्तीच गंभीर होते.)

मनोरमा : ब्रेकफास्ट इथेच घेणार की वर?

दीनानाथ : अर्थात इथेच! आम्ही दोघंही करू ब्रेकफास्ट! पुन्हा असा योग कधी येईल कोण जाणे.

(मनोरमा दचकते. मुखावरले भाव लपवते व आत जाते.) डॉक्टरकडून रिपोर्ट यायच्या आधी मीही थोडा घाबरलो होतो. म्हटलं आमची डायरी चुकते की काय?

सदानंद : तू डायरी लिहितोस?

दीनानाथ : रोजची नाही. पुढची.

सदानंद : तू ज्योतिष जाणतोस?

दीनानाथ : स्वतःचं भविष्य कळायला ज्योतिषी कशाला? माणसानं मनात आणलं तर तो स्वतःच भविष्य घडवू शकतो.

सदानंद : मला नाही वाटत तसं !

दीनानाथ : थांब, तुझी खात्रीच करून देतो. (लायब्ररीकडे जातो— उघडतो. त्यातल्या एका कप्प्यातून एक डायरी काढतो व सदानंदाजवळ येतो.) हीच ती डायरी— पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलीय ! सोळाव्या वर्षी मॅट्रिक व्हायचं. वीस वर्षांपर्यंत इंजिनिअरची पदवी संपादन करायची ! त्यानंतर पुढील शिक्षणासाठी परदेशी जायचं. तिथून येताच स्वतःची फर्म काढायची. तिचा व्याप साऱ्या देशभर वाढवायचा. बंगला कुठे बांधायचा— गाडी कुठली घ्यायची. सी, सगळं लिहून ठेवलं होतं. नि ते तसं घडलं— नाही घडवून आणलं.

सदानंद : बोला-फुलाला गाठ पडली असेल एव्हढाच याचा अर्थ. इथे उद्या काय होणार हे सांगता येत नाही कुणाला. नि तू तर वीस वर्षांत काय काय करणार ते लिहिलंयस.

दीनानाथ : इट वॉज प्री-प्लॅन्ड !

सदानंद : दीनानाथ, तुला काय वाटतं आयुष्यात फक्त तूच पुढचे प्लॅन आखतोस ? अरे प्रत्येकजण आखत असतो पुढचे प्लॅन. पण कधी उत्तम क्रिकेटिअर होण्याचं स्वप्न रंगवणाऱ्या माणसाला स्पोर्ट्सचं दुकान काढावं लागतं. उत्तम गवई होण्याची इच्छा करणारा कधी कधी गाण्याच्या रेकॉर्डचं दुकान काढतो.

दीनानाथ : कारण त्यांचा त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास नसतो.

सदानंद : माझ्या बाबतीत हेच म्हणशील का तू ? तुला माहीत आहे मला वैमानिक व्हायचं होतं. पण झालो पोलिस ऑफिसर! माणसाची डायरी चुकते. देवाची नाही चुकत !

दीनानाथ : आय डोन्ट बिलीव्ह. कसला आला आहे देव ! देव म्हणजे माणसाच्या वेड्या श्रद्धेचा शेंदूर फासलेला एक दगड ! तू स्वतः होऊन वैमानिकाचा कोर्स सोडलास. त्यात देव कुठे आला ?

सदानंद : पण तो कोर्स सोडायला कारणही तसंच होतं ! तुला ठाऊक आहे, शाळेत असल्यापासून वैमानिक हे माझं स्वप्न होतं. आईवडिलांची तेव्हढी परिस्थिती नव्हती. तर भीक मागून— कर्ज काढून त्यांनी मला वैमानिक केला. बरं झालं, आज ते दोघंही नाहीत माझा हा पराभव पाह्यला.

दीनानाथ : सदा, तुला फ्लाईंगचं लाइसन्सही मिळालेलं होतं. मला एकदा तू तुझ्या विमानातून फिरवून आणण्याचं कबूल केलं होतंस– तुला आठवतं ?

सदानंद : आठवतं— पण तो दिवस उजाडायच्या आत मी तो नादच सोडला.

दीनानाथ : का ? आजपर्यंत मी तुला या बाबतीत कधी विचारलं नाही— नि तू सांगितलंही नाहीस.

सदानंद : पराभवाचे वळ दाखवायचे तरी कशाला ! पण आज ते वळ— ती जन्मम उघडी केलीस तू ! दीनानाथ, तुला आपल्या कॉलेजातली ती सुचेता आठवते ?

दीनानाथ : अरे माझ्या समोरच तुमचं प्रेम जमलं— मोहरलं ! तुम्ही दोघं लग्नही करणार होता.

सदानंद : तुम्हा दोघांच्या लग्नाबरोबरच ! पण तू परदेशी निघून गेलास— नि ती घटना घडली.

दीनानाथ : कसली घटना ?

सदानंद : नुकतंच मला वैमानिकाचं सी. पी. एल. लायसन्स मिळालं होतं. नि सुचेतानं हट्ट धरला माझ्याबरोबर विमानात बसण्याचा, मी विमान चालवताना ! आणि एक दिवशी सकाळी तिला बरोबर घेऊन विमान सुरू केलं ! काही क्षणांतच विमान ढगांच्या वर गेलं ! वर निळंभोर आकाश, खाली ढगांच्या पायघड्या नि शेजारी सुचेतासारखी प्रियतमा. आणि अकस्मात काय झालं कुणास ठाऊक ! विमानाचा पंखा बंद पडला. मी मनातून घाबरलो. पण तिला तसं भासू दिलं नाही. मी कसाबसा लॅन्डिंग करण्याचा प्रयत्न करू लागलो. पण माझा ताबा सुटला तिचा भीतीनं पांढराफटक पडलेला चेहरा पाहून. नि विमान कोसळलं भर समुद्रात. त्याआधी मी वायरलेसवरून खबर दिली होती. मी शुद्धीवर आलो तेव्हा मला कळलं की मी हॉस्पिटलात आहे एकटा ! त्या समुद्रात माझ्या सुचेताचा कुणालाच शोध लागला नाही.

दीनानाथ : ओ ! इटस् रिअली अ ट्रॅजेडी !

सदानंद : बस्स ! त्या दिवसापासून विमान चालवण्याचा मला तिटकारा आला. मी तो कोर्स सोडला नि पोलिसात भरती झालो. नि आजतागायत तसाच राहिलो— अविवाहित— सुचेताच्या फक्त स्मृतीवर !

दीनानाथ : मी तुझ्या जागी असतो तर ठरवल्याप्रमाणेच वागलो असतो— यशस्वी वैमानिकच झालो असतो. दुसऱ्या मुलीशी लग्नही केलं असतं. सदानंद, स्वतः आखलेल्या मार्गापासून जे ढळतात ते दुबळे असतात. मनोधैर्य नसतं त्यांच्यात. तुझ्यातही ते नव्हतं.

सदानद : नसेलही.

दीनानाथ : माझ्या एकाही मुलात ते नाही. म्हणून त्यांचा मार्ग मला आखून द्यावा लागला. मुलांना ते आवडलेलं नाही. पण केव्हा ना केव्हा तरी कळेल की मी आखून दिलेला मार्गच बरोबर होता.

सदानंद : पण त्यांना तसं वाटलं नाही तर ?

दीनानाथ : असं होणार नाही. मी मांडलेलं आयुष्याचं गणित आतापर्यंत चुकलेलं नाही. जे जे मी ठरवलं ते ते झालं-–घडलं. नितीनबद्दल, रेखाबद्दलही

लिहून ठेवलंय मी. नि ते तसंच घडून येणार— मी घडवून आणणार.

**सदानंद** : दीनानाथ, हा मीपणा किती काळ जोपासणार आहेस तू? किती काळ या कोषातच राहणार आहेस?

**दीनानाथ** : मरेपर्यंत! (सदानंद हसतो.) तू हसलास? हरकत नाही. पण पुढल्या पाच वर्षांत तुला दिसून येईल मीच ठरवलेल्या गोष्टी कशा घडून येतात त्या.

**सदानंद** : पण दीनानाथ? यापुढची स्वत:बद्दलची डायरी काय लिहिली आहेस तू?

**दीनानाथ** : आणखी पाच वर्षांनी धंद्यातून निवृत्त होणार नि अमेरिकेत जाऊन स्थायिक होणार. इट इज डिसायडेड. (सदानंद हसतो. त्या आधी नितीन जिन्यावरून आलेला आहे व तो सर्व ऐकतो आहे.) बाय-द-वे, सदा, उद्या संध्याकाळी तू मोकळा आहेस ना?

**सदानंद** : हो. का?

**दीनानाथ** : उद्या ती मंडळी यायची आहेत, इंगेजमेंटची तारीख निश्चित करण्यासाठी.

**सदानंद** : कुणाची इंगेजमेंट?

**दीनानाथ** : रेखाची आणि नितीनची.

**सदानंद** : पण रेखा-नितीनला याची आगाऊ कल्पना दिली आहेस का तू?

**दीनानाथ** : आगाऊ नोटीस द्यायला इंगेजमेंट म्हणजे संप नव्हे, सदा.

**नितीन** : (खाली येत) शेवटी संपावरच जावं लागणार आहे मला आणि ताईला. (दीनानाथ वळून नितीनकडे पाहतो.) बाबा, तुम्ही आम्हांला गुलाम समजत असलात तरी आम्ही माणसं आहोत. लग्न ही आमची खाजगी बाब आहे. त्यात तुमची अरेरावी नाही सहन करणार आम्ही.

**दीनानाथ** : लेक्चर द्यायला हे कामगार मैदान नाही— माझं घर आहे. माझ्या मर्जीप्रमाणे वागणाऱ्यांनाच या घरात राहता येतं.

**नितीन** : तुम्हाला काय वाटतं, हे घर सोडलं तर आम्हांला जगता येणार नाही बाहेरच्या जगात?

**दीनानाथ** : प्रयत्न करून पाहा. बापाच्या पंखाखाली राहून अशा घोषणा करणं सोपं असतं. पण प्रत्यक्षात तसं वागणं तेव्हढंच कठीण असतं. उद्या ती मंडळी इथं येणार. इंगेजमेंटची तारीख ठरवणार. आणि रेखाची-तुझी परीक्षा झाल्या-बरोबर लग्न उरकून घेणार आहे मी. (नितीन हसतो.) स्टॉप इट! हसायला काय झालं?

**नितीन** : परीक्षा झाल्यावर ना! म्हणजे आणखी सहा महिन्यांनी.
(पुन्हा हसतो.)

दीनानाथ : आय से स्टॉप इट.

नितीन : बाबा, सहा महिन्यांनी तुम्ही ठरवलेली आमची लग्नं तुमच्या डोळ्यांदेखत होऊ शकणार नाहीत.

दीनानाथ : का ?

नितीन : कारण ऐकायचंय ?

सदानंद : ( नितीनकडे जात ) नितीन !

नितीन : प्लीज अंकल. या अहंकारी माणसाचा अहंकार उतरायला हाच क्षण आहे. बाबा, तुम्ही पुढल्या आयुष्याची डायरी लिहिता ?

दीनानाथ : होय.

नितीन : स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या आयुष्याची सुद्धा ?

दीनानाथ : येस्, बाय ऑल मीन्स.

नितीन : पण तुमची ही डायरी चुकीची आहे. तुमचं आयुष्य फक्त सहा महिन्यांचं आहे, असं जर तुम्हांला कुणी सांगितलं तर तो धक्का सोसण्याइतकं मनोधैर्य आहे तुमच्यात ?

सदानंद : नितीन !

दीनानाथ : तर कशाला ? से इट पॉझिटिव्हली.

नितीन : मग ऐका तर, डॉक्टरी रिपोर्टप्रमाणे तुमचं आयुष्य जास्तीत जास्त सहा महिन्यांचं आहे. त्या काळात जेव्हढा छळ करायचा असेल आमचा तेव्हढा करून घ्या. यु आर ए पेशन्ट ऑफ लुकोमिया.

( नितीन बाहेर निघून जातो. )

दीनानाथ : सदा, इज इट ए फॅक्ट ?

सदानंद : येस !

दीनानाथ : सो व्हॉट ? कुणी सांगितलं तुला ?

सदानंद : डॉक्टरांनी.

दीनानाथ : मग माझ्यापासून का लपवलं त्यांनी ?

सदानंद : तुला धक्का बसू नये म्हणून.

दीनानाथ : डॉक्टरांनी अजून दीनानाथला ओळखलेलं नाही. जीवन जितक्या सहजपणे स्वीकारलं तितक्याच सहजतेनं मरणही स्वीकारीन मी. पण तसूभरही न वाकता.

सदानंद : दीनानाथ, अजून तरी हा अहंकार सोडून दे. अरे, जीवन ही एक अशी गोष्ट आहे की ती पुन्हा नाही मिळत.

दीनानाथ : जीवन एकदाच जगायचं असतं सदा. नि मी ते जगलो समर्थपणे.

सदानंद : होय. पण ते फक्त तुझ्यासाठी—तुझ्या अहंकारासाठी— प्रतिष्ठेसाठी,

हट्टासाठी. आता फार थोडे दिवस राहिलेत, त्याचं तरी सोनं कर. माणसाचं जीवन चांदण्यासारखं असतं. दुसऱ्याला प्रकाश देण्यासाठी– त्याचं जीवन फुलवण्यासाठी.

दीनानाथ : पण चांदणं पसरणाऱ्या चंद्रासारखा मी परप्रकाशी नाही सदा! मी स्वयंप्रकाशी आहे. सदानंद, माझं जीवन फक्त माझं आहे– उरलेले सहा महिनेही माझे आहेत. त्यातला प्रत्येक क्षण माझा आहे. तो माझा म्हणूनच जगणार आहे मी माझ्यासाठी. माझ्या इच्छेनुसार मला जे हवं ते घडवून आणणार आहे मी.

सदानंद : दिना, अरे घडतो तो माणूस– घडवतो तो परमेश्वर.

दीनानाथ : आय डोन्ट बिलीव्ह. सदा, मी जे ठरवलंय तसंच घडून येणार आहे– मी घडवून आणणार आहे. पाच वर्षांत घडवून आणायच्या गोष्टी मला फक्त सहा महिन्यांत घडवून आणाव्या लागतील इतकंच. (वर निघून जातो.)

□

## अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ पहिल्या अंकातील दीनानाथांचा दिवाणखाना. वेळ सकाळची. पडदा वर जातो त्या वेळी दिवाणखान्यात कुणीही नसतं. तोच डाव्या बाजूच्या कोपऱ्यातील फोन वाजू लागतो. आतल्या खोलीतून भिकोबा बाहेर येतो व फोन घेतो. ]

भिकोबा : हॅलो, मी भिकोबा ! साहेब बाहेर गेलेयत. हो तब्बेत बरी आहे. हो–हो कधीमधी जातात ऑफिसला. बरं बरं, सांगेन. ( भिकोबा रिसीव्हर खाली ठेवेपर्यंत उजव्या बाजूच्या कोपऱ्यातील फोन वाजू लागतो. भिकोबा घाई-घाईने हा फोन ठेवतो व लगबगीने तो फोन घ्यायला जातो. रिसीव्हर उचलतो. हॅलो, मी भिकोबा ! तब्बेत बरी आहे. हो-हो. मी सांगेन. ( पुन्हा डाव्या कोपऱ्यातील फोन वाजू लागतो. भिकोबा त्रासिक मुद्रेने पाहतो. याच वेळी आपल्या खोलीतून बाहेर आलेला नितीन हे पाहात आहे. भिकोबा घाई-घाईने फोन ठेवतो व डाव्या बाजूचा फोन घ्यायला धावतो. फोन घेतो. ) ( चिडून ) साहेबांची प्रकृती बरी आहे. ते बाहेर गेले आहेत. ( फोन ठेवतो. नितीन मोठमोठ्याने हसतो. ) माझा जीव चाललाय या धावपळीनं नि तुम्हाला हसू फुटतंय. अहो, गेला महिनाभर हेच चाललंय सकाळपासून. या धावपळीनं माझं वजन कमी झालं दहा पौंड.

नितीन : डाएटिंग न करता ? छान !

भिकोबा : छान काय ! कधी कधी एकाच वेळी दोन्ही फोन वाजतात. ( दोन्ही

फोन्स वाजू लागतात. ) बघा. ( एक फोन घ्यायला जातो. नितीन दुसरा फोन घेतो. )

**नितीन** : ( रिसीव्हर उचलतो. ) रॉंग नंबर. ( फोन ठेवतो. )

**भिकोबा** : काय म्हणालात ?

**नितीन** : रॉंग नंबर.

**भिकोबा** : कसला नंबर ?

**नितीन** : रॉंग नंबर !

**भिकोबा** : ( रिसीव्हर ठेवतो. ) रॉंग नंबर. ( हसत ) हे चांगलं आहे बघा. रॉंग नंबर. ( म्हणत आत जातो. नितीन सोफ्यावर बसून वर्तमानपत्र वाचू लागतो. पण त्याचं मन लागत नाही. तो रेडिओग्रामकडे येतो. रेडिओ ऑन करतो. गाणं लागतं, " पिया बिन नाही आवत चैन. " रेडिओग्रामवर कोपर टेकून भारावून तो गाणं ऐकू लागतो. तोच प्रवेशद्वारातून प्रिया येते. १७–१८ वर्षांची, निष्पाप चेहऱ्याची गोड तरुणी. नितीनचं सहज लक्ष जातं. )

**नितीन** : प्रिया ! तू ? ( रेडिओ बंद करून तिच्याजवळ जातो. ) खरंच तू ? विश्वास नाही बसत. ( अगदी जवळ जातो व तिचा हात हातात घेतो. )

**प्रिया** : पटली खात्री ?

**नितीन** : पूर्णपणे नाही. ( तोंड जवळ नेतो. ती दूर सरकते. ) पण तू आलीस कशी ?

**प्रिया** : ते माझंच मला ठाऊक नाही. खूप खूप वाटलं तुला भेटावंसं म्हणून– नि तशीच आले.

**नितीन** : पण तुझे काका ? त्यांनी तुझ्या पाळतीवर ठेवलेला तो नोकर.

**प्रिया** : जाऊदे रे. प्यार किया तो डरना क्या ?

**नितीन** : मला वाटतं हल्ली पुरुषापेक्षा बायकाच जास्त धीट झाल्यायत् ! ए, पण त्या दिवशी तुझ्या नोकरानं मला कसं ओळखलं ग ?

**प्रिया** : नुसती दाढी लावलीस तू. पण आवाज तोच.

**नितीन** : तुला ओळखता यावा म्हणून नाही बदलला आवाज !

**प्रिया** : ते जाऊदे रे. पण मला सांग. तू पुढल्या महिन्यात मोकळा आहेस ना !

**नितीन** : का ?

**प्रिया** : माझ्या लग्नाला येणार नाहीस तू ?

**नितीन** : तुझं लग्न ?

**प्रिया** : हो ! काका ठरवताहेत.

**नितीन** : हे सांगायला आलीस ? कळलं मला. लग्न-पत्रिका नाही पाठवलीस तरी येईन आहेर घेऊन– आपल्या प्रेमपत्रांचा. ( रागावून पुढे येतो. )

प्रिया : रागावलास ? अरे थट्टा केली मी. नाही, म्हणजे काका माझ्यासाठी नवरामुलगा शोधताहेत हे खरं. पण मी त्याच्याशी लग्न करणार ही थट्टा.

नितीन : तू म्हणजे अशी आहेस !

प्रिया : अशी म्हणजे कशी आहे रे मी ?

नितीन : हे सांगायचं म्हटलं म्हणजे सिनेमातल्यासारखं एखादं गाणं म्हणावं लागेल. चौधवी का चांद हो– या आफताब हो– जो भी हो तुम खुदा की कसम ला जवाब हो. ( दोघेही हसतात व पुढे येतात. याच सुमारास बाहेरून दीनानाथ येतात. सावकाश. ते थबकतात. )

प्रिया : ए, सांग ना. आणखी किती काळ मी काकांना थोपवून धरायचं ?

नितीन : फार काळ नाही– आणखी तीन-चार महिने बस्स !

प्रिया : तीन-चार महिन्यांनी परवानगी मिळेल तुला ?

नितीन : आपोआप मिळेल. ( दीनानाथ दचकतात. )

प्रिया : म्हणजे ?

नितीन : ते तुला नाही कळायचं.

प्रिया : पण हे नक्की ना ?

नितीन : एकदम नक्की.

प्रिया : आज मी तुझ्या घरी यायला निघाले ना, तेव्हा मनातून इतकी घाबरले होते; तुझ्या वडलांविषयी इतकं ऐकलं होतं; त्यांचा स्वभाव, शिस्त, दरारा ..

नितीन : तो संपला आता. नखं नि दात काढले की वाघ काही करू शकत नाही— गुरगुरण्याशिवाय. ( हसतो. दीनानाथांचा चेहरा रागाने फुलून येतो. पण ते स्वतःला सावरतात व एकेक पाऊल टाकीत जिन्याच्या रोखाने येतात व जिना चढू लागतात. त्यांच्या पावलांच्या आवाजाने नितीन व प्रिया मागे वळून पाहतात. प्रिया घाबरून उठते— नितीन तिला हाताला धरून खाली बसवतो. )

प्रिया : पण मी काकांना काय सांगू ?

नितीन : सांग, संस्थान लवकरच खालसा होणार आहे. ( दीनानाथ थबकतात. पण काही न बोलता आपल्या खोलीत निघून जातात. )

प्रिया : मी जाते रे, मला भीती वाटते.

नितीन : तुझ्या काकांची ?

प्रिया : नाही रे, तुझ्या वडलांची. मी त्यांच्याकडे पाहिलं ना मघाशी, त्या वेळी त्यांच्या डोळ्यांत अंगार फुलले होते.

नितीन : विझण्यापूर्वी निखारे असेच फुलून येतात. तू बस. मी आलोच चेंज करून. आपण बाहेरच बोलू कुठे तरी. ( घाईघाईने आपल्या खोलीत

निघून जातो. प्रिया उठते. घर न्याहाळते. पिआनोकडे जाते. प्रमीलचा फोटो पाहते— स्टुलावर बसते. पिआनो उघडते व वाजवू लागते आपल्याच नादात नि याच सुमारास तो आवाज ऐकून मनोरमा आतल्या खोलीतून बाहेर येते. )

**मनोरमा** : प्रमील. ( जवळ जाते. चाहूल लागताच प्रिया वळते. ) तू ?

**प्रिया** : प्रिया, नितीनला भेटायला आले होते.

**मनोरमा** : मला वाटलं माझी प्रमीलच परत आली.

**प्रिया** : प्रमील कोण ?

**मनोरमा** : नितीनची धाकटी बहीण. (फोटोकडे पाहून निःश्वास सोडते. प्रिया समजते. )

**प्रिया** : तुम्ही नितीनच्या आई ना ?

**मनोरमा** : हो.

**प्रिया** : नितीन नेहमी सांगत असतो तुमच्याबद्दल. माझी आई किती चांगली आहे– प्रेमळ आहे– या वयातसुद्धा किती सुंदर दिसते.

**मनोरमा** : अग, आई झाली म्हणून किती स्तुती करायची ?

**प्रिया** : पण स्तुती करायलासुद्धा आई हवी असते.

**मनोरमा** : म्हणजे ?

**प्रिया** : मला आई नाही.

**मनोरमा** : ( तिला जवळ घेत ) पुन्हा असं म्हणायचं नाही मी जवळ असताना. ( आतून नितीन येतो. )

**नितीन** : बरं झालं सासू-सुनेची आधी ओळख झाली ती. माझा त्रास वाचला.

**मनोरमा** : नितीन तू माझ्याकडे काहीच बोलला नाहीस हिच्याबद्दल.

**नितीन** : काकांशी बोललो– बाबांशी बोललो. तुला आवडली ना ?

**मनोरम** : अरे, कुणालाही आवडेल अशीच आहे.

**नितीन** : प्रिया, लग्नापूर्वी सासूनं दिलेलं सर्टिफिकेट फारसं मनावर घ्यायचं नसतं. लग्नानंतरचं सर्टिफिकेट महत्त्वाचं.

( तिन्हेही हसतात. याच वेळी साध्या कपड्यात दीनानाथ आपल्या खोलीतून बाहेर येतात— थांबतात. ते हसणं त्यांच्या जिव्हारी लागतं. दीनानाथ वर उभे आहेत, याची कुणाला कल्पनाच नाही. रेखा बाहेरून येते. )

**रेखा** : कुणाचं कौतुक चाललंय एव्हढं ?

**नितीन** : सुनेचं.

**मनोरमा** : आलेच हं मी. जाऊ नकोस मी येईपर्यंत.

**नितीन** : तू म्हणत असशील तर कायमचीच थांबवून घेतो.

( मनोरमा लटक्या रागाने आत जाते. ) ताई, ही प्रिया.

रेखा : मी ओळखते हिला ! तूच नाही का पाठवणार होतास मला हिच्याकडे तुझा निरोप घेऊन ?

नितीन : पण तुझा त्रास वाचवण्यासाठी ही स्वतः होऊन आली ! प्रिया ही आमची रेखाताई—तुझ्या वन्सं— मेडिकलला आहेत.

रेखा : तू तर अगदी लग्न झाल्यासारखंच बोलतो आहेस ?

नितीन : आता फक्त भटजी नि मंगलाक्षदाच बाकी आहेत.

रेखा : म्हणजे ?

नितीन : तुला पसंत पडली— आईला पसंत पडली— काकांना पडेलच.

रेखा : पण बाबा...

नितीन : त्यांच्या पसंती ना पसंतीची पर्वा आता कशाला ?

रेखा : नितीन.

नितीन : तू मात्र उगीच घाबरलीस बाबांना. त्याच वेळेला मिलिंदबरोबर निघून जायचं— मी गेलो असतो.

दीनानाथ : ( वरून ) अजूनही जाऊ शकता.

( तिघेही दचकून वर पाहतात. )

नितीन : गेलो असतो. पण आईसाठी थांबलो.

दीनानाथ : ( खाली येत ) कुणी कुणाकरता थांबायची आवश्यकता नाही.

नितीन : आणि कुणीही थांबणार नाही.

दीनानाथ : मला ठाऊक आहे. तुम्ही सारे वाट पाहताय त्या दिवसाची.

रेखा : नाही बाबा.

दीनानाथ : खोटं बोललेलं मला आवडत नाही. वरून दुःखाचं खोटं नाटक कशाला करता ? तुम्हा सर्वांना आनंदाच्या उकळ्या फुटताहेत आतून.

नितीन : यू सेड इट.

दीनानाथ : शट अप ! तुला काय वाटलं मरणाच्या भीतीनं मी वाकेन—तुम्हांला शरण येईन— तुमचं हवं ते ऐकून घेईन ? शेवटच्या घटकेपर्यंत माझाच हुकूम या घरात चालणार आहे. त्यानंतर तुमचाही चालणार नाही; कारण माझी सारी संपत्ती— हा बंगला अनाथाश्रमाला देऊन टाकलाय मी ! माझ्या मरणानंतर ! यू ऑल विल बी ऑन द स्ट्रीट.

नितीन : जिवंतपणी कधी सुख दिलं नाहीत— मेल्यानंतर काय देणार ?

रेखा : नितीन.

दीनानाथ : तसं विल करून आलोय मी आजच ! रेखा, ही मुलगी कोण ?

नितीन : प्रिया !

दीनानाथ : प्रश्न रेखाला विचारला होता.

नितीन : पण प्रश्न माझा आहे म्हणून मी उत्तर दिलं.

**दीनानाथ :** ही या घरात का आली ?

**नितीन :** मला भेटायला !

**दीनानाथ :** मी बंदी केली होती !

**नितीन :** पण तरीही—

**दीनानाथ :** नो डिस्कशन ! अजून मी जिवंत आहे. हे घर माझं आहे. मला नको असलेली माणसं या घरात आलेली मला चालणार नाहीत.

**नितीन :** किती दिवस ही अरेरावी चालवणार तुम्ही ?

**दीनानाथ :** मी जिवंत असेपर्यंत. रेखा, त्या मुलीला जायला सांग.

**प्रिया :** मी जाते. आपण रागावू नका. नाही येणार मी पुन्हा इथे ! मला आई नाही नि वडील पण नाहीत असं खरंखुरं मनापासून रागवायला ! आज नितीनची आई पाहिली— तुम्हांला पाहिलं नि माझे आई-वडील भेटल्याचा आनंद झाला. रागवायला का होईना, पण मला वडील हवे होते. (आवेगाने जाऊ लागते.)

**दीनानाथ :** थांब. नितीन, पोचवून ये तिला घरापर्यंत. ( नितीन, रेखा, प्रिया चकित होऊन पाहू लागतात. दीनानाथ लायब्ररीकडे येतात. नितीन व प्रिया जातात. रेखा आपल्या खोलीत जाते. आतून मनोरमा येते. )

**मनोरमा :** अं. गेली कुठे प्रिया ?

**दीनानाथ :** आपल्या घरी.

**मनोरमा :** प्रथमच आली होती म्हणून तोंड गोड करणार होते तिचं.

**दीनानाथ :** इतकी घाई कशाला ? आणखी थोडे दिवस थांबा ? मग सर्वांचंच तोंड गोड करा.

**मनोरमा :** हे बोलवतं तरी कसं आपल्याला ?

**दीनानाथ :** खरं तेच बोललो ! तुम्ही सगळीजणं वाट पाहताहात त्या दिवसाची.

**मनोरमा :** ( व्याकुळपणे ) नाही हो.

**दीनानाथ :** उगीच दुःखाचा खोटा मुखवटा कशाला लावता चेहऱ्यावर ? मी तुम्हा सर्वांना ओळखतो. तुम्हाला, नितीनला, रेखाला, भिकोबाला ! तुम्ही वाट पाहताय सुटकेची ? तुमच्या सर्वांच्या दृष्टीने मी दुराग्रही आहे— हुकूमशहा– निर्दय आहे.

**मनोरमा :** तुम्ही कसेही असलात तरी माझे पती आहात.

**दीनानाथ :** फक्त एव्हढंच दुःख आहे तुमचं ! माझ्याबद्दल नाही. कपाळीच्या कुंकवाचं ! भीती आहे तुम्हांला, तुमचा आधार जाणार आहे ही ! पण तुम्ही काळजी करू नका— इतरांची नाही पण तुमची सोय केलीय मी मृत्युपत्रात.

**मनोरमा :** दीनानाथ !

दीनानाथ : कधी काळी का होईना खऱ्या प्रेमाचे क्षण उपभोगलेयत मी तुमच्या बरोबर. त्याचीच परतफेड समजा ही.

मनोरमा : परतफेड करायला संसार म्हणजे मारवाड्याची पेढी समजलात तुम्ही ? जे क्षण मी तुम्हांला दिले– सर्वस्वासह दिले– त्याची किंमत करताय तुम्ही ? तुमची तरी काय चूक ? प्रत्येक गोष्ट तुम्ही पैशानं तोलता ! बदलून घ्या ते मृत्युपत्र- मला काहीही नको ! त्या गरिबीच्या संसारात काढलेले ते क्षण पुरेसे आहेत मला, जगलेच तर पुढल्या आयुष्यात. ( आत निघून जाते. दीनानाथ दिङ्मूढ होऊन पाहू लागतो— उठतो व जिन्याकडे जाऊ लागतो. तोच सदानंद येताना त्याला दिसतो. )

दीनानाथ : सदा, आज वाटत होतं की तू यावास.

सदानंद : काही विशेष ?

दीनानाथ : नाही रे, सहज ! वाटलं काही काळ ही मोठेपणाची झूल उतरवून गप्पा मारत बसावं दोस्ताशी. ॲण्ड यू नो, उभ्या आयुष्यात एकच दोस्त आहे मला, ॲण्ड दॅटस् यू. ( हसतो. )

सदानंद : फार दिवसांनी इतकं मनमोकळं हसलास दिना !

दीनानाथ : हसायच विसरूनच गेलो होतो मी– जाऊ दे. पण आज तू या वेळी ?

सदानंद : मी रजेवर आहे आजपासून— रिटायर होण्यापूर्वीची सक्तीची रजा.

दीनानाथ : माझीही मुदत संपत आलीय रजेची सदा. बस्स ! काही महिन्यांचा काळ !

सदानंद : दिना !

दीनानाथ : जन पळभर म्हणतील हाय हाय. (एकदम) सदा, मी मरणाला नाही घाबरत ! मला खात्री आहे की येण्यापूर्वी मृत्यूलाही विचारावं लागेल मला, मी आत येऊ का म्हणून ? पण—

सदानंद : पण काय ?

दीनानाथ : ज्यांच्यासाठी मी सर्व काही केलं— ज्यांना सर्व काही दिलं ती माझी माणसं माझ्या मरणाच्या कल्पनेनं सुखावली आहेत.

सदानंद : मला कल्पना आहे त्याची. पण ती का सुखावली आहेत ?

दीनानाथ : त्यांना मोकळेपणा मिळणार आहे. हवं ते करण्याचं— हवं तसं वागण्याचं स्वातंत्र्य मिळणार आहे म्हणून.

सदानंद : हे कारण नाही दिना ! तू त्यांना सर्व दिलंस ! पण सर्व म्हणजे काय ? पैसा-गाडी– दोन वेळचं जेवण–पॉकेट मनी ! नाही दिना ! याऐवजी तू फक्त प्रेम दिलं असतंस त्यांना, तरी ते सुखी झाले असते. वैनीचा नि तुझा प्रेमविवाह. पण गेल्या कित्येक वर्षांत तू प्रेमाचा एक शब्द बोललास वैनीशी ? आमची बछडी गेली. त्या वेळी गेलास तू वैनीकडे– केलंस तिचं सांत्वन ? नाही !

दीनानाथ : मला हे खोटे शिष्टाचार आवडत नाहीत.

सदानंद : हे शिष्टाचार नाहीत. हा आहे आपल्या जोडीदाराबद्दलचा जिव्हाळा. ते जाऊदे, पण कधी या मुलांशी प्रेमानं बोललास ? कधी चौकशी केलीस ? फक्त पैसे फेकले की कर्तव्य संपतं असं वाटतं तुला ?

दीनानाथ : पण पैसे फेकायलासुद्धा ते कमवावे लागतात.

सदानंद : आणि पैसे कमावण्याच्या व्यसनात तू घरातलं सुख-- प्रेम हरवून बसलास.

दीनानाथ : पण कुणासाठी कमवत होतो मी हे वैभव ? मुलांसाठीच ना ?

सदानंद : पण तुझ्या मनातलं हे सारं मुलांना कसं कळावं ? तू तसं सांगितलंस त्यांना विश्वासात घेऊन ?

दीनानाथ : नाही. कारण ज्या वातावरणात मी घडलो ते वातावरण मी विसरू शकत नाही. ती शिस्त — तो कठोरपणा—

सदानंद : तू तुझ्या मुलांच्यावर लादलास, तुझ्या लहानपणीचा सूड घेण्यासाठी.

दीनानाथ : सदा, निदान तू तरी मला समजून घे. लहानपणी भोगलेल्या शिस्ती-मुळे – कठोर वागणुकीमुळेच हा आजचा दीनानाथ दिसतोय तुला. मला आठवतंय सदा, त्या वेळी मी सारा आठ वर्षांचा होतो. आई नव्हती. तिचं प्रेम काय असतं ते अनुभवलंच नाही मी. वाढलो वडिलांच्या बरोबर. वडील पुजारी होते देवळात. सकाळी पाचाला काकडआरतीला मला घेऊन जायचे. नंतर संध्या. ती झाली की घरची देवपूजा. नंतर अभ्यास. फक्त गुळपाण्या-बरोबर. रोज गीतेचा एक अध्याय पाठ करून घ्यायचे माझ्याकडून. एक दिवस माझा अध्याय पाठ झाला नाही म्हणून रात्रभर त्यांनी मला परसात ठेवलं उपाशी. ही शिस्त -- हा कठोरपणा माझा पिंड घडवीत गेला, सदानंद ! मला कळत न कळत.

सदानंद : मी समजू शकतो तुला. वैनी समजू शकतात.

दीनानाथ : नाही, मला कुणीही समजू शकत नाही. समजून घेऊ शकत नाही. सगळ्यांच्या दृष्टीने मी एक सैतान आहे माणसाचं कातडं पांघरलेला. म्हणू-नच ती सारी जणं वाट पाहात आहेत त्या दिवसाची.

सदानंद : नाही दिना.

दीनानाथ : मी पाहतोय सारं ! प्रत्येकजण आपापल्यात दंग आहे. कुणालाही खंत नाही, खेद नाही. कुणाच्याही डोळ्यांत अश्रूचा एक थेंब नाही.

सदानंद : पण अश्रू हे दुबळ्या माणसाचं लक्षण आहे असं तूच म्हणायचास. तुला अश्रू आवडत नाहीत, दिना. दीनानाथ, आज तुला कळली अश्रूंची किंमत ! आनंद विकत मिळतो – अश्रू नाही विकत मिळत पैशानं. तुझं सारं वैभव कवडीमोल आहे एका खऱ्या अश्रुबिंदूसमोर. बाजारात मोती

विकत मिळतात, अश्रू नाही मिळत. आता तू कितीही याचना केलीस अश्रू-साठी तरी तुला ते मिळणार नाहीत. स्वतःच्या मृत्यूबद्दल इतरांनी आनंद मानावा -अश्रूंचा एक थेंबही येऊ नये कुणाच्या डोळ्यांत -- यासारखा दुसरा पराभव नाही माणसाचा ! तुझा पराभव झाला आहे दीनानाथ — तुझा पराभव झाला आहे.

**दीनानाथ** : ( असहाय्यपणे ) स्टॉप इट सदा, स्टॉप इट !

**सदानंद** : तुला संधी मिळाली होती उरलेल्या त्या दिवसांचं सोनं करण्याची. पण ते दिवस तुझे होते – फक्त तुझे होते. मग भोग ते दिवस एकलेपणानं. कशाला कुणाच्या सहानुभूतीची – अश्रूंची अपेक्षा करतोस ?

**दीनानाथ** : ( उसन्या अवसानानं ) कुणी सांगितलं तुला हे ? मला पर्वा नाही अश्रूंची – कुणाच्या सहानुभूतीची ! तुझ्यासुद्धा !

**सदानंद** : दिना !

**दीनानाथ** : यस, आय सेड इट. सूर्यालासुद्धा सावलीची सोबत नसते. मग मी तरी ती अपेक्षा का बाळगावी ? सांग घरातल्या सगळ्यांना – सांग की हसा– आनंदाने हसा. ( जिन्याकडे जातो. ) एक सूर्य अस्ताला जातो आहे – हसून घ्या ! माध्यान्हीच्या सूर्याकडे पाहण्याची हिम्मत नव्हती तुमची — अस्ताला जाणाऱ्या सूर्याकडे पाहून घ्या ! ( वर पायऱ्या चढतो. विकलपणे ) सदानंद, अस्ताला गेलेला सूर्य पुन्हा उगवेल. ( छातीशी हात धरतो. ) पण माझ्या बाबतीत फक्त अस्त ! आणि त्यानंतर फक्त अंधार — अंधार. ( वर जाऊ लागतो. रंगभूमीवर हळूहळू अंधार येऊ लागतो. )

## प्रवेश दुसरा

[ पहिल्या प्रवेशानंतर काही काळ लोटलेला आहे. वेळ संध्याकाळची. आतल्या खोलीतून भिकोबा येतो व दिवे लावतो. तोच 'पोष्टमन' अशी हाक ऐकू येते. भिकोबा बाहेर जातो. पत्र व कागद घेऊन येतो. याच वेळी रेखा आतल्या खोलीतून बाहेर येते. ]

भिकोबा : यावर सही करा. एक्सप्रेस आहे.

( रेखा सही करते. भिकोबा कागद घेऊन बाहेर जातो. )

रेखा : माझंच पत्र. ( फोडते व खालची सही वाचते. ) तुझा मिलिंद ! म्हणे तुझा मिलिंद ! इतक्या दिवसांनी आज आठवण झाली. ( सोफ्यावर जाऊन बसते व अधीरतेने पत्र वाचू लागते. आतून बॅडमिंटनची रॅकेट घेतलेला नितीन येतो. तिच्या पाठीमागे येऊन उभा राहतो. )

नितीन : तुझा मिलिंद ! ( रेखा पत्र लपवते. )

रेखा : दुसऱ्याची पत्र चोरून वाचू नयेत हे नाही कळत नि म्हणे कायद्याचा अभ्यास करतो.

नितीन : हे पत्रं दुसऱ्याचं नाही. मिलिंदचं म्हणजे आमच्या भावी– ब्रदर-इन-लॉचं आहे. त्याचं पत्र वाचणं कायद्यात बसतं.

रेखा : बरं, बरं. ( उठते. )

नितीन : रागावतेस काय ? हवी तर मला प्रियानं लिहिलेली सर्व प्रेमपत्रं तुला वाचायला देतो. बरं मला सांग, काय म्हणताहेत सरहद्दीवरले वीर मिलिंद ?

रेखा : त्याची बदली झाली पुन्हा मुंबईत.

नितीन : दुनिया गोल आहे हेच खरं. येतोय केव्हा मुंबईत ?

रेखा : आज— आत्ताच्या प्लेननं.

नितीन : तू जाणार असशीलच त्याला रिसीव्ह करायला ?

रेखा : अर्थात. ( हसत हसत आत निघून जाते. नितीन रॅकेट घेऊन बाहेर जायला वळणार तोच दारात प्रिया उभी असलेली दिसते. )

नितीन : बरं झालं अगदी वेळेवर आलीस. मी आता क्लबवर निघालो होतो.

प्रिया : मी दोनदा फोन करण्याचा प्रयत्न केला, पण सारखा एंगेज.

नितीन : फोन पण छोट्या मालकासारखाच एंगेज आहे. ( हसून ) अग, सकाळपासून लाईन बिघडलीय.

प्रिया : मला काहीच कळेना. पण आज तुला भेटायलाच हवं होतं. म्हणून धीर केला. तुमच्या बंगल्याच्या फाटकापर्यंत आले—वॉचमनला विचारून खात्री करून घेतली तुझे वडील घरात नाहीत याची.

नितीन : पण एव्हढं काम तरी काय काढलंस महत्त्वाचं ?

प्रिया : मी रात्रीच्या गाडीने चाललेय काकांबरोबर.

नितीन : कशाला ?

प्रिया : मला दाखवायला घेऊन चाललेयत काका— इंदूरचं स्थळ आहे.

नितीन : इतक्या दूरचं ?

प्रिया : थट्टा नको ! मी काय करू ?

नितीन : तू जा इंदूरला. ते स्थळ पाहा. शिवाय इंदूरला बरीचशी प्रेक्षणीय स्थळं आहेत— राजवाडा, शीशमहल.

प्रिया : नितीन, प्लीज !

नितीन : अग, सीरिअसली बोलतोय मी. अग आपण जातो ट्रीपला तेव्हा पाहतोच की नाही प्रेक्षणीय स्थळं ? तसंच हेही स्थळं पाहा नि परत ये.

प्रिया : नि पसंत पडलीस त्यांना तर लग्नही कर— असंच ना ?

नितीन : अग, स्थळ पाहणं नि ॲक्चुअल लग्न ठरणं, यामध्ये बराच काळ व्यतीत होत असतो, तोपर्यंत काही तरी मार्ग निघेलच.

प्रिया : मला आत्महत्येशिवाय मार्ग उरणार नाही.

नितीन : जीव जिवाला द्यायचा असतो-- मातीला नाही. हे खांडेकरांचं वाक्य विसरलीस ? प्रिया रागाने तोंड फिरवते— खरं म्हणजे तुला मी सांगणार नव्हतो— पण सांगतो.

प्रिया : काय ते ?

नितीन : मी नोकरीसाठी अर्ज केला आहे. बस्स नोकरी मिळाली की आपण जायचं ते थेट हनीमूनला.

प्रिया : पण लग्न ?

नितीन : लग्न करूनच ग !

प्रिया : पण तुझे वडील...

नितीन : लग्नात नवरा-नवरी नि भटजी असावे लागतात. वडील असायलाच हवेत असं नाही.

प्रिया : पण मला आपलं वाटतं की आपल्या लग्नात तुझे आई-वडील असावेत आशीर्वाद द्यायला.

नितीन : मग तू ते इंदूरचं स्थळ नक्की करून ये.

प्रिया : का ?

नितीन : कारण आपल्या लग्नाला बाबांचा आशीर्वाद मिळणार नाही. त्यांनी माझं लग्न ठरवलंय ! कळलं ?

प्रिया : हो.

नितीन : मग ठरलं तर.

प्रिया : काय ?

नितीन : तू स्थळं पाह्यचीस– मी नोकरी ! (ती हसते.) ए, पण ते इंदूरचं स्थळ खरंच चांगलं असलं तर— म्हणजे माझ्यापेक्षा ग.

प्रिया : रोशनी चांदसे आती है सितारोंसे नहीं । मोहब्बत एकसे होती है हजारोंसे नहीं ।

नितीन : इंदूरला जायचं म्हणून शेर वगैरे पाठ करून ठेवलेस वाटतं !

प्रिया : हो, बरं ! ( एकदम ) ए, मी चलते रे.

नितीन : एकदम असा जाण्याचा झटका काय आला तुला ?

प्रिया : अरे, कुठल्याही क्षणी तुझे वडील येतील.

नितीन : येतील ! त्यांचंच घर आहे हे.

प्रिया : त्या दिवशीसारखा प्रसंग नको बाई यायला.

नितीन : पण शेवटी त्यांनी मला सांगितलं की नाही तुला घरापर्यंत पोचवायला ?

प्रिया : मी सांगू तुला नितीन ? तुझे वडील बाहेरून कसेही भासू देत– आतून अतिशय हळवे आहेत.

नितीन : हे तुम्ही आम्हांला सांगा ! वीस वर्षे काढलीयत त्यांच्या बरोबर ! त्यांच्या डोळ्यांत एकदाच पाणी बघितलं मी— त्यांचे डोळे आले होते तेव्हा ! चल, क्लब आता बोंबललाच आहे. तुला तरी सोडून येतो.

( रकेट रेडिओग्रामवर ठेवतो. व प्रियाबरोबर बाहेर निघून जातो. तोच आतल्या खोलीतून मनोरमा बाहेर येते. )

मनोरमा : भिकोबा ऽ, ए भिकोबा ऽऽ

( भिकोबा सैंपाकघरातून येतो. )

भिकोबा : काय बाईसाहेब ?

मनोरमा : अजून आले नाहीत हे ?

भिकोबा : नाही.

मनोरमा : जा.तू. (भिकोबा जातो.) का इतका उशीर झाला काही कळत नाही ! (दीनानाथाच्या फोटोसमोर येते.) स्वतः काळजी घ्यायची नाही ती नाही नि दुसऱ्याला काळजीत पाडायचं. (पिआनोकडे येते. पिआनोसमोरील स्टुलावर बसते. तोच तिच्या कानी शब्द येतात— दीनानाथाचे—) "वाजव ना मनू— ते गाणं–माझ्या आवडीचं— ते सूर ऐकले की मी विसरून जातो सारा शीण ! विसरून जातो मी बाप आहे दोन मुलांचा ! गॅदरिंगमध्ये पिआनोवर तू वाजवलेलं हे गाणं मी ऐकू लागलो की ते सारे क्षण सजीव करतात हे सूर. (मनोरमा भारावून नकळत पिआनोवर ते गाणं वाजवू लागते.)

तो स्पर्श चंदनाचा
की गंध यौवनाचा
उधळीत रंग आला
स्वप्नातल्या स्वरांचा
ती रात्र धुंद होती
स्वप्नात दंगलेली
धरती प्रकाशवेडी
ओल्या दवात न्हाली
हे चांदणे फुलांनी
शिंपीत रात्र आली.

(तोच आतल्या खोलीतून रेखा येते, बाहेर जाण्याच्या तयारीत. ती तशीच मनोरमेच्या मागे उभी राहते गाणं ऐकत. भिकोबा आतल्या खोलीतून येतो. तोही तसाच उभा राहतो दारात. बाहेरून नितीन येतो तोही ऐकत उभा राहतो. मनोरमेचं लक्ष नितीनकडे जातं. ती थांबवते. तोच रेखा व नितीन टाळ्या वाजवतात. मनोरमा बावरते.)

रेखा : (पुढे येत) किती छान वाजवतेस पिआनो, आई ! वाजव ना.

नितीन : वन्स मोअर, आई.

भिकोबा : आज किती वर्षांनी ऐकली ही पेटी.

रेखा : पिआनो.

भिकोबा : नाही जमायचं म्हणायला.

रेखा : आई, आणखी वाजव ना.

नितीन : आपल्याला कसं म्हणून दाखवेल ? काही काही सूर, काही खास माणसांसाठी असतात.

**मनोरमा** : चल. ( उठू लागते. )

**रेखा** : ( तिला स्टुलावर बसवीत ) मग दाखव तर म्हणून. ( नितीन पण जवळ येतो. मनोरमेचा नाइलाज होतो. ती वाजवू लागते. तोच मोटारीचा हॉर्न वाजतो. सगळे दचकतात. आहे त्याच पोझिशनमधे राहतात. तोच बाहेरून दीनानाथ येतात. )

**दीनानाथ** : ( पहात ) अरे वा ! म्युझिकल कॉन्फरन्स चालली होती वाटतं ?

**मनोरमा** : नाही– मुलांनी हट्ट घेतला म्हणून—

**दीनानाथ** : वाजवत होतीस ? मग थांबलीस का ? सूर अर्ध्यावर सोडू नयेत हं. ( ती बावरते. ) हा मुलांच्या बापाचा हट्ट आहे. ( ती आणखीनंच शरमते. ) जाऊदे ! सोडला हट्ट !

( दीनानाथाच्या या वेगळ्या वागण्यानं मनोरमा, भिकोबा, नितीन, रेखा चकित झाली आहेत. )

**दीनानाथ** : बरं का रेखा, नितीन, पूर्वी तुमची आई काय छान पिआनो वाजवायची ! तुम्ही दोघं लहान होतात तेव्हा ! काय भिकोबा ?

**भिकोबा** : होय साहेब !

**दीनानाथ** : आजची फर्माईश काय आहे भिकोबा ?

**भिकोबा** : वांग्याची भाजी आहे. मसुरीची आमटी आहे.

**दीनानाथ** : गलत मेनू ! तुला ठाऊक नाही वांग्याची भाजी आवडत नाही रेखाला ?

**भिकोबा** : पण आपल्याला आवडते म्हणून.

**दीनानाथ** : म्हणून काय झालं ? वांग्याची भाजी कॅन्सल ! तू असं कर. मटकीची उसळ कर. सर्वांनाच आवडते.

**भिकोबा** : बरं करतो !

**दीनानाथ** : नि गाजराची कोशिंबीर ! पण तू नको करूस. तू मुलखाचा गाजरपारखी आहेस. तुझ्या बाईसाहेब करतील.

**भिकोबा** : बरं साहेब !

**दीनानाथ** : आणि हे बघ, आम्ही सर्वजण एकदम जेवायला बसणार आहोत. ( भिकोबा " बरं " म्हणून आत जातो. ) आणि हो, बरं काहो, (मनोरमेला ) आपल्याला आज पिक्चरला जायचंय.

**मनोरमा** : पिक्चरला ?

**दीनानाथ** : येस ! लास्ट शोला. पूर्वी पाहिलं होतं आपण ! आज पुन्हा एकदा पाहू ! वंडरफूल पिक्चर ! हाऊ ग्रीन वॉच माय व्हॅली !

**रेखा** : अय्या ! आमचं राहूनच गेलं पाह्यचं हे पिक्चर !

**दीनानाथ** : नंतर पाहा ! नॉट टुडे !

रेखा : म्हणजे तुम्ही दोघंच जाणार ?

दीनानाथ : अर्थात ! चौघांनी जायला हा काय कॉम्प्लिमेंटरी पास आहे ? दोन तिकिटं आहेत बॉक्सची ! मी आणि तुमची आई ! ओन्ली फॉर ॲडल्ट्स ! (हसतो.)

रेखा : बाबा आम्हीसुद्धा ॲडल्ट्सच आहोत.

दीनानाथ : बट नॉट अबव्ह फॉर्टी, काय ! अर्थात तुझी आई काही अबव्ह फॉर्टी दिसत नाही अजून.

मनोरमा : हे काय मुलांच्या देखत ?

दीनानाथ : आता ही लहान का आहेत ? दोघंही चक्क प्रेमात पडलीयत ! काय बरं नावं त्यांची– यस, प्रिया नि मिलिंद ? काय रे नितीन, भेटते की नाही प्रिया अजून ?

नितीन : आजच भेटली होती.

दीनानाथ : गुड ? या प्रेमाची पण काय नशा असते नाही ! चोरून भेटण्यात तर क्या बात है ! बरं का रेखा, तुझी आई लग्नापूर्वी मला भेटायला यायची चोरून ? काय हो, आठवतं ना ?

मनोरमा : इश्श !

दीनानाथ : इश्श ! रेखा, तुला सांगून ठेवतो. बाईला इश्श म्हणायची लाज वाटू लागली की समजावं की बाईचं तारुण्य ओसरलं !

रेखा : बाबा, आमच्या कॉलेजात एक लेडी डॉक्टर आहेत. कधी लाजतच नाहीत.

दीनानाथ : छे–छे ! बाईनं असं निर्लज्ज होऊन कसं चालेल ? तिला कुणाच्या तरी प्रेमात पडायला सांग. डॉक्टर मिलिंद वगळून.

रेखा : हे हो काय बाबा ?

दीनानाथ : नि काय ग, तू अगदी तयार होऊन कुठे निघालीयस ?

रेखा : एअर पोर्टवर.

दीनानाथ : ओह ? डॉक्टर मिलिंद यायचा आहे नाही का आज ?

रेखा : तुम्हांला कसं कळलं बाबा ?

दीनानाथ : तो बदली होऊन जाणार हे ज्याला कळलं, त्याला तो परत येणार हेही कळू शकतं.

रेखा : म्हणजे ? बाबा, तुम्हीच हे—

(दीनानाथ तिला जवळ घेतात– थोपटतात.)

दीनानाथ : गो अहेड बेटा. (बड्याळाकडे पाहात) नि हे बघ, जाताना गाडी घेऊन जा माझी ! दीनानाथांची मुलगी जातेय त्यांच्या जावयाला रिसीव्ह करायला ! त्यालाही कळलं पाहिजे.

रेखा : ( भारावून ) बाबा !

दीनानाथ : नि हे बघ, मी आज आर्ट स्कूलच्या प्रिन्सिपॉलना भेटून आलो. यू कॅन गेट ॲडमिशन.

रेखा : नको बाबा ! हा मेडिकलचा कोर्सच ठीक आहे.

दीनानाथ : हा हा, म्हणजे डॉक्टर मिलिंद आहे नाही का तिथे ! ( ती लाजते व जाऊ लागते. ) गाडी घेऊन वेळेवर ये परत ! आम्हांला पिक्चरला जायचंय.

रेखा : थँक्यू बाबा. ( घाईघाईने जाऊ लागते. )

दीनानाथ : वन मोअर थिंग ! तुझ्या आईनं अजून पाहिला नाही मिलिंदला— एखाद दिवशी घेऊन ये त्याला.

रेखा : ( जाता जाता ) हो हो, घेऊन येते. ( निघून जाते. )

( दीनानाथचं लक्ष नितीनकडे जातं. )

दीनानाथ : आमचे प्रिन्स ऑफ वेल्स असा लांब चेहरा करून का बसलेयत ?

नितीन : सहज !

दीनानाथ : कळलं मला ! मिलिंदला घेऊन ये म्हटलं, नि प्रियाला घेऊन ये म्हटलं नाही म्हणून ! अरे, पण आम्ही पाहिलीय प्रियाला.

नितीन : पण ती आज गेलीय इंदूरला— कुणाला तरी दाखवायला !

दीनानाथ : दाखवायलाच ना ! ती परत आली की कळव ! तिच्या काकांना बोलावून घेईन मी ! आणि हे बघ, तुला लॉ आवडत नसेल तर सोडून दे. गो फॉर इंजिनिअरिंग.

नितीन : यू रिअली मीन इट ?

दीनानाथ : व्हेन आय से, आय मीन इट. ( हसत हसत वर जाऊ लागतो. ) नि बरं काहो, पुढल्या आठवड्यात आपल्याला काश्मीरला जायचं आहे. भिकोबासह !

मनोरमा : हे मधेच काय काढलंत ?

दीनानाथ : खूप दिवसांची इच्छा होती. आपल्या लग्नानंतर सवड होती, पण पैसा नव्हता. नंतर पैसा आला पण सवड झाली नाही. ( क्षणभर थांबून ) आता सवड मिळालीय थोड्या दिवसांची ! चांदणं शिंपणारी पौर्णिमेची रात्र एकदाच येते बरेच दिवसांनी. पण त्या चांदण्या रात्रीची जादू इतर अंधाऱ्या रात्रींचा अंधार विसरायला लावते. ( वर आपल्या खोलीत निघून जातो. नितीन नि मनोरमा तो गेलेल्या दिशेकडे पाहू लागतात. )

नितीन : आई, एकदम एव्हढा बदल कसा काय झाला बाबांमध्ये ?

मनोरमा : अरे, मुळापासून त्यांचा स्वभाव असाच होता. पण मधेच कसलं सावट पडलं होतं त्यावर कोण जाणे !

**नितीन** : मी सांगतो आई, मरणाच्या भीतीने बदललेयत बाबा ! त्यांना आता आपल्या प्रेमाची–सहानुभूतीची गरज भासू लागली.

**मनोरमा** : तसं नाही रे ?

**नितीन** : तू नाहीच म्हणणार ? पण आता त्यांना वाटू लागलंय ? कुणीतरी आपलं जवळचं असावं– आपुलकीचं असावं.

**मनोरमा** : तसं असलं तरी बदल झालाय, हे खरं ना ?

**नितीन** : हा बदलही खोटा आहे— देखावा आहे ! आणि खरा असलाच तर त्याला फार उशीर झाला, आई ! ज्या वेळी आम्हांला प्रेम हवं होतं त्या वेळी नाही मिळालं. आता मिळून काही उपयोग नाही. कारण इतक्या वर्षांत पार मरून गेलीयत आमची मनं ? एक दिवसाच्या चांदण्याला मागल्या रात्रीचा अंधार नाही पुसता येत, बाबांना वाटतोय तसा.

( आतून भिकोबा बाहेर येतो. हातात पातेलं आहे. )

**मनोरमा** : तू कुठे निघालास भिकोबा ?

**भिकोबा** : श्रीखंड आणायला !

**मनोरमा** : श्रीखंड ?

**भिकोबा** : हो ! खूप वर्षांनी आजचा हा दिवस बघितला. तोंडं गोड व्हायला हवीत सर्वांची !

**मनोरमा** : थांब ! पैसे घेऊन जा.

**भिकोबा** : नको ! आहेत माझ्याकडे. आज मी तोंड गोड करणार आहे सर्वांचं ! माझा अधिकारच आहे तो.

**मनोरमा** : खरंच, तुझाच अधिकार आहे हा ! माझ्या आधीपासून साथ मिळाली त्यांना तुझी ! त्यांच्या आवडीनिवडी तुझ्याकडून जाणून घेतल्या होत्या मी.

**भिकोबा** : बाईसाहेब, एक विचारू ?

**मनोरमा** : विचार.

**भिकोबा** : साहेबांना जे काही झालं आहे त्यावर उपाय नाही काही काही ?

**मनोरमा** : ( संथपणे ) नाही. ( या वेळी दीनानाथ वर उभा आहे. )

**भिकोबा** : मग हे सगळे डॉक्टर लोक काय जाळायचेयत ? तुम्ही काळजी करू नका बाईसाहेब. मी नवस बोललोय जेजुरीच्या खंडोबाला ! त्याला काही लाज असेल तर नाही विस्कटणार तो हा भरला संसार.

( बाहेर निघून जातो. मनोरमा भारावून आत जाते. एकटा नितीन बसलेला आहे. दीनानाथ आता घरगुती कपड्यात आहे. त्याने भिकोबाचं बोलणं ऐकलेलं आहे. तोही भारावलेला आहे. एकेक पाऊल टाकीत तो खाली येतो. पाहतो— नितीन एकटाच बसलेला आहे. दीनानाथ त्याच्या जवळ येतो. )

**दीनानाथ** : कसल्या विचारात बसलायस इथे ? मला वाटलं ती गुड न्यूज प्रियाला द्यायला गेला असशील तू स्टेशनवर. ( नितीन एकवार दीनानाथकडे पाहतो नि आपल्या खोलीकडे जायला वळतो. त्याच्या या वागण्याने दीनानाथ कष्टी होतात. ) नितीन— ( नितीन थबकतो. दीनानाथ त्याच्याजवळ जातात. त्याच्या खांद्याला स्पर्श करतात. ) अजून राग गेला नाही बापावरचा ? मला ठाऊक आहे मी फार ताप दिला तुम्हांला. तुमची मनं नाही जाणून घेतली. मायेचा स्पर्श— प्रेमाचा शब्द नाही मिळू शकला तुम्हांला माझ्यापासून ! पण हे कळलं तेव्हा फार उशीर झाला रे !

**नितीन** : बाबा !

**दीनानाथ** : मरणाला नाही भ्यालो मी ! पण भ्यालो या एकटेपणाला ! शेवटच्या क्षणी माझं कुणीही नाही या जाणिवेला ! मरणासमोरही न वाकणारा दीनानाथ एकलेपणाच्या सहानुभूतिशून्य जीवनाच्या कल्पनेसमोर वाकला. ( बोलत बोलत खिडकीकडे येतो. ) नितीन, पाहिलास तो अस्ताला जाणारा सूर्य ? ( नितीन नकळत खिडकीकडे जातो. ) त्याचे ते रंग काही क्षणांचे ! नंतर अंधार ! याच सूर्यानं उगवतीच्या वेळी कळ्या–फुलांना जीवन देण्याचा यत्न केला. पण लक्षात राहिला तो त्याचा माध्यान्हीचा ताप ! मीही असाच ताप दिला तुम्हांला कळत–नकळत ! पण बेटा, तुमचं जीवन नीट फुलावं–बहरावं म्हणून मी वागलो तसा ! निवडुंगाचे फक्त काटेच दिसतात जगाला ! त्याच्या कुंपणामुळे कळ्या फुलांचं होणारं रक्षण दिसत नाही का रे कुणाला ?

**नितीन** : बाबा ! ( जवळ जातो. )

**दीनानाथ** : मला ठाऊक आहे, तू नि रेखा नाराज झाला आहात. तुमच्या मनाविरुद्ध कोर्सेस घ्यायला लावले म्हणून. पण बेटा, मला तुला बॅरिस्टर करायचा होता तो आमच्या धंद्यातल्या कायदेशीर बाबी सांभाळायला घरचा माणूस हवा होता म्हणून.

**नितीन** : आणि रेखा ?

**दीनानाथ** : नितीन, माझ्या लहानपणी माझी आई वारली मलेरियाच्या साध्या तापाने— गावात वैद्यकीय मदत न मिळाल्यामुळे. त्याच वेळी मी ठरवलं होतं की त्याच गावात मोठं हॉस्पिटल बांधायचं नि रेखाला तिथं ठेवायची.

**नितीन** : याची कल्पना नव्हती आम्हांला.

**दीनानाथ** : फार थोडे दिवस राहिलेयत ! या थोड्या दिवसांत फार काही करायचंय रे मला, जे नाही करू शकलो इतक्या वर्षांत ! विसरून जा ते ! तो सारा कठोरपणा— कटूपणा. नितीन, काळ्या ढगांना नि त्यांच्या गडगडाटाला विसरून जायचं असतं माणसानं. लक्षात ठेवायच्या असतात त्यातून झरणाऱ्या जलधारा. (मान वळवून डोळे टिपतो. नितीन दिना-

नाथांच्या खांद्याला स्पर्श करतो. ते त्याला एकदम जवळ घेतात. त्याच्या मस्तकावरून हात फिरवीत.) नितीन, माझ्यावरला राग तू तुझ्या आईवर नि रेखावर नको काढूस. बेटा, माझ्यानंतर तुझ्या आईला नि रेखाला तुझाच आधार आहे!

**नितीन** : प्लीज बाबा, असं नका बोलू!

**दीनानाथ** : बोलली नाही तरी घडायचं ते घडणारच. खूप मोठा हो— माझ्यापेक्षाही मोठा. पण त्या मोठेपणाच्या नादात तुझ्या बायको-मुलांशी माझ्यासारखा वागू नकोस— कठोरपणे— रूक्षपणे.

(तोच आतून मनोरमा येते औषधाचा ग्लास घेऊन. नि हे दृश्य पाहून भारावते.)

**मनोरमा** : औषधाची वेळ झाली.

**नितीन** : आण इकडे. मी देतो.

(आईच्या हातातला ग्लास घेतो. दीनानाथला हाताने धरून खुर्चीवर बसवतो व ग्लास त्याच्या हातात देतो. दीनानाथ औषध घेतो तोंड वेडंवाकडं करीत. नितीन टेबलावरील फळांतलं एक फळ कापतो व त्याचा तुकडा दीनानाथच्या हातात देतो. दीनानाथ समाधानाने मनोरमेकडे पाहतात.)

**मनोरमा** : जेवणानंतर घ्यायचं औषध संपलंय बरं का.

**नितीन** : मी घेऊन येतो ना— कागद कुठे आहे ?

(मनोरमा कागद देते. नितीन घेतो व बाहेर निघून जातो. दीनानाथ उठतो व नितीन गेलेल्या दिशेकडे पाहू लागतो. मनोरमाही गंभीर आहे.)

**मनोरमा** : आता वर जाऊन विश्रांती घ्यायची ना ?

**दीनानाथ** : छे छे. आता विश्रांतीसाठीसुद्धा या सोनेरी क्षणातला एकही क्षण दवडायला मी तयार नाही. मनू, मघाशी एक गोष्ट विसरूनच गेलो होतो मी.

**मनोरमा** : ती कुठली ?

(दीनानाथ खिशातून गजरा काढतो व दाखवतो.)

**दीनानाथ** : तुला आठवतं! लग्नानंतर रोज मी येताना तुझ्यासाठी गजरा आणायचो नि— (तिच्या केसांत माळतो.)

**मनोरमा** : हे काय, कुणी पाहिलं म्हणजे ?

**दीनानाथ** : अग, नाटक-सिनेमातसुद्धा असल्या दृश्याला बंदी नाही.

**मनोरमा** : खरं सांगू ? तुम्ही आपल्या हातानं माळलेल्या या गजऱ्याचं सुख हिऱ्यामोत्यांच्या नेकलेसनंही नाही मिळालं कधी मला!

**दीनानाथ** : फार काळ गेला त्याला. त्या वेळी सिंगल रूम होती आपली— आठवतं ? त्या वेळी तू संसारात आलीस माझ्या! या बंगल्यापेक्षा जास्त सुखी

होतो आपण त्या सिंगल खोलीत.

**मनोरमा** : कारण तिथे जिव्हाळा होता— आपुलकी होती— प्रेम होतं ! ते प्रेम नंतर ओसरलं दिना !

**दीनानाथ** : खरंच ओसरलं ! दिनाचा दीनानाथ झाला ! दीनानाथाचा साहेब झाला. पण आज तू दिना म्हटलंस नि खूप मागे गेलं मन— पंचवीस वर्षे ! त्या खोलीमधेच रेखाचा जन्म झाला. आपण ब्लॉकमधे राह्यला गेलो. नंतर नितीन झाला. आपण बंगल्यात आलो. नंतर प्रमील झाली नि मी वैभवाच्या शिखरावर पोचलो. पण त्या वैभवाच्या अट्टाहासात गमावून बसलो, मी संसारातलं सुख नि माझी मनू. ( बोलत-बोलत दोघे प्रमीलच्या फोटोकडे येतात. ) तुला आठवतं, आपल्या ह्या बछडीच्या जन्माच्या वेळची गोष्ट ! तू हॉस्पिटलात जायला निघाली होतीस. डॉक्टर म्हणाले होते, हे बाळंतपण धोक्याचं आहे. दोन्ही मुलं सिझरिंगची होती म्हणून ! तुला हॉस्पिटलमधे पोचवून मी जायला वळलो. तू एकदम माझ्या जवळ आलीस नि माझ्या खांद्यावर डोकं ठेवून म्हणालीस, " दिना, माझ्यानंतर माझ्या मुलांना अंतर नाही ना देणार ? " कुठे तरी काळजात गलबलून आलं नि मला कळायच्या आत— मी रोखायच्या आत डोळ्यांतून पाणी वाहू लागलं.

**मनोरमा** : ते अश्रू मी विसरू शकत नाही. पुढे आयुष्यभर तुम्ही कठोरपणे वागलात— उपेक्षेनं वागलात. तरी ते उरात जपून ठेवलेले अश्रू मला बजावीत असत की— नाही, मनू, तुझा नवरा हळवा आहे— भाबडा आहे— खरा माणूस आहे. खोट्या आवरणांनी झाकलेला— खोट्या कल्पनांनी भारलेला. ( तिच्या डोळ्यात अश्रू येतात. )

**दीनानाथ** : आज तू रडलीस. वेडे आपली बछडी गेली त्या वेळी नाही रडलीस ! रडून घे मनू, पोटभर रडून घे. मी आहे तुझे अश्रू पुसायला. ( अश्रू पुसतो. ) खरं सांगू. आपली बछडी गेलीना त्या वेळी मी वर गेलो. खोलीचं दार बंद केलं नि पोटभर रडून घेतलं— बछडीसाठी ! का एवढा मोठा होतो माणूस, की त्याला चारचौघांत रडायची लाज वाटते ?

**मनोरमा** : दिना.

**दीनानाथ** : हा पिआनो पाहिला मनू, की पूर्वीचे ते सुगंधी क्षण मोरपिसं होऊन काळजाला स्पर्श करून जातात— सुखावून जातात ! नि आठवतात ते दिवस. ( तिचा हात हातात घेतो व जिन्याच्या रोखाने जाऊ लागतो. ) पहिल्या प्रीतीचे— पहिल्या भेटीचे. तुला आठवतात ते दिवस— मंतरलेले दिवस ! ते दिवस रुसले नि सारं सुखच रुसलं !

**मनोरमा** : ते क्षण मी मनोमनी जपून ठेवले होते. कधी तरी तुम्हांला ते आठवले तर तुमच्या ओंजळीत देण्यासाठी— फक्त तुमच्या ओंजळीत देण्यासाठी !

( असं बोलत बोलत दीनानाथ नि मनोरमा जिन्याच्या पायऱ्या चढू लागतात. तोच टेलिफोन वाजतो. बाहेरून श्रीखंड घेऊन येणारा भिकोबा रिसीव्हर उचलतो. मनोरमा नि दीनानाथ जिन्यात थबकतात. )

**भिकोबा** : हॅलो, ऑ ! काय ? ( स्वर घाबरलेला आहे. )

**दीनानाथ** : काय झालं ? कुणाचा फोन आहे ?

**भिकोबा** : रेखाताईंचा ! रडताहेत त्या.

( दीनानाथ एकदम घाईघाईने पायऱ्या उतरून फोनकडे येतो. मागोमाग मनोरमा. )

**दीनानाथ** : हॅलो, मी दीनानाथ बोलतोय. बोल बेटा ! नुसतं रडून काय झालं ते कसं कळणार मला ? काय ? आहे ! नाही. तू तिथेच थांब. मी आलोच आता. तू काळजी करू नकोस ! मी आहे ना ? ( फोन ठेवतो. )

**मनोरमा** : काय झालं ?

**दीनानाथ** : ज्या प्लेनने मिलिंद येत होता, त्या प्लेनला वाटेत अपघात झालाय.

**मनोरमा** : काय ? ( मटकन कोचावर बसते. )

**दीनानाथ** : प्लीज मनू !

( मनोरमेला पॅट करतो नि तसाच बाहेर निघून जातो. नि हळूहळू रंगभूमीवर अंधार होऊ लागतो. )

□

## अंक तिसरा

## प्रवेश तिसरा

[ रंगभूमी हळूहळू प्रकाशमान होते नि दीनानाथांच्या दिवाणखान्याचं दृश्य दिसू लागतं. वेळ संध्याकाळची. दिवाणखान्यात कुणीही नाही. तरीसुद्धा उदासीनतेचे सावट त्यावर पडलेली जाणवते. काही क्षणांत आपल्या खोलीतून रेखा बाहेर येते. अतिशय सावकाश ! ती उदास आहे. ती हळूहळू येते— सोफ्यादर बसते. मिलिंदच्या आठवणीने ती बेचैन झालेली आहे. तोच विमानाचा आवाज होतो. ती उठते. खिडकीकडे येते. जणू मिलिंद त्या विमानातून येतो आहे. ती खिडकीत उभी राहते. विमानाचा आवाज दूरदूर जातो. ती डोळे पुसते. याच वेळी आतल्या खोलीतून मनोरमा येते. ती पाहते. मनोरमा रेखाजवळ जाते व तिच्या केसांतून हात फिरवते. ]

**रेखा** : आईऽ ( तिला बिलगते. )

**मनोरमा** : रेखा, असं काय वेड्यासारखं ? ( थोपटते ).

**रेखा** : खरंच वेडी का नाही झाले मी ! म्हणजे काही आठवलं नसतं. त्या दिवशी मिलिंद येणार म्हणून तार आली ! बाबांनी जायला परवानगी दिली तेव्हा त्या आनंदापुढे आभाळ ठेंगणं वाटलं ! पण आकाशातून जमिनीवर आणलं मला त्या भयानक वार्तेनं.

**मनोरमा** : रेखा.

**रेखा** : आई, ओठाजवळ आलेला सुखाचा पेला असा काढून घेऊन काय

साधलं दैवानं ?

**मनोरमा** : रेखा, मला ठाऊक आहे, तुझं दुःख सांत्वनाच्या पलीकडे आहे! पण तुझ्या वडलांचं दुःख! बाहेर दिसू देत नाहीत. पण आतून पार खचलेयत ते!

**रेखा** : आई!

**मनोरमा** : तुला अशी दुःखी पाहिली की आणखीन उदास होतात.

**रेखा** : मला कळत का नाही! पण साध्या जखमेवर खपली धरायला सुद्धा काही दिवस जावे लागतात. पण तू काळजी करू नकोस आई. माझ्यासाठी बाबांना दुःखी होऊ देणार नाही मी! माझ्या नशिबाचे भोग मलाच भोगायला पाहिजेत. मी ते भोगीन– हसतमुखाने. (हॉर्न वाजतो. मनोरमा आत जाते. रेखा डोळे पुसते. तोच बाहेरून दीनानाथ येतो—खचलेला.)

**रेखा** : (चेहऱ्यावर खोटा आनंद आणून) बाबा, आज तुम्हाला उशीर झाला ?

**दीनानाथ** : फक्त पाच मिनिटं.

**रेखा** : (हसत) पाच मिनिटांच्या उशिरानं नेपोलियन लढाई हरला.

**दीनानाथ** : तुझा बापही हरला! आयुष्याची लढाई.

**रेखा** : बाबा.

**दीनानाथ** : बेटी, तुला कधी सुख दिलं नाही मी आणि देण्याचा प्रयत्न केला तेव्हा दैवानं हा दावा का साधला ? मी तुझा अपराधी आहे रेखा. मीच माझ्या मुलीचं सौभाग्य हिरावून घेतलं.

**रेखा** : पुन्हा असं बोलायचं नाही.

**दीनानाथ** : दुसऱ्याच्या चुकांबद्दल अनेकदा बोललो. स्वतःच्या चुकीबद्दल एकदाही बोलू नको ? मिलिंदची बदली मी घडवून आणली नसती तर हा प्रसंग ओढवला नसता. मला माफ कर बेटा.

**रेखा** : जे घडायचं ते घडलं. त्यात तुमचा काय दोष! उलट तुम्ही माझ्यासाठीच ना मिलिंदची बदली पुन्हा मुंबईला घडवून आणलीत! माझंच नशीब खोटं त्याला कोण काय करणार ? कदाचित तुमचीच निवड दैवाला बरोबर वाटली असेल.

**दीनानाथ** : म्हणजे ?

**रेखा** : तुम्ही माझ्यासाठी नक्की केलेल्या स्थळाबरोबरच माझ्या जन्माच्या गाठी बांधल्या असतील दैवानं तर!

**दीनानाथ** : बेटी.

**रेखा** : तुम्ही माझ्यासाठी दिलेल्या शब्दाची किंमत–

**दीनानाथ** : तू मोजणार!

**रेखा** : किंमत ? नाही बाबा तुम्ही माझ्यावर केलेल्या प्रेमाची किंमत मी कुणा-वर तरी केलेल्या प्रेमापेक्षा खूप मोठी आहे. (दीनानाथ भारावून जातो.

रेखाच्या हे लक्षात येतं. विषय बदलीत — ) बाबा, आपण ती जागा बघायला केव्हा जायचं.

**दीनानाथ** : कुठली जागा ?

**रेखा** : माझ्यासाठी तुम्ही जिथे हॉस्पिटल काढून देणार आहात ती जागा.

**दीनानाथ** : फार छोटं खेडं आहे ते. तुला नाही आवडणार.

**रेखा** : ज्या गावात तुमचा जन्म झाला ती पितृभूमी मला आवडणार नाही ? खरंच बाबा हॉस्पिटलचं काम लवकर सुरू करायला लावा. ही शेवटची परीक्षा झाली की मी तिथेच जाऊन प्रॅक्टिस करणार आहे— आयुष्यभर तिथेच राहून.

**दीनानाथ** : समंजस आहेस पोरी— समंजस आहेस.

**रेखा** : ( विषय बदलीत ) बरं का बाबा आज मोठी गंमतच झाली !

**दीनानाथ** : कसली गंमत ?

**रेखा** : आमच्या कॉलेजमध्ये ती लेडी डॉक्टर नव्हती का ?

**दीनानाथ** : हां हां ती, न लाजणारी ?

**रेखा** : हो ! आज ती चक्क लाजली बाबा.

**दीनानाथ** : कुणाला पाहून ?

**रेखा** : मासिकात आलेला राजेश खन्नाचा फोटो पाहून. ( हसते ) ( दीनानाथ हसण्याचा प्रयत्न करतो. तोच सदानंद येतो. ) गुड इव्हिनिंग अंकल.

**सदानंद** : गुड इव्हिनिंग ! मी मुद्दाम आलो होतो. मला तो प्रकार कळला !

**रेखा** : लेडी डॉक्टरचा ! तुम्हांला कुणी सांगितला ?

**सदानंद** : ऑ !

**रेखा** : पण काका तुम्ही आज मोकळे कसे ? गुन्हेगार सुधारले की पोलिस कंटाळले ? ( हसते. सदानंद अवाक् होऊन पाहू लागतो. ) काका, तुम्ही बसा बाबांशी बोलत. मी त्यांचे कपडे वर नेऊन ठेवून येते. ( हसत हसत वर जाते. )

**दीनानाथ** : सदानंद, पाहिलीस तुझ्या दोस्ताच्या आयुष्याची शोकांतिका ! जिला मी आयुष्यभर दुःख दिलं ती आपलं दुःख विसरून मला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतेय !

**सदानंद** : म्हणजे ?

**दीनानाथ** : तिचं हसणं, वागणं खरं वाटलं तुला ? नाही. मला दुःख होऊ नये म्हणून देखावा चालला होता ! मला खात्री आहे, वर जाऊन आवरून धरलेल्या अश्रूंना वाट दिली असेल तिनं. ओह ! व्हॉट अ फेट !

**सदानंद** : तुझ्यासारख्या खंबीर मनाच्या माणसाला शोभत नाही धीर सोडणं.

**दीनानाथ** : हिमालयाचे कडेसुद्धा कोसळतात. मी तर माणूस ! मला कळत .

नाही सदा ज्या क्षणी मी माणसात यायचं ठरवलं त्याच क्षणी हे असं का घडलं ?

**सदानंद** : यालाच नियती म्हणतात ! इथल्या सोबतीचा काळ ठरवणं आपल्या हातात नसतं ! परतीची तिकिटं काढलेले आपण प्रवासी आहोत ! मुदत संपली की गाडीत बसावंच लागतं माणसाला.

**दीनानाथ** : माझ्याबद्दल नाही म्हणत मी सदा. मी तर क्यूमधे उभा आहे नंबराची वाट पाहात ! पण त्या आधी माझ्या पोरांना सुखी असलेलं पाह्यचं होतं मला.

(याच वेळी वरून नितीन येतो.)

**नितीन** : (त्याच्या जवळ जात) जे व्हायचं ते नाही टळत. तुम्ही कशाला वाईट वाटून घेता ?

**दीनानाथ** : त्यासाठी बाप व्हावं लागतं रे !

**नितीन** : (ताण कमी करण्यासाठी) माझं अजून लग्न कुठे झालंय ?

**सदानंद** : बाप व्हायला. असंच ना !

(दीनानाथ व सदानंद हसतात. नितीनही हसतो.)

**नितीन** : तुम्ही थकून आला आहात. आधी वॉश घ्या पाहू ! म्हणजे फ्रेश वाटेल. काका बसतील तोवर. (दीनानाथ उठून जिन्याच्या रोखाने जाऊ लागतो.) चढण्या-उतरण्याचा त्रास कशाला घेता उगीच ! खालच्या रूममधे घ्या वॉश ! तुमच्या आवडीचा यार्डले सोप आणलाय मी आजच ! तुमच्या हस्ते उद्घाटन होऊ द्या.

(दीनानाथ हसत हसत त्याच्या खांद्यावर भार टाकून आतल्या खोलीकडे जाऊ लागतो. सदानंद हे दृश्य पाहात राहतो तोच आतील खोलीतून मनोरमा येते.)

**मनोरमा** : भाऊजी, तुम्ही केव्हा आलात ?

**सदानंद** : हा आताच.

**मनोरमा** : हे कुठे गेले ?

**सदानंद** : आतल्या खोलीत वॉश घ्यायला. खरं सांगू वैनी, स्वतःच्या आजारपणाची ती बातमी ऐकल्यानंतरही न खचलेला दिना, मिलिंदच्या अपघातापासून फार खचलाय

**मनोरमा** : भाऊजी, एकेक दिवस जातोय ना तो एकेका क्षणासारखा भासतोय हो मला ? कुणाकुणाचं म्हणून दुःख सोसायचं ?

**सदानंद** : आईला सर्वांचंच दुःख सोसावं लागतं. वैनी, तुम्ही फक्त रेखा-नितीनच्या आई नाही आहात. दीनानाथालाही त्याच्या आईच्या जागी आहात ! तुम्ही नका काळजी करू. माझा देवावर विश्वास आहे, पण त्याहून दैवावर

जास्त आहे. ( आतून नितीन येतो. त्याला पाहून ) वैनी, दैवाचं जाऊ दे. पण हा भूत्तो बदलला कसा ?

**नितीन** : करा थट्टा ! तुम्ही बाकी राहिला होता !

**सदानंद** : मग मला सांग ही रिट्रीट कशी ?

**नितीन** : ही रिट्रीट नाही ! ही आहे जपणूक. आम्ही बाबांना ओळखूच शकलो नाही त्यांच्या वरवरच्या वागण्यावरून ! आई म्हणाली तेच खरं ! आगबोट पाण्यावर जेव्हढी दिसते त्याच्या तिप्पट ती पाण्याच्या आत असते. ( आतून तोंड पुसत दीनानाथ येतो. )

**दीनानाथ** : वा वा ! आज यार्डलेने वॉश घेतला नि एकदम लग्नाचा पहिला वाढदिवस आठवला ! अरे तुझ्या आईनं मला आवडतो म्हणून तीन वड्या आणल्या होत्या यार्डलेच्या प्रेझेंट म्हणून ! आज तो वास आठवला आणि एकदम तरुण झाल्यासारखं वाटलं. ( जिन्यावर रेखा येते. हातात औषधाची बाटली व ग्लास आहे. )

**रेखा** : म्हणून औषध नाही चुकवता यायचं.

**दीनानाथ** : पण आज औषध घेतलंच पाहिजे का ?

**रेखा** : अर्थात ! अशी टाळाटाळ नाही चालायची ! ( ग्लासात औषध ओतते. )

**दीनानाथ** : बोलूनचालून अर्धी डॉक्टरीण तू ! तुझ्यापुढे काय चालणार आमचं ? ( तिच्या हातून औषधाचा ग्लास घेतात. )

**नितीन** : पण बाबा, अर्धवट ज्ञान हे डेंजरस असतं. ( सगळे हसतात. )

**रेखा** : ( लटक्या रागाने ) बरं बरं. ( तोच फोन वाजतो. नितीन फोन घेतो. )

**नितीन** : हॅलो – यस. प्लीज होल्ड दि लाईन. ताई, तुझा फोन आहे. ( रेखा रिसीव्हर उचलते व बोलू लागते. )

**रेखा** : हॅलो, कोण, कुंदा ? काय म्हणतेस ? पत्र आलंय ? रिअली ! ओह ! वाचून दाखव ना. मोठं आहे ! बरं बरं, मीच येते तुझ्याकडे. ( फोन ठेवते व " आई " म्हणून मनोरमेला जाऊन बिलगते. )

**मनोरमा** : काय झालं ? कुणाचा फोन ?

**रेखा** : आई ऽ ( तिला बोलता येत नाही. )

**नितीन** : बोल ना ताई ! कुणाचा फोन होता ?

**रेखा** : ( सावरून ) कुंदाचा ! मिलिंदच्या मावसबहिणीचा ! मिलिंदचं पत्र आलंय. ही इज सेफ.

**मनोरमा** : खरं, पण हे कसं झालं ?

**रेखा** : त्याची तब्बेत बरी नव्हती म्हणून आयत्या वेळी त्याने तिकीट रद्द केलं.

**नितीन** : म्हणजे त्या विमानात तो नव्हता ?

**रेखा** : नव्हता.

**मनोरमा** : मग तुला पत्र का नाही पाठवलं ?

**दीनानाथ** : ( हसत ) माझ्या भीतीनं ! खरं ना ?

**रेखा** : बाबा– ( त्याला बिलगते. )

**दीनानाथ** : सदा, असं काही घडून येईल असं वाटलं नव्हतं !

**सदानंद** : पण घडलं ! धिज इज डेस्टिनी ! दैव ! अरे, मिलिंदच्या डायरीत त्यानं लिहिलं असणार अमुक अमुक फ्लाईटनं जायचं म्हणून ! पण वरच्या डायरीत त्याचं नाव नव्हतं ! नि ज्याचं नांव होतं तो मिलिंदच्या रद्द झालेल्या तिकिटावर गेला मुक्कामावर ! याला कोण काय करणार ?

**दीनानाथ** : तुझा रोख कळला मला ! मी हल्ली डायरी लिहिणं बंद केलंय ! ( दोघेही हसतात. )

**रेखा** : बाबा, मी कुंदाकडे जाऊन येऊ ?

**दीनानाथ** : जरूर जा ! पत्रात आणखी काय काय लिहिलंय ते आम्हांलाही कळू दे, बरं का ?

**रेखा** : हेहो काय बाबा !

**दीनानाथ** : गाडी घेऊन जा.

**रेखा** : गाडी कशाला ? जवळ तर राहते. आई, मी जाऊन येते.

**मनोरमा** : अशीच निघालीस ?

**नितीन** : अग, मिलिंदचं नुसतं पत्र आलंय.

**रेखा** : चल ! ( निघून जाते. )

**नितीन** : बाबा, मी पण जाऊन येतो.

**दीनानाथ** : प्रिया आली वाटतं इंदूरहून ?

**नितीन** : हो आजच.

**दीनानाथ** : देन डोन्ट वेस्ट युअर टाईम. हरि अप. इतक्या दिवसांचा विरह आहे. ( तो जाऊ लागतो. ) तिला सांग, उद्या भेटणार आहे मी तिच्या काकाला.

**नितीन** : थँक्यू डॅडी. ( हसत हसत जातो. मनोरमा हसते )

**सदानंद** : या घरात असा सुगंध कधी दरवळेल असं वाटलं नव्हतं मला.

**दीनानाथ** : मलासुद्धा ! मला वाटतं सदानंद, या घटकेला माझ्यासारखा सुखी माणूस मीच असेन या जगात ! रेखा–नितीनसारखी मुलं ! तुझ्यासारखा दोस्त ! भिकोबासारखा नोकर ! नि मनूसारखी बायको ! ( मनोरमा लाजते. ) पाहिलंस सदा ! ही मनू न बोलून सगळं सांगून जाते.

**मनोरमा** : एखाद्याला किती लाजवायचं ते ! ( दीनानाथ व सदानंद हसतात. मनोरमा विषय बदलीत ) भाऊजी, आज जेवायला थांबणार ना ?

दीनानाथ : त्यात विचारायचं काय ? थांबणारच तो. काय सदा ?

सदानंद : थांबलो असतो. पण आज मीटिंग आहे स्पोर्ट क्लबची. ती अटेन्ड करायलाच हवी.

मनोरमा : तुमचं हे नेहमीचं आहे भाऊजी.

सदानंद : रागावू नका वैनी. पण उद्या नक्की येईन.

दीनानाथ : घरी गेल्यावर डायरीत नोंद करून ठेव.

(सदानंद व दीनानाथ हसतात.)

सदानंद : गुडनाईट दिना— गुडनाईट वैनी. (जातो)

मनोरमा : तुम्ही जेवून घेणार ना !

दीनानाथ : रेखा–नितीन आले की सगळे जेवू बरोबर.

(दिगंबर शाळीग्राम येतात.)

दिगंबर : मी थोडं आत येऊ का ? (मनोरमा आत निघून जाते– दीनानाथ वळतो – पाहतो.)

दीनानाथ : या, बसा.

दिगंबर : नको. मी उभा राहूनच बोलून आपला थोडा वेळ घेऊ का ?

दीनानाथ : बोला ! पण तुमचं नाव सांगू नका. मला ठाऊक आहे ते ! औदुंबर दिगंबर शाळीग्राम.

दिगंबर : मी थोडी दुरुस्ती सुचवू का ? औदुंबर माझे वडील— मी दिगंबर.

दीनानाथ : बोला, काय बोलायचंय तुम्हाला मिस्टर दिगंबर औदुंबर शाळीग्राम ?

दिगंबर : मी आपलं थोडं अभिनंदन करू का ?

दीनानाथ : कशाबद्दल ?

दिगंबर : आपल्या मुलीचा लाखाचा क्लेम न घेता तेव्हढीच रक्कम आपण आंधळ्याच्या शाळेला देऊन टाकलीत.

दीनानाथ : आयुष्यभर आंधळेपणानं वागल्याचं प्रायश्चित्त घेऊन टाकलं !

दिगंबर : आपल्या बोलण्याचा अर्थ कळला नाही हे सुचवू का ?

दीनानाथ : अर्थ कळायचा त्याला कळला ! ते जाऊदे, मी तो क्लेम घेतला नाही त्यामुळे तुमचं कमिशन मात्र बुडालं.

दिगंबर : मी क्लेम डिपार्टमेंट सोडलं.

दीनानाथ : का हो ?

दिगंबर : क्लेमचा खरा अर्थ कळला म्हणून. गेल्याच महिन्यात बायकोचा क्लेम घेतला ! वारली ती !

दीनानाथ : कशानं ?

दिगंबर : दारिद्र्याच्या रोगानं ! तीन हजारांचा क्लेम होता. घेताना डोळ्यांत पाणी आलं, पण घरी आलो नि बरं वाटलं. त्यातील हजारात कर्ज फिटेल—

मुलांचं शिक्षण होईल या कल्पनेनं! कुणी तरी एकानं मेल्याशिवाय सुखानं जगता येत नाही दरिद्री लोकांना या जगात.

दीनानाथ : यू सेड इट! आता तुम्ही क्लेम डिपार्टमेंट सोडलं म्हणून. नाही तर माझा क्लेम तुमच्यामार्फत सेटल करायला सांगितला असता मी वरच्या लोकांना!

दिगंबर : राग येणार नसेल तर थोडं सुचवू का? असं अभद्र बोलू नये दिवेलागणीच्या वेळी.

दीनानाथ : त्याआधी मी एक तुम्हाला सुचवू का?

दिगंबर : काय ते?

दीनानाथ : तुम्ही एक तर बसा नाही तर घरी जा– अश्रूंचा बांध फुटायच्या आत.

दिगंबर : दुसऱ्याच्या घरी येऊन रडायला मी लहान आहे का?

दीनानाथ : लहानच आहात म्हणून सुखी आहात. मोठे झाला असता तर दुःखी झाला असतात!

दिगंबर : आपलं हेही बोलणं मला कळलं नाही हे आपल्या कानावर घालू का? (दीनानाथ नुसता हसतो.) आपल्या घरी यायची ही तिसरी खेप, पण आज आपणाला हसताना पाहिलं आणि न केलेल्या क्लेमचं कमिशन मिळालं असं वाटलं! जाण्यापूर्वी एक विचारू का?

दीनानाथ : विचारा.

दिगंबर : माझं नाव नाही ना विसरणार?

दीनानाथ : बिलकुल नाही. औदुंबर— सॉरी दिगंबर औदुंबर शाळीग्राम.

दिगंबर : यस. थँक्यू. आता मी येऊ का?

दीनानाथ : या.

(शाळीग्राम नमस्कार करून जातो. दीनानाथ जिन्याकडे जातो. एकेका पायरीवर चढू लागतो, तोच बाहेरून दीनानाथाचे व्याही भगवंतराव येतात. त्यांना पाहताच दीनानाथ जिन्यात थबकतो.)

दीनानाथ : कोण भगवंतराव! या, या.

भगवंतराव : म्हटलं महंमदाला डोंगराकडे यायला वेळ नसेल तर डोंगराने महंमदाकडे जायला हवं. कारण किती झालं तरी आमचा वधूपक्ष नि तुमचा वरपक्ष.

दीनानाथ : (खाली येत) नाही. तसं नाही. माझ्या या आजारपणामुळे यायला झालं नाही.

भगवंतराव : अहो, थट्टा केली मी. तुमचं आजारपण आम्हाला ठाऊक का नाही? आम्हीही तेवढ्याकरताच घाई करतो आहोत.

दीनानाथ : तेही खरंच.

भगवंतराव : माझी एकुलती एक मुलगी तुमच्या घरात येऊन पडली की आम्ही मोकळे! मग बोला केव्हाचा धरायचा मुहूर्त.

दीनानाथ : मुहूर्त!

भगवंतराव : हे पत्रिकांचे नमुनेसुद्धा आणले आहेत. आता रिसेप्शन कुठे ठेवायचे 'ताज'मधे की 'सन ॲन्ड सॅन्ड'मध्ये ते तुम्ही ठरवायचं.

दीनानाथ : या बाबतीत मी काही बोललो तर कृपा करून गैरसमज नका करून घेऊ.

भगवंतराव : अहो, आपण व्याही. आमचा गैरसमज होईलच कसा!

दीनानाथ : हे लग्न रद्द केलं तर नाही का चालणार?

भगवंतराव : दीनानाथ, आपण आमची थट्टा तर नाही करत.

दीनानाथ : नाही– मी कबूल करतो मी आपल्याला वचन दिलं होतं. पण आपण मला या वचनातून मोकळं केलंत तर मी आपला जन्माचा ऋणी होईन.

भगवंतराव : पण आम्ही जन्मातून उठू त्याचं काय? मुलीचं घराणं असलं म्हणून आम्हांलाही काही प्रेस्टीज— स्टेटस आहे दीनानाथ.

दीनानाथ : मला सगळं मान्य आहे. पण मुलाच्या इच्छेपुढे—

भगवंतराव : आयुष्यभर स्वतःच्या इच्छेनुसार जगलेल्या दीनानाथ लाडांनी मुलाच्या इच्छेचा बाऊ करावा! मी काय तुम्हाला ओळखत नाही?

दीनानाथ : तुम्ही ओळखत होता तो दीनानाथ संपला.

भगवंतराव : हे, ही एंगेजमेंट जाहीर करण्यापूर्वी कळायला हवं होतं. मला ही सगळी नाटकं कळतात दीनानाथ!

दीनानाथ : हे नाटक नाही भगवंतराव. खरंच सांगतो. आमच्या नितीनला हे लग्न मान्य नाही. त्याचं दुसऱ्या मुलीवर प्रेम आहे.

भगवंतराव : हे इतके दिवस नाही कळलं?

दीनानाथ : नाही कळलं! कारण मी फक्त स्वतःवरच प्रेम करत होतो! चुकत होतो मी.

भगवंतराव : तुमच्या चुकीचं प्रायश्चित्त आम्ही काय म्हणून भोगायचं? दीनानाथ हा तुमचा नि तुमच्या मुलाच्या इच्छेचा प्रश्न नाही. माझ्या मुलीच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. हे लग्न मोडलं तर मला तोंड बाहेर काढायला जागा उरणार नाही. आणि कदाचित तुमच्या धाकट्या मुलीनं जे केलं तेच माझ्या मुलीला करावं लागेल— आत्महत्या.

दीनानाथ : नाही— नाही. मी समजावीन तुमच्या मुलीला.

भगवंतराव : दुसऱ्याच्या मुलीला समजावण्यापेक्षा स्वतःच्या मुलाला का नाही समजावत. (दारात नितीन येतो.)

दीनानाथ : तुम्हाला ते सांगूनही समजणार नाही! मी कबूल करतो माझ्या मुलाच्या मनाविरुद्ध हे लग्न मी ठरवायला नको होतं! एंगेजमेंट जाहीर करायला नको होती! याबद्दल तुम्ही सांगाल ते प्रायश्चित्त घ्यायला मी तयार आहे.

भगवंतराव : प्रायश्चित्त म्हणजे पैसाच ना! तो माझ्याकडेही आहे! पण मला जमवायचा आहे तो घराण्याचा नावलौकिक, इज्जत! तुमच्या बदलणाऱ्या लहरीसाठी त्याला बट्टा लावून घ्यायला मी तयार नाही. मिस्टर दीनानाथ, तुमच्याप्रमाणे मीही एक उद्योगपती आहे. हा माझा प्रेस्टीज इश्यू आहे.

दीनानाथ : आय रिअलाईझ इट. पण माझे हात बांधले गेले आहेत.

भगवंतराव : त्याआधी आपले संबंध बांधले गेले आहेत. ते असे तुटू देणार नाही मी. हे लग्न व्हायलाच हवं.

दीनानाथ : माझं ऐका; हा हट्ट सोडा. आजवर इतका लाचार मी कधी झालो नव्हतो कुणापुढे! आज झालोय. तुम्ही सांभाळून घ्या मला. मी आपली माफी मागतो. म्हणत असाल तर जाहीर सुद्धा. पण माझ्यावर दया करा.

नितीन : (पुढे येत) बाबा! (दोघेही चमकून पाहतात.) कुणापाशी दयेची याचना करता आहात? कुणासाठी? माझ्यासाठी? नाही बाबा! तुम्हाला अशी एक दयेची वस्तू होऊ देणार नाही मी. मला ते आवडणार नाही. ज्या ताठ मानेने आयुष्यभर तुम्ही जगलात त्याच ताठ मानेने अखेरपर्यंत रहा! तुम्ही केलेल्या प्रेमाची किंमत एवढी मोठी आहे की, त्यासमोर लग्न ही मोठी गोष्ट ठरूच शकत नाही.

दीनानाथ : नितीन!

नितीन : बाबा, तुमच्या या व्याह्यांना सांगा, त्यांच्या मुलीबरोबर मी लग्नाला तयार आहे.

दीनानाथ : नाही नितीन!

नितीन : मी मनापासून बोलतोय बाबा. आयुष्यात निदान एव्हढं तरी करूदे मला तुमच्यासाठी.

दीनानाथ : अरे, पण प्रिया?

नितीन : कोण प्रिया? माझ्या वडलांच्या प्रतिष्ठेसमोर– या घराण्याच्या नावलौकिकासमोर कोण आलीय प्रिया! आपण दिलेला शब्द पाळला या कल्पनेच्या आनंदात तुमच्या डोळ्यांतल्या समाधानाची एखादी छटा पाहण्यासाठी आयुष्यभर दुःख सोसायला मी तयार आहे.

दीनानाथ : नितीन, बेटा, मला असं लाजवू नकोस.

नितीन : असं मनातसुद्धा आणू नका. वाईट एवढंच वाटतं की, मी तुमच्याकरता एवढंच करू शकतो. मिस्टर भगवंतराव, तुम्हांला ठरवायचा असेल तो मुहूर्त ठरवा. पत्रिका छापायला द्या. रिसेप्शनची जागा ठरवा. हे लग्न

व्हायला हवं लौकरात लौकर—बाबांच्या डोळ्यांदेखत. (जिना चढून वर निघून जातो. क्षणभर दीनानाथ नि भगवंतराव अवाक् होऊन उभे आहेत.)

**भगवंतराव** : बरं झालं तुमच्या मुलांनीच प्रश्न सोडवला.

**दीनानाथ** : प्रश्न सोडवला पण उत्तर नाही सापडलं. आणि जिवंतपणी ते सापडणारही नाही. (जिन्याचा आधार घेतात.)

**भगवंतराव** : तुम्ही विश्रांती घ्या. मी चलतो. नंतर भेटेन सवडीनं पुढील गोष्टी ठरवण्यासाठी. (जातात. दीनानाथ उभे आहेत. मनोरमा दारात आहे. ती जवळ येते. त्यांच्या खांद्याला स्पर्श करते.)

**मनोरमा** : दीनानाथ !

**दीनानाथ** : (भारावून) मनोरमा !

**मनोरमा** : मी ऐकलंय सारं.

**दीनानाथ** : ऐकलंस तू ! मनू, माझ्या मुलांना मी ओळखूच शकलो नाही ! माझा नितीन माझ्या सुखासाठी—प्रतिष्ठेसाठी मन मारून लग्नाला तयार झाला. रेखा आपलं दुःख विसरून माझ्या समाधानासाठी त्या छोट्या खेड्यात राहायला तयार झाली. आणि मला खात्री आहे, मी नुसतं सुचवलं तरी मी तिच्याकरिता ठरवलेल्या मुलाशी लग्नाला तयार होईल ती. पण—पण मी असं करणार नाही. त्यांनी दिलेल्या फुलांच्या बदल्यात निखारे नाही देणार त्यांच्या हातात. नितीनचं लग्न प्रियाशीच होईल. त्यासाठी जी बदनामी सहन करावी लागेल मला ती मी करीन ! कारण आज सूर सापडलाय मला ! खऱ्या जीवनाचा सूर ! कुणीतरी आपल्यावर मनापासून प्रेम करतंय. बापाच्या डोळ्यांतला आनंद पाहायला आपल्या साऱ्या आयुष्याशी खेळायला तयार झालंय स्वखुषीनं—ही कल्पना—त्याचं सौख्य-कुबेराचं सारं वैभव यासमोर कवडीमोल आहे. मला सर्व मिळालं मनू—सर्व काही मिळालं. आयुष्यात काय हवं असतं माणसाला ! हे प्रेम – हा जिव्हाळा—हा त्याग ! आज मी धन्य झालो ! मनू, वाजव वाजव,—ते सूर. खूप वर्षांनी मला ऐकू देत ते सूर ! ज्या स्वरांनी तू मला बांधून ठेवलंस ते स्वर ऐकता ऐकता मुक्त होऊदे मला ! (ती वाजवू लागते ) मनू, आज सांगणार आहे मी मृत्यूला ये कुठल्याही क्षणी ये. आज मी कृतार्थ आहे, तृप्त आहे.

(मनोरमा सूर छेडते आहे पिआनोवर. गाणं सुरू होतं.)

वाटे हळूच यावा करपाश या गळ्यात
मैफील ही सरावी या धुंदल्या मिठीत,
आनंद वेगळा हा ही जाण आज आली
धरती प्रकाशवेडी ओल्या दवात न्हाली
हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली.

(दीनानाथ समाधानाने गाणं ऐकता ऐकता पडदा खाली येऊ लागतो.)

ग्रा. ९८९२२

IRBK-0118129

IRBK-0118129